# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांक:–१६/११/२०१७

दि. १६/११/२०१७ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती

सभेचे इतिवृत्त.

१२

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा गुरुवार दिनांक १६/११/२०१७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ५ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ६ | श्रीमती पंचम उमेश कालानी | सदस्या |
| ७ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्य |
| ८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ९ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| १० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| ११ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१. श्रीमती जया प्रकाश माखिजा,२. श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग, ३. श्री. धनंजय बोडारे, ४. श्रीमती कविता लाल पंजाबी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. राम जैसवार, शहर अभियंता

५. श्री. अशोक जाधव, लेखा अधिकारी
६. श्री. सेलवन, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
७. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
८. श्री. तरुण शेवकानी, कनिष्ठ अभियंता
९. श्री. महेंद्र दिंडे, कनिष्ठ अभियंता, विद्युत
१०. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
११. श्री.नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त, एलबीटी
१२. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर
१३. श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त, विधी
१४. श्री. भास्कर मिरपगारे, प्र. मुख्य अग्निशमन अधिकारी
१५. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.

१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी
४. श्री. बाळु भांगरे

सांयकाळी ४.१० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>सभापती श्रीमती कांचन अमर लुंड:—</u> मिटींग सुरू करा.

<u>महापालिका सचिव :—</u> विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. १** :— मागील स्थायी समिती सभेचे दिनांक २४/८/२०१७, ८/९/२०१७ व दिनांक २१/९/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

---

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

**विषय क्र. १:—** मागील स्थायी समिती सभेचे दिनांक २४/८/२०१७, ८/९/२०१७ व दिनांक २१/९/२०१७ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेश वदारिया

<u>स्थायी समिती ठराव क्र. :–</u> ५४ अ <u>दिनांक : १६/११/२०१७</u>

ही स्थायी समिती महापालिका सचिवांनी प्रस्तृत केलेले दिनांक २४/८/२०१७ पृष्ठ क्र. १ ते ४१ पर्यंतचे, दिनांक ८/९/२०१७ पृष्ठ क्र. १ ते २२ पर्यंतचे व दिनांक २१/९/२०१७ रोजीचे पृष्ठ क्र. १ ते ५२ पर्यंतचे इतिवृत्त जसे आहे तसे कायम करण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव** :– विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २** :– कर आकारणी नोंदवहीत एसीब्रिक्स ऐवजी आरसीसी अशी झालेली नोंद रदद् करुन त्यावरील (आरसीसीची) रक्कम निर्लेखित करणेबाबत.

---

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी –</u>हा विषय आज आला आहे. कर विभागाचे जे काही प्रलंबीत विषय आहेत, त्यांचा अभ्यास करून ते एकत्र आणणे आवश्यक आहे. कमीत कमी २० विषय आणणे आवश्यक आहे. एक एक विषय आल्यामुळे अस समजण्यात येते की याच्यामध्ये काहीतरी मिलीभगत आहे. असा मी सरळ आरोप लावत आहे. आणि आजचा विषय असा की त्याची चर्चा केली पाहीजे. गोषवारा चांगल्याप्रकारे वाचला तर ज्या व्यक्तीच्या नावावर ही मालमत्ता आहे. त्यास एसी ब्रीक्स ३३६ आणि एसी ब्रीक्स ९६ अस लिहिलेल आहे. नंतर त्यांनी आर.सी.सी केलेले आहे बनवलेल आहे. आणि आज त्याला कॅन्सल करून एसी ब्रीक्स करत आहोत तर मला कळत नाही एसी च आपोआप आरसीसी कसं झाल जरूर आपला अधिकारी गेला असेल त्याने बनवला असेल पहिला त्याचा रिर्पोट आला पाहिजे. कोणत्या अधिका–याने आरसीसी माप बनवले आहे.आजकाल शहरात कर विभगातील अधिकारी जावून लोकांना भरपूर त्रास देत आहेत की तूम्ही हे करा नाहीतर भाडोत्री लिहीले जाईल. साहेब भाडोत्रीच मी घेवून येतो, दुसरे नाहीतर मी हे लिहणार ते लिहणार शेवटी हे अस तर नाही एसी ब्रिक्स होत आरसीसी बनवले ५ वर्ष वापरले परत तोडून पत्र्याचे बनवले. आरसीसीचा रिपोर्टची अशी कशी नोंद झाली. याच्याा सोबत दुस–यावेळी रिर्पोर्ट आणला पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:–</u>नंतर आणा.

<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी–</u>आरसीसी कोणी लिहीले याचा तर खुलासा करा. साहेब गोषवारा वाचा चक्कर येइल कोणत्या दुनियामध्य बसलेले आहोत.

<u>श्री दादा पाटील, उप–आयुक्त, कर–</u>मा. सभापती महोदया,सन्माननीय आयुक्त आणि सन्माननीय सदस्य, तर आपल्याकडे ही जी नोंद आहे जी आताची त्याच्यामध्ये चुकून नोंद संगणकामध्ये होवून गेली होती आणि त्याच्यामुळे त्याला जास्त बिल येत होत एसी ब्रिक्सच ॲक्चुली ओरीजनल त्या ठिकाणी जाऊन त्याठिकाणी तपासणी केली आहे. आजही त्याटिकाणी एसी ब्रिक्स आहे.

<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी–</u>मला सांगा की त्या ठिकाणी कोणत्या अधिका–याने आरसीसी बनवले असेल आकारणी केलीअसेल कोणता अधिकारी त्याचे नावआणि त्यावेळेस रिपोर्ट दिला होता. सरळ लिहिलेल आहे २०१५–१६ मध्ये खालीलप्रमाणे बदल आरसीसी बदल झालेला आहे.सन २०१५–१६मध्ये काणते अधिकारी गेले होते आणि बघितले की आरसीसी बनलेले आहे.आरसीसी ची आकारणी करून बिल काढल त्या अधिका–याचा रिपोर्ट स्थायी समितीमध्ये यायला पाहिजे.

<u>श्री दादा पाटील, उप–आयुक्त, कर –</u>त्याचा जो पहिला आरसीसी आणि एसी चा रिपोर्ट दोन्ही रिपरेर्ट ठेवत आहे. आणि अधिकारी व सर्वाची नांव देतो.

<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी–</u>पहिलेचा देवू नका कारण पहिलेचे आणि आजचे सारखेच आहे.पहिल्याची आवश्यकता नाही. आजच तर तुम्ही म्हणत आहात की एसी आहे,मध्येच सन २०१५–१६ मध्ये आरसीसी कस बनल समजा ही प्रॉपर्टी माझी आहे माझ्या प्रॉपर्टी पत्र्याच्या घरामध्य बसलो आहे,अचानक सन २०१४–१५ मध्ये आरसीसी बनवले ३ वर्षे आरसीसी येणार परत ३ वर्षे चक्कर मरणार,परत येवून मी एसी करणार. त्या अधिका.यावरती पण दंडात्मक कारवाई झाली पाहिजे.

<u>श्री दादा पाटील, उप–आयुक्त, कर –</u>बिलकुल बिलकुल.

<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी–</u>तो रिर्पोर्ट घेवून या तो पर्यत पेंडिग ठेवा.

<u>श्री दादा पाटील, उप–आयुक्त, कर</u> जो कोणी दोषी आहे. त्याचा रिर्पोट मी आपल्यासमोर ठेवत आहे.

<u>महापालिका सचिव–</u>ठरावात काय टाकायचे?

<u>सदस्य श्री राजेश वदारिया–</u> माहिती अपूर्ण आहे जे प्रश्न केले आहेत त्याचे उत्तर आलच पाहिजे.

<u>महापालिका सचिव–</u>ठरावामध्ये घेऊ.

<u>सदस्य श्री राजेश वदारिया–</u>हो.

<u>महापालिका सचिव–</u> ठराव वाचून दाखविते. ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कर आकारणी नोंदवहीत एसीब्रिक्स ऐवजी आरसीसी अशी झालेली नोंद रदद् करुन त्यावरील (आरसीसीची) अतिरिक्त कर आकारणीची रु. २९६९०/– ही रक्कम निर्लेखित करण्याचा प्रस्ताव फेरसादर करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.
तसेच
याबाबत अपुर्ण जे प्रश्न आहेत ते उत्तरासोबत संपुर्ण माहिती आणणे आवश्यक आहे.
सन २०१५–१६ मध्ये एसीचे आरसीसी कसे झाले याबाबत अहवाल देणे आवश्यक राहील.
याबाबत जेवढे विषय प्रलंबित आहेत ते एकाच वेळी सादर करण्यात यावे.

<u>सदस्य श्री राजेश वदारिया–</u> हो पूर्ण माहितीसह.

<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी–</u>२०१५–१६ मध्ये त्याचे आरसीसी झालेले आहे. त्याचीपूर्ण प्रत कोणत्या अधिका–याने केली आहे. पूर्ण माहितीसह यायला पाहिजे.

<u>श्री दादा पाटील, उप–आयुक्त, कर</u> दोन्ही रिर्पोट मी एकत्र जोडत आहे.

<u>सदस्य श्री जमनादास पुरस्वानी–</u> असेंसमेंट अधिकारी कोण आहे?

<u>श्री दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–</u>नाही नाही कस सांगणार आम्ही २५ च्यावर देतोय.माझेकडे बरेच पडले आहेत.

<u>सदस्य श्री राजेश वदारिया–</u>जितके विषय पेंडीग आहेत त्यांच्याकडे ते सगळे घेवून या.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर –</u> मला माहित नाही पास कोण करते कोण हे बदल करतो. बॉलीडेशन काही प्रक्रिया आहे का नाही?

**श्री दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–**आता याच्याविषयी सांगतो आपल्याला अशा प्रकारची आमच्याकडे एकुण ५००० प्रकरणे आहेत. तुम्ही म्हणाले कॅम्प लावा. मी आमच्या सर्व लिपीकांना बोलावले आणि कुठल्याही परिस्थितीत हे सगळे प्रकरणहया ३० तारखेपर्यत बंद करायचे आहे.याच्यामध्ये आपल्याला न्याय दयायचा असेल तर न्याय दयायचा नसेल तर रिजेक्ट करायचे जागेवर.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर –**आता तुम्ही अभययोजनेचा निदान सुरूवातीच्या स्टेजच्या प्रयोगामध्ये खिचडी नको करायला.

**श्री दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–**अभय योजनशी कनेक्टीव नाही आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर –**काउंटरला वैगेरे कोण बसत?

**श्री दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–**काउंटरला वेगळे लिपिक बसतात.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–**ऐरवी काय काम करतात ही लोक?

**श्री दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–**त्यांच्याकडे बरेच काम असते, पब्लीक वर्क नावात बदल इत्यादी.

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी–**हा जो विषय आहे त्याला आपण नंतर आणू. मालमत्ता कराची अभय योजना समाप्त होईल तेव्हा १ जानेवारी मध्ये १५ ते २० दिवसाचा कॅम्प लावा. त्यामध्ये मालमत्ता अधिकारी व कर्मचारी यांना एकच काम लावा त्यामध्ये उल्हासनगर मधील लोकांचे ज्यामध्ये मालमत्तेची दुबार नोंद असेल वैगेरे सर्व कामे कॅम्प लावून करणेत यावी.

**श्री दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–**सर,असे आहे की माझ्याकडे ५००० प्रकरणे आहेत. आणि मी सदर प्रकरणवरती १५ दिवसाच्या आत पूर्ण कार्यवाही करणार आहेतजेणेकरून माझेकडे पब्लीकच राहणार नाही अशी कार्यवाही करत आहे.

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी–**ठिक आहे, करा करा कार्यवाही करा.

**श्री दादा पाटील, उप–आयुक्त, कर :–**दुसरे नविन असेसमेंट गतीने करत आहोत मी आपल्याला १७ करोडचे नविन असेंसमेंट देत आहेत.

**मा.आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–**त्यांना सांगितलेल आहे की कमित कमी २० करोड नविन असेंसमेंट देणे.

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी–** बघा प्रत्येकी चार वर्षानंतर नविन असेंसमेंट करत आले आहेत किती वर्षापसून नविन असेंसमेंट झालेले नाही?

**सदस्य श्री. भारत राजवानी–**सन २००८ पासून नविन असेंसमेंट झालेले नाही.

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी–**माझे आपल्याला अस निवेदन आहे की जस आज विषय आलेला आहे तस असेसमेंट परत करु नका.

**सदस्य श्री राजेश वदारिया–जे** पण असेसमेंट करत आहात. तुम्ही आता आम्हाला आयुक्त, साहेबांनी थकबाकीधारकरांची यादी दिलेली आहे. त्याच्यामध्ये सोना मार्केटयेथे शॉप नं.१ते १८पर्यत अशी असेंसमेंट केलेली आहे की एकुण रू. १७ लाख इतकी थकबाकी आहे. ज्यावेळेस आम्हीत्या लोकांबरोबर संपर्क साधून सांगणेत आले की तुमच्या मालमत्ता देयकावर विलंब शास्ती लागत बाहे आणि आता ७५ टक्के व्याज माफ आहे,भरुन घ्या.त्याच्यावरती ते म्हणाले की हे आमच असेंसमेंट नाही आहे.ही आमची पावती भरलेली आहे.आणि त्याचे आम्ही वेरीफिकेशन केल त्याची पावती २ वर्षे पहीले नविन असेंसमेंट केलेल आहे. हे कस होत आहे. सोना मार्केट,दुसरा माळा दुकान नं. १ते १८. त्याच्यानंतर दुसर असेंसमेंट केलेल आहे.दुकान नं. २०१ते २०५,२०६ते २१०, आणि २११ते २१६ माप लिहिलेल आहे.९० ९० चौरस फुटाचे ज्यात १८ दुकान ९० फुटाची आहेत तर त्यांच माप नविन असेंसमेंटमध्ये जरी केल आसेल तरी नविन असेंसमेंटची आवश्यकता नाही. कारण २२ वर्षे पहिले असेंसमेंट झालेले आहे त्याचे माप १६२०चौ फूटझाले पाहिजे. परंतु त्यांना ३००फुटच बील देवून भरून घेतलआणि त्यांचे म्हणणे आहे हे माझ नाही

आहे. तर ज्यावेळी असेंसमेंट करत असाल तर सदर मालमत्तेचे मुळ दस्तऐवज तपासले पाहिजे जर त्या मालमत्तेला सनद आहे तर सनद आल्यापासून आज पर्यत पूर्ण लिंक लावून नविन असेंससमेंट करत असाल,नविन कन्स्टक्शन झालेल असेल तर जुनं असेल त्याला रदद केल पाहीजे. आणि जरआपण १०वर्ष १५ वर्ष पहिले असलेली मालमत्तेचे जर करत असाल तर असे नाही झाले  पाहीजे. पहिली त्याची असेंसमेंट झालेली असून त्याच्यावर थकबाकी आहे. सोना मार्केटचा पुरावा देत आहे.माझी एक विनंती आहे की दुकानांची असेंसमेंट अलग अलग झाली पाहिजे. कारण आमच्या वॉर्ड मध्ये रेखा अर्पाटमेंट होती त्याच्यामध्ये प्लॉट नं.१०१, २०१, ३०१,४०१,५०१,पाच माळयांना एकच पावती त्यामुळे वर्षोनुवर्ष टॅक्स कोणी भरतच नव्हते.नंतर आम्ही शेवटच्या अभय योजनेमध्ये कर भरून वेगेगळी पावती करून घेतली. तसेच सोना मार्केट १ते ८ एकच पावती सर्वांची वेगळी पावती असली पाहिजे.

<u>श्री दादा पाटील, उप—आयुक्त, कर :—</u>साहेब, अस काही असेल तर झाले आहे ना.  एका महिन्याच्या आत पूर्ण करून देत आहे.

<u>सदस्य श्री भारत राजवानी—</u>सोनामार्केट ३० वर्षापासून जुन आहे आणि त्याना नविन असेंसमेंटच्या हिशोबाने बिल येत आहेत म्हणजे त्यामध्ये काही ना काही असेलच.

<u>श्री दादा पाटील, उप—आयुक्त, कर :——</u>तपासणी करावी लागेल.

<u>सदस्य श्री भारत राजवानी</u>—घोटाळा असेल.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर —</u>कुठल्या स्तरावर हे बदल झाले? त्याला मान्यता कोणी दिली?

<u>श्री दादा पाटील, उप—आयुक्त, कर :—</u>सर, ॲक्चुअली काय माहीत आहे काय त्या टॅक्स मध्ये.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u> :—तुम्ही एक अशी ऑडर ताबोडतोब काढाकी असे चेंजेस आहे ते ॲट लिस्ट ॲसेसर ऑफ द प्रॉपर्टीलाच आले पाहिजे.

<u>श्री दादा पाटील, उप—आयुक्त, कर :—</u>आता आपण संगंणकामध्ये पण बरेच बदल केले आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>—एवढा मोठा बदल होत आहे तरी गोषवारामध्ये अधिका—याचे नाव सुध्दा येत नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर —</u>आपण जे उदाहरण सांगत आहात केलेले चेंजेस स्थायी समिती मध्ये नाही आले का पास व्हायला.

<u>काही सदस्य—</u>नविन असेंसमेंट केलेली आहे ना, साहेब.

<u>श्री दादा पाटील, उप—आयुक्त, कर :—</u>बघा, नविन असेंसमेंट केलेल आहे,नविन असेंसमेंट करण्याचा अधिकार आपल्या सहायक कर असेसरला आहे.

<u>मा.आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर —</u>इमारत नविन बनवलेली आहे.

<u>श्री दादा पाटील, उप—आयुक्त, कर :—</u>जुना २५ वर्षे जुना आहे.पहिल्या असेंसमेंटचे रू. १६ लाख बाकी आहेत.आणि रू. १७ लाख बाकी नविन असेंसमेंटचे बाकी आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी</u>—एक मिनिट ,आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर साहेबांना मी सांगतो,उल्हासनगर शहरामध्ये १५ दिवसांत आपल्या नावावर टॅक्स पावती काढून दाखवतो.

<u>सदस्य श्री भारत राजवानी—</u> हजेरी शेड उल्हासनगर महानगरपालिकेची मालमत्ता आहे त्याची टॅक्स पावती काढलेली आहे ते १ महिन्यापूर्वी सील करण्यात आलेल असून महानगरपालिकेच्या कर्मचा—याने ते आपल दाखवून पावती काढली आहे व लाईट बिलपण घेतले आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>—मिटींग झाल्यावर ही प्रक्रीया मला समजून सांगा. त्याला एक रायडर लावा, हया एरियापर्यंत तुमच्याकडे यायला पाहिजेत वत्याच्या वरचे अतिरिक्त आयुक्त यांच्या मान्यतेने झाले पाहिजेत, त्याच्या

पुढचे आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरांच्या मान्यतेने झाले पाहिजे, असे तीन स्टेजवर करा.त्याच्या असेसमेंटच्या किंमतीवर करा किवा त्याचे एरियावर करा.

श्री दादा पाटील, उप—आयुक्त, कर :—सर, आपण आता मागच्या ६ महिन्यामध्ये

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर—मला ते उदाहरण दाखवा ते कसं झाल?

श्री दादा पाटील, उप—आयुक्त, कर :—ॲक्चुअली ती एक फाईल अशी होती सोना मार्केटची ॲक्चुअली त्या माणसाने फार कमी असेंसमेंट करून घेतली होती,तो एरिया मला वाटतं काही तरी १००००/—ते २००००/—हजार चौरस फुट होता आणि कर आकारणी फार कमी १००० वैगेरे बहुतेक झाली होती. ती केस मी वाचली आहे आणि मी ती फायनल केली आहे. असेंसमेंट फार कमी केली होती.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर —एक त्या असेसमेंटच रेंडम सर्व्हे करू एक १५ दिवस त्याअधिका—यांना पाच पाच मालमत्ताधारकांचे टार्गेट दया आणि रेंडम सर्व्हे करून आपल्याला कळेल काय आहे ते.एक एक्झरसाइज करू लेट मी इव्हरी बडी अन्डरस्टॅड.प्रॉपर्टी टॅक्स असेंसमेंट टॅक्स काय आहे ते समजून सांगा. एक फॉर्म दया,रोज पाच पाच दया किंवा १५ ते २० प्रॉपर्टीज पंधरा दिवसापर्यंत करून दयायचे टार्गेट दया. त्याचे रिपोर्ट येवू दया ५००प्रॉपर्टी तपासल्यावर किती अशा फॉल्टी निघतील.

सदस्य श्री भारत राजवानी— साहेब, अधिका—यावरती जो पर्यंत कार्यवाही होणार नाही तोपर्यंत काहीच होणार नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर — हया दोन गोष्टी करा नंतर बघू.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—किती भ्रष्टाचार आम्हीच दाखवून दिले आहेत तरी काहीच कारवाई होत नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर साहेब— हे काय झालेले आहे भ्रष्टाचार जो आहे तो काय एका दिवसात झालेला नाही आहे.हा वर्षानुवर्षे होत आलेला भ्रष्टाचारआहे.त्याला छेद दयायला पाहिजे होता हे आपल्या लोकांनी केलेल नाही.

सदस्य श्री भारत राजवानी—साहेब, याच्यामध्ये जे अधिकारी दोषी आहेत

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर— हयाच्यामध्ये अधिकारी आणि कर्मचारीच नाही तर सगळे लोक असतात. कोणी म्हणत माझ्याबरोबर चला माझं करून दया.

सदस्य श्री भारत राजवानी— साहेब हयाच्यामध्ये राजनेता आला असेल तर त्यालापण.....

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर —राजनेत्यालाच मी म्हणत नाही, सगळे असतात. कारण सगळयांना माहिती आहे.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी —चूक आहे ते चुकीचच असेल त्याच्यामध्ये राजनेता असो किंवा अधिकारी कोणीपण असू शकतो परंतु तुम्ही आमचे अधिकारी ठिक आहेत आणि राजनेता खराब आहे हे चुकीचं आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर — मी' राजनेता' शब्द उच्चारला नाही, त्यांनी उच्चारला म्हणून मी बोललो नाहीतर माझे कर्मचा—याची जबाबदारी शोधायचा प्रयत्न केला असता.आणि ही गोष्ट आम्ही चुकी करत नाहीचूकीचे बोलत आहे असेही नाही की ज्यामध्ये राजनेता एक पण मिळणार नाही.

सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी— पहीले कर्मचारी आणि अधिकारी यांना......

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर — ते माझं काम आहे ते मी करतो हे शिकवायची जरूरत नाही आहे.

सदस्य, श्री.सुनिल सुर्वे — जे कर्मचा—याने काम केल आहे तो नांव घेईल.

सदस्य, श्री राजेंद्र चौधरी— ही स्थायी समितीची मिटींग चालू आहे,आम्ही स्थायी समितीचे सदस्य आहोत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर— चुकीच्या पध्दतीने आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरांचे नाव घेवू नका चुकीच्या पध्दतीने नांव घेतलं तर मी जरूर बोलणार.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी—** आपण जरूर बोला.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर —** आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरांना ज्ञान शिकवायला कोणाला पॉवर नाही आहे.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी—** आम्ही कोणाला ज्ञान शिकवायला नाही आलो आम्ही स्थायी समितीचे सदस्य आहोत.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर —** ठिक आहे, ठिक आहे. सगळयांना माहित आहे.

**काही सदस्य :—**पास—पास……

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—** कर आकारणी नोंदवहीत एसीब्रिक्स ऐवजी आरसीसी अशी झालेली नोंद रदद् करुन त्यावरील (आरसीसीची) रक्कम निर्लेखित करणेबाबत.

**प्रस्तावना**

१) श्री. नरीमल परसराम चंदनानी ,बॅ. नं. ४५४ रुम नं. २, उल्हासनगर २. यांनी दि. १६/०५/२०१६ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत करपात्र मालमत्ता क्र 22 BI 016628500 [OLD NO. 22/0895, चे आकारणी विरूद्‌ध खालील बाबींबाबत हरकत दाखल केली आहे.

**विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते की .**

उल्हासनगर महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत संदर्भित मिळकतीकरिता नमुद असलेल्या करपात्र बाबीचा तपषिल पुढीलप्रमाणे

**मुदद्‌ा क्र. १)** कर भरण्यास प्रथम पात्र व्यक्ती म्हणून यापुर्वी रतनलाल हारुमल या नावाची नोंद होती त्याचे क्षेत्रफळ खालीलप्रमाणे

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वार्शिक भाडे | एकुण क्षेत्र | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| ब्ठतपो | ब्वउउ | १६४६८६ | ० | ३३६ | ० | ३३६ |
| ब्ठतपो | ब्वउउ | १६४६९१ | ० | ९६ | ० | ९६ |

उमपा नोंदीनुसार उक्त मिळकतीचे क्षेत्रफळ व एसीब्रिक्स वर्श २०१४—१५ पर्यत नोंद होती. तद्‌नंतर उक्त मिळकतीवर नांव हस्तांतरण (जा.क्र./उमपा/यु.३/२७३/१५.) दि.२२/०८/२०१५ या पत्रान्वये **श्री. नरीमल परसराम चंदनानी** अषी नोंद करण्यात आली आहे.

**मुदद्‌ा क्र.२)** तद्‌नंतर उक्त मिळकतीचे क्षेत्रफळात व बांधकाम प्रकारात फिल्ड बुक प्रमाणे वर्श २०१५—१६ मध्ये खालीलप्रमाणे **आरसीसी** बदल झाला आहे..

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वार्शिक भाडे | एकुण क्षेत्र | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| आरसीसी | अनिवासी | २१ ऑगस्ट १५ | ० | ३०० चौ फट | — | ३०० चौ फट |
| आरसीसी | अनिवासी | २१ ऑगस्ट १५ | ० | १०५ चौ फट | — | १०५ चौ फट |
| आरसीसी | अनिवासी | २१ ऑगस्ट १५ | ० | ३० चौ फट | १५ | १५ चौ फट |
| आरसीसी | अनिवासी | २१ ऑगस्ट १५ | ० | ५० चौ फट | २५ | २५ चौ फट |

**मुदद्‌ा क्र.३)** सबब महाराश्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील तरतुद नुसार मिळकतीचे नोंदीमध्ये आरसीसी ऐवजी एसीब्रिक्स अषी नोंद करणे

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वार्शिक भाडे | एकुण क्षेत्र | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| ब्ठतपो | ब्वउउ | १६४६८६ | ० | ३३६ | ० | ३३६ |
| ब्ठतपो | ब्वउउ | १६४६९१ | ० | ९६ | ० | ९६ |

वर्श २०१५–०१६ **एसीब्रिक्स** नुसार बिल जारी करावे. व तसेच वर्श २०१५–१६ ,२०१६–१७, व २०१७–१८ मध्ये लावण्यात आलेले **आरसीसी** नुसार बिल रदद् करण्यात यावे..

**मुदद्। क्र.४)** उमपा नोंदीनुसार तपासणी केली असता कर निर्धारणापासुन ते वर्श २०१४–१५ पर्यत एसीब्रिक्स नुसार खालीलप्रमाणे कर आकारणी होत होती. तद्नंतर वर्श २०१५–१६ मध्ये सुधारीत क्षेत्रफळ व बांधकाम प्रकार ( **आरसीसी** ) अषी दुरुस्ती फिल्डबुक प्रमाणे **मुदद्। क्र.२ नुसार** नमुद करण्यात आली आहे.त्याअनुशंगाने कर आकारणीत खालीलप्रमाणे वाढ झाली आहे.

| वर्ष | आरसीसी प्रमाणे कर आकारणी | एसी ब्रिक्स प्रमाणे कर आकारणी | अतिरिक्त कर आकारणी |
|---|---|---|---|
| २०१५–२०१६ | १०५५२ | ५९० | ९९६२ |
| २०१६–२०१७ | १०५६० | ५९० | ९९७० |
| २०१७–२०१८ | १०३४० | ५९० | ९७५८ |
| **एकुण** | **३१४६०/–** | **१७७०/–** | **२९६९०/–** |

तरी विषयांकित प्रकरणी अतिरिक्त कर आकारणीची **रु. २९६९०/–** हि रक्कम निर्लेखित करणेकामी मा. स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित.

**स्थायी समिती ठराव क्र.** ५५ **दिनांकः–१६/११/२०१७**

सुचकाचे नाव :– श्री. जमनादास पुरस्वानी
अनुमोदकाचे नाव :– श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार कर आकारणी नोंदवहीत एसीब्रिक्स ऐवजी आरसीसी अशी झालेली नोंद रदद् करुन त्यावरील (आरसीसीची) अतिरिक्त कर आकारणीची **रु. २९६९०/–** ही रक्कम निर्लेखित करण्याचा प्रस्ताव फेरसादर करण्यास प्रशासनास निर्देश देत आहे.

तसेच

१. याबाबत अपुर्ण जे प्रश्न आहेत ते उत्तरासोबत संपुर्ण माहिती आणणे आवश्यक आहे.

२. सन २०१५–१६ मध्ये एसीचे आरसीसी कसे झाले याबाबत अहवाल देणे आवश्यक राहील.

३. याबाबत जेवढे विषय प्रलंबित आहेत ते एकाच वेळी सादर करण्यात यावे.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

**काही सदस्य** :–पास–पास......

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ३ :–** गजानसिंग सुमरासिंग लबाना या नावाची (कर पावती जुना क्र.२४/०६९४ हि) मालमत्ता रदद् करणे व त्यावरील लागु करणेत आलेला मालमत्ता कर निर्लेखित करणेबाबत

<u>प्रस्तावना</u>

श्री मंजुनाथ तुकोबा रेवणकर रा. बॅ.६६४समोर विमलेष्वर निवासजवळ,उल्हासनगर – २. यांनी दि. १०/०४/२०१७ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीतील करपात्र मालमत्ता क्र. 24BI017137000[OLD NO. 24/0694 चे आकारणी विरूद्ध खालील बाबींबाबत हरकत दाखल केली आहे.

<u>विशय :– गजानसिंग सुमरासिंग लबाना या नावाची (कर पावती जुना क्र.२४/०६९४ हि) मालमत्ता रदद् करणे व त्यावरील लागु करणेत आलेला मालमत्ता कर निर्लेखित करणेबाबत.</u>

विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते की महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत वर्श १९८६ मध्ये नोंद करण्यात आलेल्या मालमत्तेचा तपशिल पुढील प्रमाणे .

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वार्शिक भाडे | एकुण क्षेत्र | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| मोकळी जागा | निवासी | ०१/०४/८६ | ० | ४००चौ. फुट | – | ४००चौ. फुट |
| ए सी ब्रिक्स | निवासी | ०१/०४/८६ | ० | ३२०चौ. फुट | – | ३२०चौ. फुट |

अशी नोंद असुन सदरची मिळकत हि गजानसिंग सुमरासिंग लभाना यांचे नोंद आहे.

परंतु सदरची मिळकत हि अर्जदार मंजुनाथ रेवणकर यांची असल्याने सदर मिळकती संदर्भात दिवाणी न्यायालयात केस दाखल केली होती. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार श्री. मंजुनाथ रेवणकर यांचे बाजुने न्याय निर्णय झाला असुन दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचेकडील हुकुमनामा, पंचनामा, ताबापावती इत्यादीनुसार सदरची मिळकत सध्या श्री.मंजुनाथ रेवणकर यांचे ताब्यात असल्याने श्री. गजानसिंग सुमरासिंग लभाना यांचे नांवे असलेली मिळकत क्र. 24BI017137000[OLD NO. 24/0694 ची नोंद रदद् करुन त्यावरील वर्ष 2017–18 पर्यत आकारण्यात आल्याने एकूण थकबाकी रक्कम रू. **46,945/– विलंब शास्ती** ऐवढी असल्याचे दिसुन येते. ही रक्कम वसुल न होण्याजोगे आहे, असे इकडील मत आहे.

सबब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 152 नुसार महानगरपालिका कर आकारणी वहीतील मिळकत क्र. 24BI017137000[OLD NO. 24/0694 ची नोंद रदद् करुन त्यावरील वर्ष 2017–18 पर्यत आकारण्यात आलेली एकूण थकबाकी रक्कम रू. 46,945/– विलंब शास्ती मा. स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेकरिता मा. स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ५६ <u>दिनांक:– १६/११/२०१७</u>

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार गजानसिंग सुमरासिंग लबाना या नावाची (कर पावती जुना क्र.२४/०६९४ ) ही मालमत्ता नोंद रदद् करुन त्यावरील वर्ष २०१७–१८ पर्यत आकारण्यात आलेली एकूण थकबाकी रक्कम रू. ४६,९४५/– विलंब शास्ती निर्लेखित करण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

**महापालिका सचिव** :— विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. ३** :— गजानसिंग सुमरासिंग लबाना या नावाची (कर पावती जुना क्र.२४/०६९४ हि) मालमत्ता रदद् करणे व त्यावरील लागु करणेत आलेला मालमत्ता कर निर्लेखित करणेबाबत

---

**सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी—** या विषयामध्ये एक शंका आहे, ठिक आहे, एकाची असेल किंवा दुस—याची असेल परंतु त्याची जी देयकाची रू.४६९४२/—इतकी रक्कम आहे ती निर्लेखित का करत आहे. मी म्हणतो की ही माझी प्रॅापर्टी आहे चौधरी साहेब बोलतात माझी प्रॅापर्टी आहे. कोर्टाने सांगितले की ही चौधरी साहेबांची प्रॅापर्टी आहे तर त्यांनी रू ४६९४२ —रक्कम भरणार.

**सदस्य, श्री राजेंद्र चौधरी—** मला प्रॅापर्टी मिळाली तर भरणार.

**सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी—** यामध्ये लिहिले आहे की टॅक्स ही निर्लेखित करा. हे कसं.

**श्री दादा पाटील, उप—आयुक्त, कर** :—प्रॅापर्टी एकच आहे. एकच माणुस भरतो आहे.

**सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी—** प्रॅापर्टी एक आहे आणि मालक पण एकच आहे परंतु त्यांच्या दोघांमध्ये डिस्पूट होत.हा बोलतो माझी प्रॅापर्टी, तो बालतो माझी प्रॅापटी आहे. दोघेही कोर्टात गेले. त्यांच्यामधून एकाला आदेश दिला की ही तुमची प्रॅापर्टीआहे. जर मालमत्ता देयकात दुस—याचे नांव असेल तर फक्त त्याच्या नावात बदल करा,त्याचे रू.४६ हजार का निर्लेखित करत आहोत.

**श्री दादा पाटील, उप—आयुक्त, कर** :—आता ही प्रॅापर्टी ज्याच्या नावावर आहे तो पैसा भरेलना.पहिला जो आहे तो पैसे भरणार नाही कारण त्याची प्रॅापर्टी नाही.

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी—** श्री. दादा पाटील, महानगरपालिकेला तर टॅक्स रू. ४६हजार येतील ना.

**सदस्य, श्री.भारत राजवानी—** हा तोटा कशाला.

**सदस्य श्री जमनादास पुरस्वानी—** रिकवरी तर कोणाकडूनतरी व्हायला पाहीजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर** — प्रॅापर्टी आलवेज कॅरी इज ऑल राइटस ॲन्ड बेनीफीटस त्यामुळे त्याचे आणिलाइबीलीटी हे त्याच्या नावावर राहायला पाहिजे. जे काय आउटस्टॅडींग आहे ते तर मग लाइटचे बील थकवेल लाखो रूपयाचे आणि प्रॅापर्टी विकेल. तो नविन माणूस म्हणेल माझ नाही म्हणून. नाही नाही हे रदद करा.

**सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी—** बरोबर नाही आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर** — हे कशा पध्दतीचे असेल त्या प्ररूतावास आनुच नका. तुम्ही बील लावलं पाहिजे.

**सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी—** रूपये ४६ हजार कोणीतरी भरले पाहिजेत. हा विषय अमान्य, अमान्य.

**काही सदस्य** :—होय अमान्य करा.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड**:— सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ३** :— गजानसिंग सुमरासिंग लबाना या नावाची (कर पावती जुना क्र.२४/०६९४ हि) मालमत्ता रदद् करणे व त्यावरील लागु करणेत आलेला मालमत्ता कर निर्लेखित करणेबाबत

<u>प्रस्तावना</u>

श्री मंजुनाथ तुकोबा रेवणकर रा. बॅ.६६४समोर विमलेष्वर निवासजवळ,उल्हासनगर – २. यांनी दि. १०/०४/२०१७ रोजीच्या अर्जान्वये महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीतील करपात्र मालमत्ता क्र. 24BI017137000[OLD NO. 24/0694 चे आकारणी विरूद्ध खालील बाबींबाबत हरकत दाखल केली आहे.

<u>विशय :– गजानसिंग सुमरासिंग लबाना या नावाची (कर पावती जुना क्र.२४/०६९४ हि) मालमत्ता रदद् करणे व त्यावरील लागु करणेत आलेला मालमत्ता कर निर्लेखित करणेबाबत.</u>

विषयांकित प्रकरणी सादर करण्यात येते की महानगरपालिका कर आकारणी नोंदवहीत वर्श १९८६ मध्ये नोंद करण्यात आलेल्या मालमत्तेचा तपशिल पुढील प्रमाणे .

| बांधकाम प्रकार | वापर | करयोग्य मुल्यासाठीचे दर | वार्शिक भाडे | एकुण क्षेत्र | करमाफ क्षेत्र | करपात्र क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|
| मोकळी जागा | निवासी | ०१/०४/८६ | ० | ४००चौ. फुट | – | ४००चौ. फुट |
| ए सी ब्रिक्स | निवासी | ०१/०४/८६ | ० | ३२०चौ. फुट | – | ३२०चौ. फुट |

अशी नोंद असुन सदरची मिळकत हि गजानसिंग सुमरासिंग लभाना यांचे नोंद आहे.

परंतु सदरची मिळकत हि अर्जदार मंजुनाथ रेवणकर यांची असल्याने सदर मिळकती संदर्भात दिवाणी न्यायालयात केस दाखल केली होती. मा.न्यायालयाच्या आदेशानुसार श्री. मंजुनाथ रेवणकर यांचे बाजुने न्याय निर्णय झाला असुन दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचेकडील हुकुमनामा, पंचनामा, ताबापावती इत्यादीनुसार सदरची मिळकत सध्या श्री.मंजुनाथ रेवणकर यांचे ताब्यात असल्याने श्री. गजानसिंग सुमरासिंग लभाना यांचे नांवे असलेली मिळकत क्र. 24BI017137000[OLD NO. 24/0694 ची नोंद रदद् करुन त्यावरील वर्ष 2017–18 पर्यत आकारण्यात आल्याने एकूण थकबाकी रक्कम रू. **46,945/–** **विलंब शास्ती** ऐवढी असल्याचे दिसुन येते. ही रक्कम वसुल न होण्याजोगे आहे, असे इकडील मत आहे.

सबब, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 मधील कलम 152 नुसार महानगरपालिका कर आकारणी वहीतील मिळकत क्र. 24BI017137000[OLD NO. 24/0694 ची नोंद रदद् करुन त्यावरील वर्ष 2017–18 पर्यत आकारण्यात आलेली एकूण थकबाकी रक्कम रू. 46,945/– विलंब शास्ती मा. स्थायी समितीच्या मंजुरीने निर्लेखित करणेकरिता मा. स्थायी समिती पटलावर मंजुरीकरीता प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ५६ <u>दिनांकः– १६/११/२०१७</u>

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार गजानसिंग सुमरासिंग लबाना या नावाची (कर पावती जुना क्र. २४/०६९४ ) ही मालमत्ता नोंद रदद् करुन त्यावरील वर्ष २०१७–१८ पर्यत आकारण्यात आलेली एकूण थकबाकी रक्कम रू. ४६,९४५/– विलंब शास्ती निर्लेखित करण्याचा प्रस्ताव अमान्य करीत आहे.

सुचकाची <u>सही/–</u>

अनुमोदकाची <u>सही/–</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव :–** विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ४ :–** उल्हासनगर–३ येथिल सपना उदयान येथे सिंधुभवन व आजुबाजूचा परिसर विकसित

करणेकरीता निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

---

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी–** एक अपूर्ण होतं आज आता पूर्ण आणले आहे.

**सदस्य, श्री सुनिल सुर्वे–** एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे हे जे सिंधू भवन बनेल ते शहरातील सर्व लोकांसाठी असेल. इथे मी सर्व स्थायी समिती सदस्यांना निवेदन आहे की यानंतर आपण अशी कंडीशन टाकायची की परत कोणी भाडयाने किवा दुसरं कोणी घेत आहे.–या

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर –**नाही नाही भाडयाने नाही देणार.

**सदस्य, श्री सुनिल सुर्वे–** साहेब टाउन हॉलच असच झालेल आहे, आणि आमची दुसरी कोणतीही वास्तु वाचलेली नाही आहे. सदरची वास्तु आम्ही लोक रू.४ करोड खर्च करत आहोत,पैसे आम्ही लोक लावणार ,बनवणार आणि दलाल नाममत्र भाडे रू. २० हजार ते ३०हजार देवून ते घेतात.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–** अगोदरच याच्यामध्ये मी जेव्हा पहिल्यावेळेस साईट विजीट केली त्याच वेळेसआमदार मॅडमला सांगितले की ही वास्तु खुप चांगली बनवायची आणि हया वास्तुला कधीपण प्रायव्हेट तत्तावर दयायच नाही,अशी ही मोठी वास्तु राहणार, त्याच्यासाठी मॅनेजर ठेवून त्यांना स्टाफ देणार, यामध्ये लोकांचा फायदा होईल. आज जर कर्मेशिअल रेट प्रमाणे केले तरी अर्धे आपण चालवू शकतो, तरी पण दोघांचा फायदा आहे. ही गोष्ट आपण करत आहोत.

**सदस्य, श्री सुनिल सुर्वे–** बस, तेवढी अट राहली पाहिजे, फार गरजेची आहे.

**श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर:–** त्याच्यामध्ये असा विषय आहे की आपण पहिली निविदा रू. १ कोटी आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–** तो वेगळा विषय आहे. आता हे झाल. आता हे मेन बांधण्याचा विषय आहे.

**सदस्य, श्री सुनिल सुर्वे–** बांधल्यानंतर , आता बांधायला देतो त्याचवेळी ही अट टाकू.

**श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर:–** साहेब, हयामध्ये विषय असा आहे, मुळ निविदा आहे रू.१करोडची

**सदस्य, श्री सुनिल सुर्वे–** हां बरोबर.

**श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर:–** आणि त्याच निविदाधारकाला आपण रू. ३ कोटी ९१ लाख वेगळ देताय.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–** प्रस्ताव लिहिला, हे टेंडर

**श्री. दादा पाटील, उप–आयुक्त, कर:–** त्यामुळे काय आहे.

**सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी–** यामध्ये काय आहे, नाही, नाही निविदा कशी काढणार आपण, उदा. मी एक इमारत तयार करत असून एका ठेकेदाराला काम दिलं. त्याने ...... काढला एक स्लॅब टाकला, दुसरा स्लॅब टाकला बाकीचे चार स्लॅब दुसरे ठेकेदाराला देवू, गॅरंटी कोण देणार. ज्यावेळेस बिंल्डीग कोसळली तर तो म्हणेल मी ....काढलेले नाही. जर वरती आपण बनवत असाल तर खाली बनवलेल्या ठेकेदार म्हणणार माझ काय काम. जुन्या ठेकेदारालाच देऊन टाका आज पण कोणाला जबाबदारी टाकणार, नविन ठेकेदारावरती की जुन्या ठेकेदारावरती.बिल्डींगला काही झालं तर.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–**त्याच स्ट्रक्चरल इनव्हेस्टीगेशन, केले पाहीजे.

**सदस्य श्री. दिपक सिरवानी:–** ज्याचे काम आहे त्यांनी जर पूर्ण केल तर आपण दुस–याचे निविदा काढू शकतो.

<u>सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी</u>–करू शकतो, त्याच अटी शर्तीवर बिल भरल असेल त्याच अटी शर्तीवर त्याला दयायला पाहिजे.

<u>सदस्य, श्री सुनिल सुर्वे</u>– जमनाजींच्या विधानास आम्ही सहमत आहोत, मी तरी सहमत आहे. त्याच असे आहे की समाजाची एक भावना जोडलेली आहे. जर हे टेंडर प्रोसेसर होत गेली आणि पहिल्याने चांगल काम केल आहे,आणि पूर्ण करत असेल, तो जबाबदारी घेवून काम करण्यास तयार असेल,जमनुजीने जे सांगितले,कामाची जबाबदारी त्यालाच दया. माझ सगळयांना निवेदन आहे की काम लवकर होईल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:</u>– आजच्या तारखीमध्ये करंट स्टेटस काय आहे?

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:</u>–प्लान पहिलेच पास झालेला आहे

<u>श्री राम जैसवार</u>–ग्राऊंड प्लोअर जो आहे त्याचा रू. १ करोडची निविदा झाली आहे. त्याचे काम झाले आहे. थोडेसे स्लॅब बाकी आहे. पहीला व दुसरा माळा पुर्ण झाला आहे. आता आम्ही नविन निविदा मागविणार. हे काम ३.९१ कोटीचे आहे.

<u>सदस्य, श्री दिपक सिरवानी</u>–कारण की मी अजून पर्यंत पाहिलेले नाही,प्लान पहिलच पास झालेला आहे.

<u>शहर अभियंता श्री राम जैसवार</u>–हे एक्सटेंशन च आहे, रू. ३.९१ करोडचे महासभेत पास आहे. आम्ही नविन प्रपोजल बनवून निविदा

<u>सदस्य, श्री सुनिल सुर्वे</u>– जर चांगल काम केेल असेल तर आपल काय म्हणणे आहे, अधिका–याचे काय मत आहे.

<u>सदस्य, श्री.जमनादास पुरस्वानी</u>–हयाच्यामध्ये काय होत आहे सुर्वे साहेब, अपले घर जरी बनवायच असेल तरआणि एखादा ठेकेदार काम करत आहे, आणि अर्ध्यामध्ये रू ५ ते रू. १० वाढवून मागत असेल मी तो देणार. कारण रिस्क कोण घेणार. आज एकाने प्लींथ टाकला, स्लॅब टाकला आणि आरसीसी स्ट्रक्चर उभे केले.आणि दुस–या ठेकेदाराने खराब काम करून ते पडलं तर खालचा ठेकेदार वरच्याला म्हणेल आणि वरचा ठेकेदार खालच्याला म्हणेल. हे काम तर व्हायला पाहिजे होते की एकाच ठेकेदाराला देवून टेंडर करून घ्यावे.आणि अर्धे अर्धे बनवत असेल तर त्याच ठेकेदाराला सांगणे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>–ग्राऊंड़ प्लस १ची होती, आता आम्ही जी प्लस तीन करत आहोत . एकामध्ये पहीले ग्राउंड होते. त्याचे रू १.२५ करोड चे निविदा झाली होती. बरोबर आहे.आता आम्ही ग्राउंड प्लस दोनकरत आहेत, ज्याच्यामध्ये आम्ही एस्टीमेट बनवल तेव्हा आम्ही ग्राउंड प्लोअर चे समोर ठेवले, परत ग्राउंड प्लोअर मध्ये तेच डिझाइन दिले होत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>–बरोबर, जी टू च डिझाइन घेवूनच एस्टीमेट घेतले आहे. ज्याचे रू. १.२५ करोड च अगोदरच काम केलेल आहे.

<u>सदस्य, श्री सुनिल सुर्वे</u>– नाही साहेब, दुसरी गोष्ट अशी की त्या वेळेस रू. १कोटीचा निधी ठेवला होता.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>–नाही, टेक्नीकल जे म्हणताय ते.

<u>सदस्य, श्री सुनिल सुर्वे</u>–टेक्नीकलच यांनी केल. पण रू.१ कोटीच जे तेव्हा,वदारियाजी आपल्याला माहित आहे. हे आम्ही लोकांनी त्यावेळस एक कोटीचाच निधी होता.

<u>सदस्य, श्री राजेश वदारीया</u>– त्यावेळेस बजेटमध्ये अडचण होती, निधी एक करोडचा होता.आपल्याकडे बजेट जास्त नव्हते, त्यामुळे मजबूरी होती म्हणून एक करोडचा ठेवला होता. या वर्षाच्या बजेट मध्ये जास्त पैसे ठेवतहया वर्षामध्ये कोणत्याही परीस्थितीत पूर्ण झाले पाहीजे.

<u>सदस्य, श्री भारत राजवानी</u>– तरतुद आधीच ठेवली पाहिजे.

<u>सदस्य, श्री राजेश वध्दारीया–</u> जमुनादासने जी जबाबदारीच सांगीतले की एकाने अर्धे बनवल दुस–याने अर्धे बनवल तर एस्टाब्लीशच प्रकरण होवू शकत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–</u>त्याचे आपण जेव्हा पाट्रोलच काम केले होते त्यावेळेस ५.६ चा विषय आला होता. ते पण ४ कॉन्ट्रक्टर मिळून रू. १ करोड, रू. १.२५ करोड, रू. १.५०करोड एकत्र ... हे तर एकाच कॉन्ट्रक्टरला सव्वा करोडच काम दिलेले आहे.

<u>सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी</u>– हे काय आहे, पाटोलच्या कामासाठी आपण रू.१ करोडच टेंडर काढल. रू. २५ लाख ,रू.५० लाखाचे काम वाढत असेंल हे तर पाटोल्स नाला,नाली नाही आहे हे स्ट्रक्चर इमारत आहे.आणि एक इमारत उभी करायची, ५०० ते १००० लोक बसू शकतील,भरपूर कार्यक्रम होतील.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–</u>दुस–यामध्ये टेंडरच जे प्रोपरायटी आहे. कोड ऑफ टेंडर जे आहे त्याला आपण १०टक्के पेक्षा जास्त दिले तरी ३०० टक्के जास्त काम देत आहे.त्याला ऑडीट मध्ये अडचण निर्माण होत आहे. आता जे ऑडीट होत आहे,त्याच्यात फसण्याची शक्यता आहे.हा एवढा मोठा पॅरा असेल की पब्लीक अकाउंटस कमिटी समोर येणार.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी::–</u>साहेब, यात इश्यु असा होणार आहे की, एस.टी.पी. चे रू. ३२ करोडच काम आहे. त्यामध्ये रू.४ करोड जास्तीचे आयटम आहे. सव्वा चार करोड एक्सट्रा आयटम पास करून दिलेले आहेत. काम करण्याच्या वेळेस अशी परिस्थिती होते की, त्यावेळेस १ वर्ष, २ वर्ष ३ वर्ष पहिले तर अंदाज नव्हता, परंतु त्यांनी एवढया वेळात प्लिंथ,स्टील वैगेरे टाकला आहे. आता एस्टाल्बिटीची गोष्ट आहे की पहीला कॉन्ट्राक्टर म्हणणार मी तर चांगल काम केलेले आहे.वरच्या कॉन्ट्राक्टरने चांगल नाही केल. जी लाइबीलीटी बदल होत आहे. एकमेकावरती ढकलाढकली होत असते.

<u>सदस्य श्री सुनिल सुर्वे–</u>हे ॲज ॲट पार आहे. तर ठिक आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–</u>ते ३ वर्ष पहिल्याचा रेट आहे. त्यावेळेस ५ टक्के जास्त तुम्ही केल.आहे. आज स्पर्धा आहे किंवा काय?हयाच आपल्याला काय माहिती?

<u>सदस्य,श्री जमनादास पुरस्वानी</u>– डी एस आर रेट पहिल्यापेक्षा कमी झाले आहेत. जर ५टक्के डी एस आर असेल तर आजच्या डी एस आर च्या ५ टक्के वाढवून देणार ना. त्या वेळेसच्या डी एस आर मध्ये थोड वाढवून देणार. ५टक्के वाढवणार म्हणजे आजच्या सरकारी डी एस आर रेटच्या ५टक्के रेट वाढवणे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> एक काम केल पाहीजे त्याच्याकडूनं आपण निविदा मागवायला पाहिजेत. टेंडर मागवल्यानंतर त्याची फायनाशीअल ऑफर काय आहे.त्याच्यानंतर फारतर विचार करायला पाहिजे. जर टेंडर मध्ये कमीतकमी येत असेल.त्यावेळेस या कामाचाविचार केला पाहिजे. की कमी बील त्या रेट प्रमाणे कॉन्ट्रक्टर कडून आले असेल.तर काही अडचण होणार नाही. तर दुसरा कॉन्ट्रक्टर या रेट पेक्षा कमी रेट ने भरत असेल ता आपण त्यावेळी निर्णय घेवू शकतो. की यांचे कमी रेट आहे आणि तो कमी रेट प्रमाणे काम करण्यास तयार आहे. आणि त्याला परत रिजन सांगण्यात येवून कमीत कमी चा रेट सोडून त्याच रेटला आपण दुस–याला देवू शकतो.अस आपण सांगू शकतो.

<u>सदस्य, श्री सुनिल सुर्वे–</u> विचार करा.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>:–हा एक उपाय होवू शकतो.

<u>सदस्य, श्री सुनिल सुर्वे</u>– हा उपाय ठिक आहे. परंतु,

<u>सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी</u>–सोडूनदया, ठेकेदाराचे एक, दोन टक्कयाचा फरक असेल तर त्याला बोलवून

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> नाही, नाही,कसं होत,निविदा आल्यानंतर कमी रेट असेल, वो रेट

सदस्य, श्री सुनिल सुर्वे–जमनुजी ,हया कामाला उशीर होवू शकतो. जी समाजाची भावना आहे. आमदार साहेबांना पण आपला फंड रू.५० लाख दिलेले आहे.

सदस्या श्रीमती डिंपल ठाकुरः–लेट होवून जाईल.

सदस्य, श्री सुनिल सुर्वे–उशीर होईल, अडचण होईल.

सदस्य, श्री भारत राजवानीः– सहमती तर सगळयांची आहे.

सदस्य, श्री सुनिल सुर्वे– सहमती स्थायी समितीच्या सर्व सदस्यांची आहे.

सदस्य श्री. राजेंश वदारियाः– रू. ४ करोडच ज्यादा देवून स्थायी समिती मध्ये घेतल नाही.

सदस्य, श्री जमनादास पुरस्वानी– नंतर संमंती दिली.

सदस्य, श्री सुनिल सुर्वेः– माझ्या मते , हे काम त्यालाच देवून लवकरात लवकर सुरू कराव. आणि जेणेकरून लवकर सिंधू भवन तयार होईल.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः–जे एस्टीमेट आहे,त्यात जे आयटम आहे. त्याच्यामधील ४०टक्के आयटम वेगळे आहे.

सदस्य, श्री जमनादास पुरस्वानीः– आर सी सी आहे ना.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः– नाही नाही बाकी, वरती कॉस्मेटीक हॉल बनवत आहोत तो पूर्णपणे एअर कंडिशन सोबत खुर्च्या स्टेज सहित करत आहोत.मॅडम यांना पण सांगितल की ही वास्तू खुप चांगल्याप्रकारे अद्यावत हॉल बनविला जाईल.नंतर त्याच्यामध्ये प्रेझेंटेशन वैगेरे घेता येईल. माझ अस म्हणणें आहे टेंडर काढून त्यांना प्रधान्य दयायचे. आपल्याकडून कमीतकमी आर्थिक तोटातर होणार नाही.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः–जो रेट असेल तो रेट दयायला काहीच हरकत नाहीना. तो जर त्याच रेट मध्ये करायला तयार असेल.

सदस्य, श्री. जमनादास पूरस्वानीः– ज्या अटी ने पहिले काम घेतले होते.

सदस्य, श्री.सुनिल सुर्वेः– हां.

सदस्य, श्री. जमुनुदास पूरस्वानीः–त्या अटीने काम करायला तयार आहेत.

सदस्य, श्री.सुनिल सुर्वेः–काही अडचण नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः– म्हणजे ५टक्के जास्तीने.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः– डी ऐस आर प्रमाणे त्याने पत्र वैगेरे दिले आहे का?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर– त्याला पिविदा प्रक्रीयेसाठी किती वेळ आहे. २१ दिवस, नाही नाही,निविदा जाहीरातीसाठी किती वेळ आहे.

श्री. राम जैसवार, शहर अभियंताः– २१ दिवस.

सदस्य श्री.सुनिल सुर्वे– एक दोन आहेत , त्याचा निर्णय आम्ही लोक घेणार आहोत.

सदस्य श्रीम. डिंपल ठाकुर – काही अडचण नाही आहे.

सदस्य श्री.सुनिल सुर्वे– प्रत्येक काम आपल्या महापालिकेच्या आवाक्ययातले सर्व उशीराच होतात आम्ही शहराला काय देवू शकत नाही.अशी स्थिती आहे. प्रत्येक गोष्ट आम्ही लेट करतो एक,एक महिना

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर – दोन तीन दिवसात तुमची निविदा येणार आहे.

सदस्य श्री.सुनिल सुर्वे— साहेब काय सांगू तुम्हाला. त्याचे पण तुम्हाला कधी दिले.

सदस्य श्री भारत राजवाणी—आज नगरसेवक एक एक महिना

सदस्य श्री. जमनादास पूरस्वानी—आज आपल्याजवळ पाटोल चा इश्यु आहे. आम्ही जुलै, ऑगस्ट तध्ये ५.२२ पास केल.इश्यु झाला टेंडर चालू झाल,नेगोशिएशन झाल,रिकॉल झालं,नंतर टेंडर झाल्यानंतर स्थायी समिती मध्ये मंजूरी देण्यात आली.आणि दिवाळी जाउन नंतर काम चालू झाल.

सदस्य श्रीमती डींपल ठाकुर— तीन तीन महिने लागत आहेत.

सदस्य श्री.सुनिल सुर्वे— कद. १७, १८ नोव्हेंबरला काम नाही चालु झालना.

सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी—हायवेला डांबरची कामे चालु झालेली आहेत.

मा. आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—ईविरिअन्स आपले १७ ऑक्टोबर र्प्यंत आहेत.

सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी—केडीएमसी, टीएमसीनगरपानित सगळया ठिकाणी पाटोल भरले गेले आहेत.

सदस्य श्री भारत राजवाणी—नाही, नाही आमच्यापेक्ष छोटया नगरपालिकेमध्ये काम चालू झाली.

सदस्य श्री.सुनिल सुर्वे— तुम्ही जर प्रयत्न करत असाल तर , हे ताबोडतोब वर्क ऑर्डर देऊन काम चालू कराव. ४, ८ दिवसात काम सुरू कराव. कारण की येथे तुम्ही जिआयएस पाईप च बघितल अजून टेडर नाही झाल. आपण घाई केली. आपण मान्य केले.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर—मी त्याच्याशी बोलतो.

सदस्य श्री.सुनिल सुर्वे— नाही पण ते उशीर झा लना. अजून काय ते झाल नाही.

सदस्य श्री.राजेश वदारिया—जसे साहेब हे याच्यामध्ये इश्यु आहे,एसी कॉन्ट्रक्टरला काम देवून त्याप्रमाणे काम करवून घ्यावे लागेल.

सदस्य श्री.सुनिल सुर्वे— ते काम सतत चालू आहे का? ते सतत (कंटिनिव्यू) चालू ठेवेल.

मा.आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर—विदाऊट असेंसिग द मार्केट, विदाऊट व्हॅल्यूएटींग द डेट किंवा इस्टीमेट. जे इस्टीमेट होत तेच आरसीसी च पण झाले असते.जे पहिले काही काम होते ते पण आपल पहिल्या माळयासारख आहे. बरोबर,आणि दुसरा माळा जो आहे,एकदम परीपूर्ण अ‍ॅडव्हान्स ऑडोटोरिअम वैगेरे बनवल जाईल.

सदस्य श्री.राजेश वदारिया—ते तर सिव्हिल च काम आहे,ते तर दोन भाग करून दिल पाहिजे. जस एसटीपी च काम काढल,तर एसटीपीच काम कस काय काढल? सिव्हिल काम पहिले काढले आहे. मॅकॅनिकलच रू.४करोडच काम बाजेला ठेवलेल आहे.ते नंतर काढायचे.पहिले सिव्हिलच झाल्यानंतरच मॅकॅनिकलच होणार ना. मॅकॅनिकलच पण टेंडर काढून आपल्याला फायदा काय आहे.जे पण एसी च प्रोव्हिजन ठेवलेल आहे.

सदस्य श्री. जमनादास पूरस्वानी—त्याला पहिले ८महिने,९महिने पूर्ण बिल्डींग कन्सट्रक्शन आरसीसी

मा. आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर—त्याचे जर सेप्रेशन केले तर कस होणार. स्ट्रक्चरलचे आणि सिव्हिल वर्क जे आहे ते बाकी आहे. काय आहे कॅम्पोनट?

शहर अभियंता, श्री. राम जैसवार—रू.२.५ करोडच.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर—अडीच करोडच काय?आणि रू.१.५० करोडच आसपास झालेले आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी—हे एक काम केल ते जे सॉफ्टवेअरच रू. २.५० करोडच काम आहे. त्याच्यामध्ये तर काही आहेच नाही. टेंडरची प्रक्रिया झालेली आहे. अरे बाब, पहिले जे रू. १ करोडचे झाले आहे दृ हे नाही सांगत आहे. त्याला आरसीसी त्याचप्रमाणे कामाचे टेंडर झाल आहे, त्यालाच वाढवून देऊ शकता.त्याच्यात तर कोणचा तोटा

होणार नाही. बाकी राहिलेल आहे रू.१.५० करोडच काम. त्यालाच अटी शर्तीच च पत्र देवून ५टक्के वाढवून दया.काही फरक पडत नाही.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>यास प्रलंबित ठेवा.

<u>काही सदस्य :–</u>विषय वगळण्यात यावा.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र.** ४ :– उल्हासनगर–३ येथिल सपना उदयान येथे सिंधुभवन व आजुबाजूचा परिसर विकसित करणेकरीता निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर-३ येथील सपना उद्यान येथे तळमजला + पहिला मजला असे सिंधुभवन बनविणेकरीता सन्माननिय सदस्यांनी विनंती केल्यानुसार सदर कामाचे (तळमजला बांधकामाचे ) रु.१,००,२०,०००/- एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करुन ई निविदा प्रक्रिया करण्यात आली. यामध्ये सल्लागारांचे शुल्क, कामाच्या बांधकामाची गुणवत्ता तपासणी, इत्यादी बाबी समाविष्ट करुन एकूण १,२५,००,०००/- एवढी रक्कम होत होती. सदर कामाच्या ई निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे. सतिश कंन्स्ट्रक्शन यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले. सन्माननिय सदस्यांनी जरी तळमजला + पहिला मजला बांधणेकरीता मागणी केली असली तरी महापालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता सदर सिंधुभवनच्या फक्त तळमजल्याचे काम हाती घेण्यात आले होते. सद्यस्थितीत प्लींथचे काम पूर्ण करण्यात आले असून तळमजल्याचे आर.सी.सी चे काम पूर्ण झाले आहे.

दिनांक २७/०९/२०१७ रोजी मा.आमदार, मा.आयुक्त, माजी नगरसेवक श्री.नरेंद्र ठाकुर, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व उप-अभियंता यांनी सिंधुभवनची पाहणी केली असता सिंधुभवनच्या दुस-या मजल्यावर मीनी थिएटर बनविणेच्या सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे महापालिकेच्या पॅनलवरील स्थापत्य सल्लागार मे.नोबल जिओ स्ट्रक्ट यांचेमार्फत सदर सिंधूभवन विकसित करणेच्या कामाचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर प्राकलनात पहिल्या मजल्याचे आरसीसी बांधकाम, टाईल्स, कंपाउंड वॉल बनविणे व दुसऱ्या मजल्यावर मिनी थिएटर, सिंधू भवनच्या आजूबाजूचा परिसर विकसित करणे, विद्युतीकरण करणे इत्यादी कामाचा समावेश आहे. सदर कामाची प्राकलनिय किंमत रुपये ३,९१,००,०००/- एवढी होत आहे. सदर कामाकरीता महापालिकेच्या वर्ष २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रु.४.०० कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. मा.आमदार श्रीमञ्ज्योती सुरेश (पप्पु) कालानी यांनी त्यांचे दिनांक १२/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये रुपये ५०.०० लक्ष मिळणेस मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे विनंती केली आहे.

मा.आमदार महोदया, स्थानिक नगरसेविका यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये विनंती केल्यानुसार तसेच सदर कामाकरीता मा.महासभा ठराव क्र.२७ दिनांक १९/०७/२०१७ अन्वये मान्यता मिळाली आहे.

तरी सिंधुभवन येथे दोन मजले बनविणे व आजूबाजूचा परिसर विकसित करणेच्या कामाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळावी तसेच सिंधुभवनचे (तळमजल्याचे ) बांधकाम करणेकरीता यापूर्वी निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रियेत निम्न दराचे मे.सतिश कंन्स्ट्रक्शन यांचेतर्फे सद्यस्थितीत काम सुरु आहे. तथापी, पहिल्या मजल्याचे कामाचे तयार केलेल्या प्राकलनानुसार पुन्हा निविदा प्रक्रिया केल्यास स्पर्धात्मक प्रतिसाद, प्राकलनिय किंमतीपेक्षा जास्त दराची निविदा प्राप्त होणे अशा विविध कारणांमुळे निविदेस मुदतवाढ देणे यामुळे वेळेचा अपव्यय होईल.

त्यामुळे सदर कामाकरीता प्रथम केलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे.सतिश कंन्स्ट्रक्शन यांचेकडून सिंधुभवन येथे दोन मजले बनविणे व आजूबाजूचा परिसर विकसित करणे रुपये ३,९१,००,०००/- एवढया प्राकलनिय किंमतीचे काम पूर्वीच्या अटी व शर्तींवर करुन घेणेस प्रस्तावित करण्यात आले होते.

तथापी, मा.आयुक्त सो. यांनी उर्वरीत कामाकरीता स्वतंत्र निविदा प्रक्रिया करणेबाबत सदर संचिकेवर शेरा लिहिला आहे.

तरी सिंधुभवन येथे दोन मजले बनविणे व आजूबाजूचा परिसर विकसित करणेच्या कामाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणेस मा.स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित.

स्थायी समिती ठराव क्र. ५६ अ दिनांकः— १६/११/२०१७

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—३ येथिल सपना उदयान येथे सिंधुभवन येथे दोन मजले बनविणेस व आजुबाजूचा परिसर विकसित करणेकरीता निविदा प्रक्रियेस मान्यता देण्याचा प्रस्ताव या कार्यसूचीवरुन वगळण्यास मान्यता देत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्र. ५ वाचुन दाखवितात

————————————————————————————————————————————

⇨ **विषय क्र.** ५:— उल्हासनगर शहरातील वाहतुक नियमासाठी घेण्यात आलेल्या २० ट्रॉफिक वार्डन यांना अर्थसहाय्य मंजुरी मिळणे.

————————————————————————————————————————————

सदस्य श्री. भारत राजवानी—साहेब, सगळयात महत्तवाचे काम आहे हे लोक ट्राफिक नियंत्रण करत नाही. त्यांची खाजगी करत असतात.गाडया थांबवतात, माझ्याकडे त्यांचा फोटो प्रूव्ह आहे, आता माझ्याकडे तो मोबाईल नाही आहे त्याच्यात फोटो आहेत. मी एक हप्ता आगोदर पत्र सुध्दा दिलेल आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर—हे बघा, एक मिनिट.

सदस्य श्री. भारत राजवाणी—माझ्याकडे फोटो आहे. मी त्या दिवशी स्वत:फोटो काढले आहेत.आणि त्याच्यानंतर मी त्याच्याशी बोलायला गेल्यावर ते माझ्याशी मोबाईल चालू ठेवला आहे आणि गाडी चालवत आहेत, माझ्या गाडी मध्ये ड्रायव्हर आहे बाजूला मी बसलेलो आहे. आणि मी फोनवर बोलत आहे तो मला बोलतो की तुम्ही गाडी चालवत आहात आणि मोबाईलवर बोलत आहेत.सरळ माझ्यावरती आरोप करत होते.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर— त्यांचे सगळयांचे मुल्य प्रतिमाह किती देत आहोत त्याच्यावर आहे.रू.४हजार प्रतिमाह देत आहेत.ते पण बरेच दिवस रू. २ हजार दिले जात होते. आता ४ हजार देत आहेत. नाही, नाही मी ट्राफिक कर्मचा—याशी बोललो आहे. तेच आहे, पुण्यामध्ये सुध्दा असेच आहे ट्राफिक मध्ये थांबून विचारले आहे की तूम्हाला किती पगार कमळतो आहे,तिथ पण प्रतिमाह रू. ८ हजार आणि त्यांचे कनव्हेनसन्स अलाऊन्स, आणि गाडीचा पेट्रोल वैगेरे. तेव्हा आम्ही इथे रू. ४ हजार प्रतिमाह घेत आहे त्यांचा येण्याजाण्याचा खर्चबाकी आहे. जेवढं आम्ही पगार देणार तेवढया प्रकारची माणसं भेटणार.

काही सदस्य एकत्रित असल्यामुळे कोण काय बोलत होत ते समजून आले नाही.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी— आपली महानगरपालिका किती पगार देत आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–</u> रू८हजार पूर्णामध्ये देत आहेत.

<u>सदस्य श्री.सूनिल सूर्वे–</u> पूण्याचे बजेट आणि आपले बजेट......

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर –</u> नाही पण माणूस लर्निंग स्टॅर्डड अस काही वेगळ नाही आहे.इथ जेवढ महाग भेटतं तेवढ पूण्यात काय महाग भेटत नाही थोडा फार फरक असेल.

<u>सदस्य श्री.सूनिल सूर्वे–</u>आपला भजी कोथीबीरचा आणि हयाचा फारस संबंध वेगळा आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–</u> आपण साधी गोष्ट,महिन्याला य.४हजार तो माणूस घेतो त्याला आपण ८ तास १२ तास उभ राहायला लागणार. ही तळमळ पण तेवढी राहायला पाहिजे.सर्वांचे मुळ इथं आहे,आपण जेव्हा बाहेर जातो एखादया हॉटेल मध्ये खाणं खात असतो तेव्हा हजार,बारासे रूपये जीएसटी निघून जातात.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी–</u>साहेब बरोबर आहे जसे दुसरे महानगरपालिका मध्ये आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–</u> बंद नाही झाल, हे आज मान्य होईल. परंतु ट्राफिकवाल्यांना सांगितल आहे की,वार्डन ची संख्यापण वाढविण्याची आवश्यकता आहे.आपण त्यांना विचारल की आपल्याकडे वार्डनची संख्या २० ते २५ ईतकी आहे तर अ‍ॅक्चुअली शहरासाठी रिक्वायरमेंट काय आहे?

<u>सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी–</u>वार्डन त्यंना आम्ही ४५ दिले होते,सन २०१२–१३ मध्ये २० वार्डन दिले होते.त्यानंतर ५ वार्डन अजून वाढवून दिले होते. एकूण २५ झाले.जसा वेळ निघत गेला तसे त्यांनी परत २० वार्डन मागितले. एकूण ४५ झाले. शेवटी आम्ही २५ वार्डन रदद केले. कारण की ट्राफिक कंट्रोल होत नव्हता म्हणून.परंतु आज २०वार्डनचा विषय आला आहे. २० जणांना मान्यता दिली जाईल परंतु  आपण एक असा प्रोग्राम बनवा.जरी पुढे जाऊन आपण हयांना पगार वाढविला दृहे तर आता २० वार्डन च चालू झालेल आहे. आपण अस बनवा की त्यांच्यावर नियंत्रण महानगरपालिकेच राहील.आणि हे वार्डन कोणचे लायसन्स तपासणार नाहीत, दंडात्मक कारवाई अधिकारी करतील. वार्डन च काम फक्त ट्राफिक नियंत्रणच राहील.आणि आपला एक अधिकारी यांच्यावरती नियंत्रणसाठी असला पाहीजे, की वार्डन कुठ आहे? काय करत आहे? अस प्रोग्राम बनवा. तोपर्यंत  हया प्रस्तावाला मान्यता देत आहेत.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर– </u>ठिक आहे.

<u>सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी–</u>पगार दयायचा उददेश नाही आहे,फक्त चांगल हो, त्याच फळ यायला पाहीजे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर</u>– तेच आहे.

<u>सदस्य श्री भारत राजवानी–</u> मी सेक्सन १७ चौकातून महानगरपालिकेतून जात होतो,समोरून शिवाजी चौकातून एक मुलगा अ‍ॅक्टीवामोटार सायकल वरून येत होता आणि त्याला वार्डन थांबवत आहे. ट्राफिकवाले बाजूला उभे आहेत. चालत्या गाडीला थांबवत आहे , तो थांबत नाही आहे,त्याच्यामागे धावत आहे त्याचा हात पकडायला. अशा वेळेस जर अपघात झाला तर जबाबदारी कोणची राहील.

<u>काही सदस्य–</u> सिग्नल असेल.

<u>सदस्य श्री भारत राजवानी–</u> सिग्नल नाही, सेक्सन १७ चौकात.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–</u>जरा हयाचे उत्तर तुम्ही पण दया,हया ज्या गोष्टी आहेत ना हयापण बघायला पाहिजेत. ट्राफिक चे कोन आलेले आहेत.

<u>सदस्य श्रीमती डिंपल ठाकुर–</u>    वार्डन ना उल्हासनगर शहराच्या बाहेरच पण सांभाळायला दिलेलं आहे का?

<u>सदस्य श्री भारत राजवानी–</u> उल्हासनगर–४ नंबरची जी चौकी आहे. जी ट्राफिक  हयांची आहे आणि हाजीमलंग र्प्यत आहे.काहीता हिशाबाच्या बाहेर घेऊन जात असतील.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे–** महानगरपालिकेच्या लिमीट मध्ये त्यानी काम केले पाहिजे.

**मा. आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–**तुम्हाला सांगून किती दिवस झाले.

**ट्राफिक अधिकारी –** लिमीट मध्येच आहे परंतु आपल्याकडे दोन पुलिस स्टेशची हदद आहे, साहेब.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–**आणि त्यांचे मानधान पण काय असतं.आणि त्ययाप्रमाणे नंतर मग त्याच काय, त्याचा ड्रेस पण स्वच्छ आला पाहिजे.शेवटी प्रापर्ली अपराईट मध्ये, रू. ४ हजार मध्ये आम्ही ही पण अपेक्षा करत आहोत. ड्रेस , धुलाई येणं, जाणं हे झाले पाहीजे आणि कोणकडून एक पैसा पण नाही घेतला पाहिजे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया–**जस्टीफिकेसन करायला पाहीजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–**त्यांनी त्यानंतर अभय योजनेमध्ये टॅक्स चे पैसे भरले पाहीजेत.

**सदस्य श्री भारत राजवानी–**नियंत्रण आपल राहीलं पाहिजे, मान्यतेला काही अडचण नाही. पगार पण चांगल्याप्रकारे असला पाहीजे. जसे दूसरीकडे आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–** जो काय प्रस्ताव आहे तो आम्ही पुढच्या वेळेस आणतो. हे जेवढी लोक आहेत,त्यांना लागू करणार.आणि त्याच्यानंतर त्याना कोणी बोलायला लावू देणार नाही.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे–** हयाच्यामध्ये पण एक माझी सूचना अशी आहे जमनाजी, एक प्रस्ताव आहे.

**सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी–**पहिले हे मंजूर करून घेऊ. नंतर जेव्हा येईल.

**सदस्य श्री.सुनिल सुर्वे–** संबंधित अतिरीक्त २० वार्डन ययययययांची नियुक्ती करणेची जबाबदारी पोली
स विभगाची राहील. तर पोलीस विभागाची जबाबदारी असताना आपल्या पण एखादया तिथे दयाव. कोण आहे त्याला नियुक्त करायला जो आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर ज्याला नियुक्त करतील अशा व्याक्तीने पण ती माणसं सिलेक्ट केली पाहीजे. आपला स्टफ दयायचा नाही.हे जे नियुक्त करत असतील त्या ठिकाणी सिलेक्सनसाठी महानगरपालिकेचा एक अधिकारी ठेवणे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–** माझं हे म्हणण आहे,पहिली गोष्ट तर सगळ नव्याने करायला पाहिजे.जो पर्यंत आपला नवीन प्लन बनत नाही तो पर्यंत फक्त तात्पुरते स्वरूपाचे कंडिशन आणि रेट असायला पाहीजेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी–**माझी एक विनंती आहे, एक ६ महीन्यासाठी आपण वाढ करून देऊ. आणि त्या वेळेच्या आत पूर्ण देत आहेत. एका वर्षासाठी.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–** नाही, नाही,जो पर्यत नविन तयार होत नाही तो पर्यंत ठेवा.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी–**बस, हे बरोबर आहे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर–**बाकीच्या ज्य गोष्टी आहेत,ते पुलिस डिपार्टमेंट नाही, आपल्याच डिपार्टमेंट मध्ये सिलेक्ट करणर,सिलेक्सन कमिटीमध्ये त्यांचा प्रतिनिधी आपण घ्यायचा आणि पूर्ण नियंत्रण आपले राहील.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी**:– जोपर्यंत महानगरपालिकाकडून नविन प्रस्ताव येईल तोपर्यंत जास्तीत जास्त एक वर्ष त्याच्यापेक्षा जास्त नाही.

**श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक :–** यामध्ये आपण पॉईट देऊ शकतो.

**सदस्य, श्री भारत राजवानी**:– महाराजा हॉल झाले त्या प्लान च्या हिशोबाने.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—** दर १५ दिवसानंतर बदल करायचाआणि बघायचे, जबाबदारी त्यांची राहील. प्रॉपर्ली नाही झाले तर ४० वार्डन ना तर नाही पकडणार, जबाबदार कोण अशा प्रकारचे प्रस्ताव बनवायचे. त्यांचा पगार रू. ११,०००/— करायचे.त्यांच्यावर पूर्ण नियंत्रण महानगरपालिकेचे राहील, ट्राफिक डिपार्टमेंट असेल,टेक्नीकल वैगेरे,त्यांना प्रशिक्षण देणे,बाकीचे सगळे ते करतील. बाकीचे पूर्ण खर्च आणि नियंत्रण आपले राहील.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**हा विषय इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पारीत करा.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—**सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. ५ :—** उल्हासनगर शहरातील वाहतुक नियमासाठी घेण्यात आलेल्या २० ट्रॉफिक वार्डन यांना अर्थसहाय्य मंजुरी मिळणे.

प्रस्तावना

उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत उल्हासनगर शहरातील वाहतुक कोंडीच्या समस्या दुर होणेसाठी शहर वाहतुक उपविभाग, उल्हासनगर व विठ्ठलवाडी यांना शहरातील वाहतुक समस्यांचे निराकरण करणेसाठी आंता पर्यंत खालील वार्डन नियुक्ती व त्यांचे मानधनासाठी अर्थसहायास मंजुरी दिली आहे.

१. मा. स्थायी समिती ठराव क्र. ०१, दिनांक १३/०९/२०१२ अन्वये **२० ट्राफिक वार्डन** यांना अटी व शर्तीच्या आधारे मानधन तत्वावर अर्थसहाय्यस मंजुरी दिलेली होती.
२. सदर वार्डन यांचा एक वर्षाचा कालावधी संपुष्ठात आला असता मा. स्थायी समिती ठराव क्र. ५६, दिनांक १७/१२/२०१३ अन्वये वार्डन यांची सेवा सन **२०१३—१४** साठी चालू ठेवून आणखी **५ ट्राफिक वार्डन** म्हणजे एकुण २५ वार्डन नेमणेस व त्यांचे मानधन रू.२००० च्या ऐवजी रू.४००० अशी वाढ करण्यास मान्यता दिलेली होती.
३. सन **२०१४—१५** मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. ७१, दिनांक ०२/०१/२०१५ अन्वये **२५ वार्डन** यांना मुदतवाढ दिली.
४. सन **२०१५—१६** मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. १००, दिनांक १४/०३/२०१६ अन्वये २५ वार्डन यांना मुदतवाढ दिली.
५. सन **२०१६—१७** मध्ये मा. स्थायी समिती ठराव क्र. ८१, दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये **२५ ट्राफिक** वार्डन यांना अर्थसहाय्य मंजुरी दिलेली आहे.
६. वाहतूक शाखेस ट्राफिक वार्डन कमी पडत असल्यामुळे त्यांनी **२५ अधिक अतिरिक्त २० ट्राफिक वार्डन** यांना मानधन मिळणेबाबत विनंती केल्यानुसार **मा. स्थायी समिती ठराव क्र.८२, दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये अतिरिक्त २० ट्राफिक वार्डन** यांना उदारनिर्वाहसाठी प्रति वार्डन रू. ४,०००/— एवढे मानधन देण्यास मान्यता दिलेली आहे.
७. **दिनांक ३१ ऑगष्ट, २०१७ रोजी ज्या २५ नियुक्त वार्डनची मुदत संपलेली होती, त्यांचा प्रस्ताव मुदतवाढीसाठी मा. स्थायी समितीस सादर केलेला असता, दिनांक ८/९/२०१७ च्या बैठकीत मा. स्थायी समिती ठराव क्र २७ अन्वये मुदतवाढीचा प्रस्ताव अमान्य केलेला आहे.**

१. उपरोक्त नमूद मुदा क्र १ ते ६ प्रमाणे जे अतिरिक्त २० वार्डन नियुक्त केलेले होते त्यांची मुदत **दिनांक ०७/१०/२०१७ रोजी** संपुष्टात येत आहे. वाहतुक विभागाकडून शहरातील वाहतुक व्यवस्थेचे निराकरण करण्यासाठी ट्राफिक वार्डनची आवश्यकता असल्याचे कळविल्याने सदर २० ट्राफिक वार्डन यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहुन त्यांच्या अर्थसहाय्यास मंजुरी देण्याचे प्रस्तावित आहे.

१. संबंधीत अतिरिक्त २० ट्राफिक वॉर्डन यांची नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची राहील.
२. संबंधीत अतिरिक्त २० ट्राफिक वॉर्डन यांना प्रतिमाह रु. ४०००/— एवढे मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक उपशाखा, उल्हासनगर विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.
३. ट्राफिक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.
४. ट्राफिक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ट्राफिक पोलिस विभागाची राहिल.
५. याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी वाहतुक पोलिस विभागाची राहिल.
६. संबंधीत सर्व ट्राफिक वार्डन यांच्या उपस्थितीबाबत व कर्तव्याबाबत पोलीस विभागाचे नियंत्रण राहील.

२. उक्त २० ट्राफिक वॉर्डन यांचे मानधनापोटी वार्षिक रक्कम रु. ९,६०,०००/— एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च वर्ष २०१७—१८ चे अंदाजपत्रकात A-I (24) Part- I (Traffic Sing) या लेखाशिर्षात रू. ३.७५ कोटी एवढी तरतूद उपलब्ध आहे.

यास्तव मा. स्थायी समिती ठराव क्र. ८२, दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये नियुक्तीचा एक वर्षाचा कार्यकाल दिनांक ०७ ऑक्टोंबर २०१७ मध्ये संपुष्ठात येत आहे. या अनुषंगाने वाहतुक नियमनासाठी २० ट्राफिक वार्डन यांना पुढील एक वर्षाकरीता अर्थसहाय्य मंजुरी मिळणेबाबत सदर प्रस्ताव मा. स्थायी समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ५७ दिनांक:— १६/११/२०१७

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहरातील वाहतुक नियमासाठी घेण्यात आलेल्या २० ट्रॅफीक वार्डन यांना खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून जोपर्यंत नविन प्रस्ताव येत नाही तोपर्यंत किंवा जास्तीत जास्त १ वर्ष अर्थसहाय्य देण्यास मंजुरी देत आहे.

१. संबंधीत अतिरिक्त २० ट्रॅफीक वॉर्डन यांची नियुक्ती करण्याची जबाबदारी पोलिस विभागाची व महापालिकेच्या अधिकारी यांची राहील.
२. संबंधीत अतिरिक्त २० ट्रॅफीक वॉर्डन यांना प्रतिमाह रु. ४०००/— एवढे मानधन महानगरपालिकेतर्फे सहाय्यक पोलिस आयुक्त, शहर वाहतूक उपशाखा, उल्हासनगर विभाग यांचेकडून देयक प्राप्त झाल्यावर अर्थसहाय्य स्वरुपात देण्यात येईल.
३. ट्रॅफीक वॉर्डन यांच्या सेवेचा महानगरपालिकेशी कोणताही संबंध राहणार नाही.
४. ट्रॅफीक वॉर्डन यांना सेवेत असताना काही अपघात झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ट्रॅफीक पोलिस विभागाची राहिल.
५. याबाबत भविष्यात कोणताही न्यायालयीन वाद उद्‌भवल्यास त्याची जबाबदारी वाहतुक पोलिस विभागाची राहिल.
६. संबंधीत सर्व ट्रॅफीक वार्डन यांच्या उपस्थितीबाबत व कर्तव्याबाबत पोलीस विभागाचे नियंत्रण राहील.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

**महापालिका सचिव** :— विषय क्र. ६ वाचुन दाखवितात

---

⇨ **विषय क्र.** ६:—खाजगी कंपनीकडून प्रशिक्षित ३० फायरमन कत्रांटी पध्दतीने पुरवठा करणेकरीता न्युनतम निविदाधारकाशी करार करणेस व लागणाऱ्या खर्चास मंजुरी मिळणेबाबत

---

सदस्य,श्री.राजेंद्र चौधरी:— हा विषय तसाच आहे,ज्या पध्दतीने आगोदरचा वार्डनचा विषय होता. त्याना पगार कमी होता. तसा यांचा ही विषय आहे. फायरमनची लोक असहेत त्यांना कंत्राटी पध्दतीवर कामावर आपण घेतो.त्यांनाही वेतन फार कमी आहे. आणि ते मालमत्तेचे रक्षण करतात,मालमत्ता वाचवतात,आणि लोकांचे प्राणही वाचवतात. अशा वेळेला त्यांचे पगार जास्तीत जास्त असले पाहिजे.यासाठीचे प्रयत्न आपल्या स्थायी समितीच्या वतीने करत आहोत.

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u> या कामगारांना आता आपण खाजगी च्या जागी महानगरपालिकेचे कर्मचारी म्हणून नाही करू शकत का?

<u>सदस्य, श्री.सुनिल सूर्वे:—</u> साहेब,

<u>सदस्य, श्री. भारत राजवानी:—</u>कारण की आज पर्यंत अपघात झाले,किंवा जे कर्मचारी जळले आहेतत्यांना जिवन सुरक्षा म्हणून काहीच मिळत नाही. तर त्यांना खाजगी कामापासून जर महानगरपालिकेमध्ये घ्यावे.

<u>सदस्य, श्री.सुनिल सूर्वे:—</u>एक ठोक पगारावर घेतल तर काय झाल आहे, साहेब,की हयांना हातामध्ये रू.६००० ते रू७०००पगार येतो.एक ता पहीली गोष्ट इथ स्पष्ट झाली पाहीले, आपण जे कमीतकमी वेजेस आपण जे देणार आहोत, ते त्यांच्या खात्यामध्ये धनादेशाद्वारे जमा झाले पाहिजे आणि महापालिकेचे नियंत्रण असले पाहिजे. कारण त्यांना पगार वेळेवर मिळत नाही.४,४,महिने,६,६महिने मिळत नाही. हे व्हॅाल्वमन ठेवलेत त्यांचे पण तसेच प्रश्न आहे. पम्प ऑपरेटर ठेवलेत त्यांचे हीच अडचणी आहेत. उल्हासनगरपालिकेत जे जे ठेकेदार आहेत त्यानी मिनिमम वेजेसची कुठलीही अट पाळली जात नाही. आज उदया कोणी पीआयएल दाखल केली तर दोषी म्हणून आपल्याला ठरवल जाईल.कारण की आपल्याला ही जबाबदारी आहे.आपली स्वत: ची सगळयांची जबाबदारी आहे.

<u>श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशामक अधिकारी :—</u>त्यामुळे त्यांना तो रू.६००० हजार देतो. हया वर्षी तर त्यांना बोनस दिलेला नाही आहे.खर आहे. पण आता जी निविदा झालेली आहे , आज त्यांचा पीफ पण वाढणार,इएसआय पण भरणार. त्याचप्रमाणे १०हजाराच्यापुढे पगार पण देणार.हया अटी त्यांना टाकलेल्या आहेत.

<u>सदस्य, श्री.सुनिल सूर्वे:—</u>नाही ,नाही,नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>अटी त्यांना ठेवायला पाहिजेत.

<u>अग्निशामक अधिकारी:—</u> आणि पीएफ पण त्यांचा तो कट केला जाईल, तेवढाच तो त्याचा पण फायदा आहे.

<u>सदस्य,श्री सुनिल सूर्वे:—</u> साहेब, थोडं तुम्ही लक्षात घ्या,मिनीमम वेजेसचा जो कायदा आहे

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> होतयना, रू. ११०००/—च्या आसपास काहीतरी आहे ना. किती आहे आता मिनिमम वेजेस?

<u>श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशामक अधिकारी :—</u>रू. १४०००/—आहे. ते त्याला देण्याची अट त्याच्यामध्ये टाकून दया.

<u>सदस्य,श्री सुनिल सूर्वे:—</u> त्याच्यामध्ये टाकून दया, त्यांना तेवढा पगार मिळाला पाहिजे, तो धनादेशाद्वारे त्याच्या खात्यात जमा झाला पाहीजे.

<u>श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशामक अधिकारी :—</u> ती अट टाकू शकतो.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u>त्याच्यामध्ये त्यांचे पीफ चे कान्ट्रीब्युशन पण त्यातच करा.

<u>श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशामक अधिकारी :—</u> ज्यावेळेस बील पेड केलेले देईल त्याच वेळेस त्याचा बील पूट अप केल जाईल.

<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u> सोसायटी कोणला आहे आणि कोन देणार आहे.

<u>श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशामक अधिकारी :—</u> सोसायटी नाही.

<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:—</u> जे आता काम करतात त्यांना संधी मिळत नाही. आता नविन येतील ते.

<u>श्री. भास्कर मिरपगारे, प्र. अग्निशामक अधिकारी :—</u> त्यांना बोलावून मुलाखत वैगेरे घेतील, बहुतेक यांना थोडस प्रधान्य दयावे लागेल.

<u>सदस्य,श्री सुनिल सूर्वे:—</u> दयाव नाही, दयावेच लागेल.

<u>सदस्य, श्री.राजेंद्र चौधरी:–</u> वर्षानुवर्ष काय केलय. दुखापत झाली , इजा झाली , अपघात झाला, अशा लोकांनी काय करायच.

<u>सदस्य,श्री सुनिल सूर्वे:–</u> माणुसकीच्या दृष्टीकोनाने विचार करा.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>ठिक आहे, आता हे टेंडर करायच ना.

<u>सदस्य,श्री सुनिल सूर्वे:–</u>साहेब, कस आहे माहिती आहे,जसं आपण २० वार्डनची नियुक्ती केली त्याच्यामध्ये उल्लेख ठेवला. त्यामध्ये जबाबदारीची अट टाकली, यामध्ये कूठच अस नाही आहे. त्यांना अपघात झाले किंवा काय झााले, त्याचा खर्च कॉन्ट्रॅक्टर करणार आहे का आपण त्यांना मदत करणार.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> नाही, ती त्यांची जबाबदारी असते.

<u>सदस्य,श्री सुनिल सूर्वे:–</u> त्याच्यत ती जबाबदारी टाकली नाही, हया गोषवा–यामध्ये कुठेही जबाबदारी टाकली नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>नाही, जस अपघात, जस साहेब म्हणतात.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>सर्व परत यामध्ये आणले पाहीजे आहे.

<u>सदस्य,श्री सुनिल सूर्वे:–</u> मागच्या वेळेस ,आशिर्वाद मध्ये, आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर हिरे साहेब चांगले होते म्हणून पैसे त्यानी स्वत: दिले. दोन लाख ते २.५० लाख रूप्ये अर्जंट भरले तिथे आशिर्वादला आपले ५ ते ६ जवान जळले होते.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>अशी काही परिस्थिती उदभवली तर आपण कधीही त्यांचा विचार करत नाही.

<u>सदस्य,श्री सुनिल सूर्वे:–</u> याच्यामध्ये आपण नुद केल तर आणखी जबाबदारी मजबूत राहील.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> ठिक आहे, ठिक आहे.

<u>सदस्य,श्री राजेंद्र चौधरी:–</u> सर्वात महत्वाचे म्हणजे अतिमहत्वाचे सेवा आहे, मग ते वॉल्वमेन असोत किंवा प्लंबर असतील पम्पींगवाले असतील किंवा फायर वाले असतील, त्या सेवेकडे आपण चांगल्या नजरेने बघतीले पाहिजे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> ठिक आहे.

<u>सदस्य,श्री सुनिल सूर्वे:–</u> तुम्हाला सांगतो,सफाईकामगार खाजगी आहेत त्यांना रू.८०००/–मिनिमम वेजेसच्या पण कमी.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u> त्यांना किती,८ हजार पगार आहे?

<u>सदस्य,श्री सुनिल सूर्वे:–</u> कारण काय आहे, माझ्या माहितीप्रमाणे या सर्व विषयावर कोणीतरी पीआयएल दाखल केली आहे,किवा सुरूवात केली आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:–</u> दुसरा एक इश्यु आहे सर, १५ सप्टेंबर २०१७ रोजी जनरल बॉडी झाली होती. त्याच्यात हा विषय होता की फायरमेन कॉन्ट्रॅक्टवरती काम करत आहेत. त्यांच्या जागेवरती त्यांना कायम भरती फायरमनची झाली पाहिजे. पीडब्ल्युडी ,पाणी पुरवठा विभगामध्ये अभियंते नाही आहेत.आणि अजून काही पद रिक्त आहेत. जे प्रमोशनसाठी पात्रआहेत, त्यांना प्रमोशन दिले जावे. जे स्टेट गोव्हर्नमेटकडून येत आहेत किंवा घेणे आहे, त्यांना सोडून बाकीचे पदं तर डायरेक्ट मंजूर झाले पाहीजेत. आपण आम्हाला १ महीन्याच्या आत प्रस्ताव जनरल बॉडी मध्ये देणार अस म्हटल होते. त्याला आता २ महीने पूर्ण व्हायला आले परत जनरल बॉडी आहे. हा प्रश्न तिथ पण येणार. आता पर्यंत प्रस्ताव आमच्याकडे आला नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–</u>तो प्रस्ताव डीएमसी यांच्याकडे आहे. त्याच्यामध्ये एक अडचण आहे की ती अजून निकाली झाली नाही.त्यांची सिलेक्सन प्रक्रिया कोणत्या प्रकारे केली जावी. सरकारने एक जीआर काढला आहे. एकच व्यावस्था केली आहे ज्यामध्ये सर्व प्रक्रिया असेल.परंतु तो जीआर रिसेंट आहे. आम्ही डीपार्टमेंटसी गोष्ट केली तर,

त्यांची परिक्षा कोन घेणार,त्यांच्यायबददल विचार करणेसाठी सरकारने दिल आहे. याच्या पहिले ते ऑनलाईन केली जात होते. हे दोन महीने पहीले निघाले आहे. बाकी आम्ही किती जागा भरायच्या आहेत, काय करायच आहे हे सगळं अतिंम टप्यात तयार आहे. आमच्याकडून जर मान्यता मिळाली तर त्वरीत तयारी केली पाहीले. आणि जाहीरात पण आली पाहीजे.

सदस्य, श्री. राजेश वदारिया:— दि.१८ नोव्हेंबरला आपली महसभा आहे. तरी आपला प्रस्ताव काही अजून आला नाही आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—सिलेक्शन कसे होणार, याच्यासाठी थांबलेले आहेत.

सदस्य,श्री. राजेश वदारिया:—साहेब, आम्ही तुम्हाला अधिकार देत आहेत. आपण भरती प्रक्रिया डिसाईड करा. सरकारी नियमाप्रमाणे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— त्यांना सरकारी नियमाप्रमाणे(अनाऊन्स) नाही. आताच जीआर निघालेला आहे. त्यामुळे आम्ही थांबलेले आहेत.झाल तर एक, दोन दिवसात क्लीअर होऊ शकते. आयत्या वेळेचा विषय घेवून येणार.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— दुसरा एक विषय आयत्या वेळेस घ्यायचा राहिला.मागच्या वेळेस बसून चर्चा केली होती. टॅक्स च्या बाबतीत जे ५०० स्केअर फुटच्या खाली एक पट दंड किंवा तेवढाच आणि एक पट दंड असा काही जीआर आला आहे.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— ज्या लोकांना आम्ही तीन पट घेत आहे.सर्वांच्या लक्षात आले नाहीम्हणून नाहीतर लावलाच नसता.सगळयाना भरूदया ,अभय योजना पूर्ण हावू दया ज्यांचे पण ५००स्के. फुटच्या कमी आहे आणि लोकानी पैसे भरले आहेत. ळया वर्षात त्यांना परत देणार, किंवा दुस—या वर्षात सामावून घेणार.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— फक्त हया वर्षी पासूनच चालू केला आहे. हयाच्या आधीच तर हे रिकव्हर करायलाच पाहिजे.कारण ते हया वर्षीचे आहे. आणि इथून पुढे लागू होणार नाही.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— या ठरावामध्ये मिनिमम ॲक्ट नुसार त्यांना ते एक आणि साहेब, आपण जबाबदारी महानगरपालिका म्हणून घेवूया.हे एक टाकून घ्या आणि त्यांच जर ऑन डयुटी अपघात वैगेरे झाले ते एक टाकून घ्या.

सदस्य,श्री. राजेश वदारिया:— जर महानगरपालिका काही जबाबदारी घेईल.विमा जर महानगरपालिकेने घेतला तर कर्मचारी महानगरपालिकेचे मानले जातील.त्याच्यासाठी जबाबदारी त्याच्यावर ठेवा. महानगरपालिकेवरती जबाबदारी ठेवू नका.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—इएसआयएस चे सर्व माझी गोष्ट ऐका.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— जेव्हा ऑन डयुटी बाबत हे काय झाल, कोणीही, एकही सदस्य, व प्रशासन म्हणणार नाही की त्यांना मदत करू.अस लिखीत मध्ये केल तर त्याच वेगळ होईल. आणि अशी दुर्घटना व्हायला नाही पाहीजे. त्याच्यामध्ये झाल्यावर बघता येईल. आपण आता लहान १२ वर्षाच्या मुलाबददल किती स्टॅंड घेतला.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— इतिवृत्त कायम होण्याचे वाट न पाहता. एक विषय राहिला होता.सिंधू भवनच काय संपवून टाका हा विषय. मी मार्ग सांगितला आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— आणि यामध्ये टाईम पण जाणार. आज डिसाईड केल तर दोन दिवसात टेंडर घेवून या.एक महिन्याच्या आत टेंडर होवून जाईल.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— माझा एकच सांगणे आहे टेंडर मुळे काम चांगले होणार नाही. डोके दुखी होईल.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—यातला मी मध्यम मार्ग सांगितला, आपण टेंडर करू. टेंडर मध्ये जर चार लोक आले. त्याच्यामध्ये योगायोगाने आताच्याच कॉन्ट्रॅक्टरला चे कमी दर ठरले तर विषयच संपला काहीच पून्हा अडचण येणार नाही.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— काम दयाला काहीच हरकत नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—काम आपण विदाउट टेंडर. ४ कोटीच विदाउट टेंडर,

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— विना टेंडरच साहेब, विषय आलेला आहे आपल्याकडे आयत्या वेळेस विषय घेतला असता आपण चुकीच केल असत.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:— माझा एक सल्ला आहे, आयुक्त साहेब,जर २.५० कोटीच सिवील काम आहे तर काही अडचण नाही.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— ते काम तर नंतर होणार आहे ना.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—वर्क सारखेच आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—त्याच कॉन्ट्रॅक्टर बरोबर काम करायचे आहे ता अेक्नीकल वैगेरे, बाकी काही नाही.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— काम लवकर व्हायला पाहिजे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—आम्हाला अस वाटत,ज्यांनी इमारत बनवली.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— आम्हाला अस वाटत की प्रॉपर्लीये स्टॅबीलीटी वैगेरे सगळीकडे लक्ष ठेवल पाहीजे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—सिव्हिल काम दया त्यांना बाकीच टेंडर काढा.तुम्हाला अस वाटत का? वेगळ काम आहे. त्याच्यात रेट कमी जास्त येवू शकतात.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— एकच प्यारा ४ कोटीचा निर्माण होईल.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— सिव्हिल काम दयायला काही अडचण नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— काय एक महिन्याच्या आत पूर्ण करायचे आहे. तुमच टेंडर कधी येणार परवा येईल का? एक दिवस देता. तुमच्या हिशोबाने सांगा.सोमवारी टेंडर येणार. २० तारखेनंतर आम्ही स्थायी समिती मध्ये येवून काम पूर्ण करणार. १ जानववारीपर्यंत त्यांना वर्क ऑडर देवू शकतो.

सदस्य, श्रीमती डिंपल ठाकुर:— सर टेंडरर्स कधी येणार?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— टेंडर सोमवारी येणार.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— जर टेंडर दुस—याला गेला तर.

सदस्य श्रीमती पंचम कालानी:— दुस—याला नाही जाणार, बिल्डींग तो एकचजण बनवणार साहेब. पेंडींग ठेवा.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—पेंडींग ठेवत आहेत.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— दोन दिवसासाठी ठेवा.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— ठिक आहे, ठिक आहे.

काही सदस्य :—पास—पास......

सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ विषय क्र. ६ :— खाजगी कंपनीकडून प्रशिक्षित ३० फायरमन कत्रांटी पध्दतीने पुरवठा करणेकरीता न्युनतम निविदाधारकाशी करार करणेस व लागणाऱ्या खर्चास

मंजुरी मिळणेबाबत

प्रस्तावना

अग्निशमन विभागाने ई निविदा पध्दतीने खाजगी कंपनीकडून प्रशिक्षित ३० फायरमन कंत्राटी पध्दतीने पुरवठा करणेकरीता निविदा मागविल्या होत्या. सदर फायरमन हे राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र मुंबई यांचे मार्फत प्रशिक्षण पूर्ण केलेले असतील. त्यामुळे सदरचे प्रशिक्षित फायरमन हे Minimum Wages Act च्या नोटीफीकेशन नुसार Skilled या दर्जामध्ये येतात. मा. अति. आयुक्त सो. यांचे दिंनाक २१/९/२०१७ रोजीच्या आदेशान्वये ई टेडंरीग कक्षामध्ये निविदेचा आर्थिक भाग उघडण्यात आला. त्याच्या प्रतिसादात निविदाधारकांनी भरणा केलेल्या रक्कमेचा तक्ता पुढीलप्रमाणे .

दिंनाक २१/९/२०१७ रोजी मा. अतिरिक्त आयुक्त., मुख्य लेखा अधिकारी, मुख्य लेखा परीक्षक व मुख्य अग्निशमन अधिकारी यांचे उपस्थितीत अग्निशमन विभागाकरीता खाजगी कंपनीकडून ३० प्रशिक्षित फायरमन कत्रांटी पध्दतीने पुरवठा करणे या कामाचे निविदेचा भाग –२ (आर्थिक) लिफाफा उघडण्यात आला त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

**ई निविदा क्रं. १३४६**

| अनु क्रं | विषय | अंदाजपत्रकीय रक्कम | निविदाधारकांची नावे | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रेसिजन सेफ्टी कॉर्पोरेशन | सिक्रेट सर्व्हिसेस |
| १ | उल्हासनगर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागात प्रशिक्षित ३० फायरमन कत्रांटी पध्दतीने पुरवठा करणेबाबत. (राज्य अग्निशमन प्रशिक्षण केंद्र येथून फायरमन प्रशिक्षण घेतलेले) | ६०,००,०००/– | प्रति महिना प्रति फायरमन दर रू १६,६४७/–<br>(GST@18% Extra at actual)<br>१ महिन्यासाठी दर<br>१६,६४७ x ३० = ४,९९,४१०/–<br>१ वर्षासाठी दर<br>४,९९,४१० x१२ = ५९,९२,९२०/– | प्रति महिना प्रति फायरमन दर रू २२,२३०/–<br>१ महिन्यासाठी दर<br>२२,२३०x ३० = ६,६६,९००/–<br>१ वर्षासाठी दर<br>६६६९०० x १२ = ८०,०२,८००/– |

सदर निविदेबाबत ३ वेळा मुदतवाढ देवूनही दोनच निविदाकारांने निविदा भरलेल्या आहेत तथापि सदयस्थितीत कामाची निकड लक्षात घेता व आज रोजी अग्निशमन विभागात अग्निशमन कर्मचाऱ्याची / मनुष्यबळाची अत्यंत कमतरता असल्याने व अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने विचार करता तसेच तुलनात्मक तक्त्यानुसार मे. प्रेसिजन सेफ्टी कॉर्पोरेशन यांचे दर सर्वांत कमी व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ६०,००,०००/– पेक्षा रू ७०८०/– कमी आहे म्हणजेच ५९,९२,९२०/– आहे. मेसर्स प्रेसिजन फायर सेफ्टी यांचे दर १८% GST वगळून आहे. त्यांची GST रक्कम १८% नुसार १०,७८,७२५/–एवढी होत असून एकूण रक्कम रू **५९,९२,९२०/– + १०,७८,७२५ = रू ७०,७१,६४५/–** एवढी आहे. तसेच सिक्रेट सर्व्हिसेस यांची एकूण रक्कम रू ८०,०२,८००/– ची निविदाची रक्कम आहे. तथापि सिक्रेट सर्व्हिस यांची निविदाची रक्कम मेसर्स प्रेसिजन फायर सेफ्टी यांचे पेक्षा रू ९,३१,१५५/– ने जास्त आहे. ज्या निविदाधा रकाचा दर कमी आहे त्यांच्याशी करार करून वरील खाजगी कंपनीकडून प्रशिक्षित ३० फायरमन कत्रांटी पध्दतीने पुरवठा करणेकरीता पुरविण्यासंबधी आदेश देण्यास मान्यता मिळावी

तसेच वरील तुलनात्मक बाबीचा विचार करता प्रेसिजन सेफ्टी कॉर्पोरेशन यांची निविदा रक्कम रू ५९,९२,९२०/– (१८% GST वगळून) यांच्या प्रस्तावित रकमेस मान्यता देणेस मा. स्थायी समितीपूढे मान्यतेसाठी सादर

स्थायी समिती ठराव क्र. ५८ दिनांक:– १६/११/२०१७

सूचकाचे नांव : श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नांव : श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार खाजगी कंपनीकडून प्रशिक्षित ३० फायरमन कंत्राटी पध्दतीने पुरवठाकरणेकरीता न्युनतम निविदाधारक प्रेसिजन सेफ्टी कॉर्पोरेशन यांची निविदा रक्कम रू ५९,९२,९२०/– (१८% GST वगळून) यांच्या प्रस्तावित रक्कमेस खालीलप्रमाणे अटींवर मान्यता देत आहे.

१. मिनिमम वेजेस ॲक्ट नुसार त्यांना वेतन दिले पाहिजे.

२. त्यांचे वेतन धनादेशाद्वारे त्यांच्या खात्यात जमा झाले पाहिजे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/–

अनुमोदकाची सही/–

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

सांयकाळी ५.१४ वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)

महापालिका सचिव

उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—२४/११/२०१७

दि. २४/११/२०१७ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती

सभेचे इतिवृत्त.

१३

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २४/११/२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती जया प्रकाश माखिजा | सदस्या |
| ५ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ६ | श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर | सदस्या |
| ७ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ८ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ९ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| १० | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| ११ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |
| १२ | श्री. भारत रामचंद्र राजवानी | सदस्य |

तर,
खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.
१. श्रीमती पंचम उमेश कालानी, २. श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा, ३. श्री. धनंजय बोडारे, ४. श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१. श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी
२. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
३. श्री. दादा पाटील, मुख्य लेखा अधिकारी
४. श्री. विनायक फासे, सहा. लेखा परिक्षक
५. श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
६. श्री. तरुण शेवकानी, उप अभियंता
७. श्री. हनुमंत खरात, उप अभियंता, विदयुत
८. श्री. बालाजी लोंढे, सहा. आयुक्त

९. श्री. नंदु समतानी, प्र. सहा. आयुक्त
१०. श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
११. श्रीमती छाया डांगळे, प्र. सहा. आयुक्त,विधी
१२. श्री. युवराज भदाणे, जनसपंर्क अधिकारी
१३. श्री. बाळु नेटके, प्र. मुख्य सुरक्षा अधिकारी
१४. श्री. विनोद केणी, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
१५. श्री. यशवंत सगळे, प्र. वाहन व्यवस्थापक
१६. श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. अशोक रामरख्यानी

दुपारी १२.०८ वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** शहर अभियंता आपण आयुक्तांच्या स्थानी आसनस्थ व्हावे व सभा सुरु करण्यात येत आहे.

यावेळी श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी म्हणुन आसनस्थ झाले.

**महापालिका सचिव :—** विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १ :—** डेंगू व मलेरीया आदी रोगांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी आवश्यक अळीनाशके/डासनाशके खरेदीसाठी न्युनतम दर सादर करणारे मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली व मे. श्रीराम ॲग्रो, अमरावती यांच्याशी संविदा करण्याकरीता मान्यता मिळणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**सभा सुरु होण्यापुर्वी एक विचारतो, दोन दिवस सार्वजनिक बांधकाम विभाग का बंद होते याचे कारण तर कळु दया. या शहरात काय चालत आहे. तुम्ही सभा घेतात आम्ही प्रत्येक गोष्ट पास करतो. अधिकारी राहत नाही, कारण सांगा. सार्वजनिक बांधकाम विभाग दोन दिवस बंद का होते? याबाबत कायदा सांगा. लिगलचे कोण आहेत, त्यांनी कायदा सांगावा.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**हा जो विषय श्री. सुर्वे यांनी उपस्थित केला आहे ना तो स्थायी समितीबाबतच आहे. आम्ही जी निविदा पास करुन देतो, वर्क ऑर्डर देतो त्याचे काम कधी झाले पाहिजे, काय झाले पाहिजे, कोणत्या कालावधीपर्यंत झाले पाहिजे ते काम नाही झाले त्यासाठी त्यावर काही आंदोलन झाले, नगरसेवकांनी त्यात इंटरफेअर केले त्यामुळे आंदोलन झाले याबाबत स्थायी समितीमध्ये माहिती दिली जावी.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**माहिती कोण देणार? मी सांगतो, माझ्या प्रभागात पाटोल्सचे काम चालु आहे, जेथे ते काम चालु असेल ते बंद करणार आहे. कारण एक सुध्दा कण टाकला नाही. तर काय सार्वजनिक बांधकाम बंद करणार काय? तुमच्यावर कारवाई होणार नाही का? आम्ही बंद करणार तर आमच्यावर कायदयाने कारवाई करुन म्हणणार की काम तुम्ही बंद केले. खुलासा झाला पाहिजे की सार्वजनिक बांधकाम विभाग का बंद होते व हे काय चालु आहे? याबाबत खुलासा दिला जावा, स्थायी समितीमध्ये. असे हे संपुर्ण विभाग बंद होवु शकतो काय? त्यांच्यावर काय कारवाई प्रस्तावित केली आहे. असा कोणता विभाग आहे जो कार्यालय बंद करु शकतो. असा कोणता कायदा आहे की संपुर्ण विभाग बंद राहणार. दोन दिवस सर्वच रजेवर गेले त्यांच्यावर काहीच कारवाई नाही तर याचा अर्थ काय होणार? उदया फायरब्रिगेडवाले जातील, आग लागली काही झाले तर. उदया पाणीवाले जातील. जबाबदारी म्हणुन आहे की नाही का काय? तो आला आणि सुटला, गेला उपोषणाला, काम बंद आंदोलन केले. शहरातील नागरीकांचा येणा—या पैश्यातुन तुम्हांला आणि आम्हांला सुध्दा मान आणि सन्मान मिळतो. कामगारांचे काम करायचे आहे की नाही.

नागरीकांचे प्रश्न सोडविण्यासाठी तुम्ही व्यक्तीशः घेणार आहात की त्यांच्यावर कायदेशीर कारवाई न करता. एकच व्यक्ती गेला असतो कोणीही कायदेशीर कारवाई करायला. सर्व विभाग बंद करायचा विषय काय आहे? त्याचा खुलासा करा, कुठल्या कायदयाने केला आहे. सचिव महोदया आपण सुध्दा कायदे जाणता आणि हया सुध्दा मॅडम आहे,लिगल तुम्ही सांगा काय कारवाई केली तुम्ही. प्रशासनाने काय कारवाई केली?

सदस्य श्री. राजेश वदारिया :—कारवाई कोणता विभाग करणार. सामान्य प्रशासन विभाग करेल ना?

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—नाही,नाही विषय असा आहे...

सदस्य श्री. राजेश वदारिया :—कारवाई सामान्य प्रशासन विभाग करेल.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—सामान्य प्रशाासनाचा विषय नंतर. आधी हे आंदोलन कसे झाले, काय केले, कारण काय ते पाहिजे ना.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—स्पष्टीकरण शहर अभियंता यांनी दिले पाहिजे. कारवाईचे आपण म्हणत आहात तर ते सामान्य प्रशासन करणार.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—पदाधिकारी काही मागत असतील, त्यास उत्तर देत नसतील आणि काही बोलले तर आंदोलन करतात हे चुकीचे आहे त्याचा खुलासा झाला पाहिजे काय झाले ते.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—मा. सभापतीजी, शहर अभियंता यांना सांगावे की खुलासा करा.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—श्री. राजेशजी, मी विचारत होतो कि लिगल मुद्दा काय आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—हे पहा आजच्या बाबतीत दोन मुद्दे आहेत पहिले म्हणजे हे आंदोलन दोन दिवस का झाले? जसे श्री. चौधरी यांनी म्हटले. दुसरा मुद्दा म्हणजे जे आंदोलन केले तर त्या अधिका—यांवर काय कारवाई होणार? तर ती कारवाई करण्याची जबाबदारी सामान्य प्रशासन विभागाची आहे.

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—आंदोजन ज्याप्रकारे झाले आहे त्याप्रमाणे कारवाई झाली पाहिजे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—प्रथम त्यांना खुलासा तर करु दया ना.

श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—मा. सभापती महोदय, सर्व सन्माननिय सदस्य, आपण जे विचारत आहात की आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी का सामुहिक रजेवर गेले. तर मी आपणांस खुलासा करतो की आम्ही सर्व अभियंता येथे सकाळी ९.०० वाजेपासुन संध्याकाळी ६.३० वाजेपर्यंत आपल्या उल्हासनसगरच्या हितासाठीच काम करत असतो. कधी रजा घेत नाही, वेळ पडल्यावर सुट्टीच्या दिवशी जर बोलावले तर आमचे अधिकारी कामावर हजर असतात. या दोन—तीन महिन्यादरम्यान आम्हां अधिका—यास असे जाणवले की आम्हांवर वेगवेगळया मार्गाने मानसिक छळ होत आहे. उदाहरण म्हणजे माहिती अधिकारात माहिती मागविणे हे प्रत्येक व्यक्ती व अधिका—यांचा हक्क आहे. आम्हांला असे निदर्शनास आले की, काही व्यक्ती जास्त प्रमाणामध्ये आरटीआयच्या माध्यमातुन माहिती मागवितात. आम्हांला ती माहिती खुप जास्त वाटली आणि आम्ही ती माहिती वरिष्ठ अधिका—यांना कळविली. आम्हां लोकांना व्यवस्थितपणे वागणुक दिली नाही. दुसरे प्रकार म्हणजे आम्ही एका कामाची पाहणी करण्याकरीता गेलो. एक ठिकाणी काम बरोबर झाले, दुस—या ठिकाणी बरोबर झाले, तिस—या ठिकाणी जाण्याची गरज नव्हती परंतु म्हटले की काजोल पेट्रोलपंपला जावु तेथे आमच्या एका ठेकेदाराने स्टोंडस्ट्र आणुन ठेवले होते ते आणुन ठेवल्यावर तेथे त्यांनी चर्चा केली व आमच्या अधिका—यास काही अपशब्द म्हटले की ते सहन करण्याच्या पलिकडचे आहे. आम्ही अभियंते येथे आपली शिवीगाळ खायला किंवा आपले मोरल डाउन करायला येत नाहीत. हे वारंवार घडत असेल तर ते आम्हांला बरोबर वाटले नाही. सर्व अधिका—यांनी चर्चा केल्याप्रमाणे हे जर आम्हांस अपमानित करण्याचे षड्यंत्र होत असेल तर आम्ही म्हटले की आम्हांलाही काही मानसन्मान आहे. यासाठी

आम्ही आमचे वरिष्ठ अधिकारी आयुक्त महोदयांना ही कल्पना आधीही दिली होती. एक दोनजण आम्हांस चोर म्हणुन किंवा काही तरी बोलुन मी त्यांचे नाव आता घेत नाही.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>नगरसेवक असतील तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. आयुक्त महोदयांनी केले पाहिजे ते का नाही केले? एका नगरसेवकास निलंबित करता आणि दुस—यास नाही तर ते सुध्दा चुकीचे होते ना.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>आम्ही सामुहिक रजेवर जातांना आयुक्त महोदयांना कल्पना दिली, आमच्यावर हे जे सर्व होत आहे ते सहन न झाल्यामुळे आम्ही सामुहिक रजेवर जात आहोत. त्याचवेळी आम्ही आयुक्तांना कल्पना दिली होती व पोलिस स्टेशन मध्ये जाणार आहोत, आज ते असे करत आहेत उदया जास्त काही होवु शकते. त्यासाठी ही गोष्ट बरोबर नाही. त्याकरीता आम्ही एक दोन दिवसासाठी रजेवर गेलो. ११ तारखेला दुपारी पोलिस स्टेशनला गेलो. पोलिसांनीही आमची तक्रार घेतली नाही. दुस—या दिवशी रविवार होता परत आम्ही तिस—या दिवशी सोमवारी पोलिस स्टेशनला गेलो, तेथे आमची दखल घेतली. त्याठिकाणी श्री. अहुजा म्हणुन साहेब आहेत त्यांच्याजवळ आम्ही एलसी नोंदविली, त्यावेळी श्री. नारायण पंजाबी हे दोन इसमांबरोबर तेथे आले होते. आम्ही १७,१८,१९,२० असे रजेवर गेलो व २१ तारखेला आम्ही आयुक्त महोदयांना सांगु हजर झालो. २० तारखेलाच आम्ही पोलिसांना सांगितले की आम्ही आहोत कार्यालयात. परंतु आम्हांस पोलिस तक्रार करणे गरजेची होती. ही माहिती आपणांस देतो. याबाबतीत आपले जसे आदेश होती त्याप्रमाणे....

यावेळी सदस्या श्रीमती जया माखिजा यांनी सभागृहात प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>नाही, नाही आदेशाचे नाही. तुम्ही एक गोष्ट स्पष्ट करा, किरकोळ गोष्ट आहे, तुम्ही कामावर आलात. आणि दुपारी अचानक सामुहिक रजेवर गेलात. तुम्हांला रजेवर जायचेच होते तर तशी सूचना आम्हांस जसे आम्ही उपोषणाची देतो सात दिवस अगोदर, पाच दिवस अगोदर. दोन तीन महिन्यापासुन तुमचे म्हणणे आहे, दोन तीन महिन्यांपासुन तुम्हांला हा त्रास आहे. आणि मागील वेळेस यांचे सुध्दा आंदोलन झाले ना सफाई कामगारांचे त्यांनी सात आठ दिवस अगोदर सूचना दिली की असे असे करत आहोत म्हणुन आम्ही आंदोलन करत आहोत. तर त्या आंदोलनाची काहीतरी कायदेशीर मर्यादा आहे. ती कायदेशीर मर्यादा आपल्या सारख्या अधिका—याने तोडावी. हे अत्यंत दुर्देव आहे ही पहिली गोष्ट. दुसरी गोष्ट अचानक स ुट्टीवर जायचे जेव्हा तुम्ही ठरवितात. तेव्हा शहरातील बाकीच्यांचा विचार काय आहे, आणि जेव्हा तुम्ही ३.०० वाजता अपिल असतांना दुपारी २.०० वाजता रजेवर जातात. म्हणजे तुम्हांला अपिलाचे उत्तर दयायचे नाही. किंवा जो माहिती विचारत आहे तर ती माहिती टाळण्याचा काय विषय आहे. जी माहिती तुमच्याकडे आहे तीच तुम्हांला दयायची आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>माहिती अधिकार बंद करावेच लागेल. पहिले तर आपण म्हणालात माहिती अधिकार मागत आहे त्यामुळे आपला विभाग त्रस्त होत आहे. माहिती तर कोणीही मागु शकतो, नगरसेवक, बाहेरचा व्यक्ती, परंतु नगरसेवकानेच आपणाकडुन माहिती मागीतली होती, ते तर सार्वजनिक बांधकाम विभागाचे सभापती आहेत, कोणीही मागु शकतो. आपले काम आहे माहिती देणे, जर आपण माहिती देवु शकत नसाल तर तसे आपण माहिती देवु शकता. दुसरी गोष्ट म्हणजे १७ तारखेला आपण कामावर असतांना दुपारी ३.०० वाजता महापालिकेतुन निघुन गेलात. बरोबर आहे की चुकीचे आहे. तसेच आपण आयुक्त महोदयांबरोबर बाहेर फिरण्यासाठी १५ तारखेला गेला होतात, जर आपणांस कोणी कमी जास्त बोलले, शिव्या दिल्या, अपशब्द म्हटले तर १५ तारखेलाच आपणांस १६ तारखेसच रजेवर जायला पाहिजे होते, १६ तारखेस गुरुवार होता व आपण पुर्ण दिवस होतात. १७ तारखेस सुध्दा दुपारपर्यंत कार्यालयात होतात तर काय शिवीगाळाचा काही प्रभाव नाही झाला का? मला वाटते हळुहळु प्रभाव झाला. जसा एक—दोन तासात प्रभाव होतो.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>१६ तारेखस दुसरी घटना झाली आयुक्तांच्या कार्यालयासमोर म्हणुन आम्ही गेलो.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>१५ तारखेस झाले होते ना.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>१६ ला सुध्दा झाले होते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>ठिक आहे १६ झाले, १७ ला तुम्ही कार्यालयात आलात. उप–महापौर,सभागृहनेता, चला रुलिंगवाले तुम्हांला त्रास देतात. ठिक आहे तुम्ही सांगितले का की आपले लोक किंवा बाहेरचे लोक आम्हांला त्रास देत आहेत. आपण काही सांगितलेच नाही आणि आपला सरळ सरळ आरोप आहे की माहिती अधिकारात माहिती मागितली होती आपण ती देण्यास असमर्थ होतात, जेव्हा हिअरींग होते ते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सभापती महोदयांचे होते त्या हिअरींगला आपण उपस्थित नव्हता, त्यांचे उत्तर नाही देवु शकलात म्हणुन तुम्ही रजेवर जाण्याचे नाटक बनविले.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>हे चुकीचे आहे, हिअरींगची आम्ही तारीख दिली होती. ती आधीच दिली होती. त्यादिवशी नाही दिले. दयायचे आहे त्यासाठी हेअरींगची तारीख दिली आहे. नाही दयायचे म्हणुन नाही दिली. आणि आतापर्यंत सर्व हिअरींगचे दिले आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>श्रीमती सरोजीन टेकचंदानी यांच्या हिअरींग तारीख होती. हिअरींग करुन गेले असते ४ वाजता. पत्रात आपण लिहिले आहे की ही लोक आम्हांला त्रास देत आहात. असे करत आहेत, तसे करत आहेत. आपण ते पत्र १६तारखेस दिले. १६ तारखेस तर त्या आल्याच नाहीत महापालिकेत.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>काही गोष्टींची मर्यादा असते. जर एक माहिती आहे तर ठिक आहे. माहिती तयार करण्यास वेळ जातो.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>वेळ दया ना मग त्यांना. १७ तारखेस हिअरींग होते त्यांना सांगायचे होते १५ दिवस लागेल, वेळ लागेल असे सांगायचे होते. परंतु या प्रकारे काम सोडुन आपण किती दिवस गेलात? १७ तारखेस आपण गेलात, १८ ला महासभा आहे, त्यात निषेध करा. आपण महापौरांना भेटा, उप–महापौरांना भेटा. आपली सुनावणी होत नाही तर मग आपण सोडुन जा. उपोषण करा. आपण शनिवारी सुध्दा निघुन गेलात, रविवारी सुट्टी मग सोमवारी महासभा होती, सोमवारी देखील आपण आला नाहीत. मंगळवारी आपणांस कोणी बोलावले आपण का आलात? ज्या लोकांनी शिवीगाळ केली तर त्या लोकांनी सार्वजनिक माफी मागीतली का? जोपर्यंत माफी नाही मागत तोपर्यंत नाही यायला पाहिजे. नाहीतर आयुक्त महोदयांनी आपणांस सांगावयास पाहिजे होते. कोणी आपली माफी मागीतली आपण का आलात? शिवीगाळ केली तर निघुन गेलात व आपल्या मनाने आलात, हे काय आहे? महापौर आल्या असत्या, उप–महापौर आले असते, सभागृह नेता आले असते, आपणांस मनविण्यासाठी. चला शिवीगाळ केली तर आम्ही त्यांना समजावितो. कोणी समजाविले काय? ज्या लोकांनी आपणांस शिवी दिली तर त्यांच्यावर काय कारवाई झाली?

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>त्यांनी आरोप लावला आहे तर त्यासाठी काय करावे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपण अधिकारी आहात, आपण गेलात आम्ही आपली इज्जत करतो, चांगले केले. परंतु परत का आलात? असे कोठे होते? आम्ही जर उपोषणास बसतो त्यावेळी आयुक्त साहेब पत्र देतात की ठिक आहे आपली मागणी आम्ही पंधरा दिवसात पुर्ण करु. आपण उपोषणातुन उठा, आपणांस ज्युस पाजतात. आपण तीन दिवस निघुन गेलात शुक्रवार, शनिवार, सोमवार. जेव्हा आमचे सफाई विभागाचे कर्मचारी एक दिवस आंदोलन करतात तर त्यांचे तीन दिवसांचा पगार आयुक्त महोदयांनी कापला, तर ही लोक चार दिवस न सांगता रजेवर निघुन गेले. व यांना कोणी या म्हटले नाही, किंवा कोणता अधिका–याने म्हटले नाही या म्हणुन. तर सांगावे की आपण सभागृहात आलात कशाला? सर्वात मोठे तर समजा मी आपल्या मनाने उपोषणास बसतो आणि तीन दिवस कोणी आले नाही तर आपल्या मनाने उठुन जावु?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>आम्ही उपोषण केले नव्हते, आम्ही सांकेतिक केले होते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आपण सांगितले होते का तीन दिवस करणार?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>तीन दिवस नाही केले.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>एकतर पत्र दिले जाते किंवा सांगितले जाते, हे पहा चार प्रकारे हडताड होते. एक तर मी १२ तास येथे बसणार. ती वेळ असते सकाळी बसल्यानंतर किती वेळ ते.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>आयुक्त साहेबांनी आम्हांला यायला सांगितले.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आयुक्त महोदयांनी काय आपणांस लिखित दिले आहे की आपण यावे. ते तर महासभेत विचारुच ना. हे पहा, आजपर्यंत प्रत्येक अधिका—यास आदरपुर्वक बोलतो. कोणी असे म्हणणार नाही की महापालिकेत असे अपशब्द म्हटले ते. जर आमचे अधिकारी असे करतील तर त्याचे उत्तर महासभेत आयुक्त महोदयांना दयावे लागेल. आयुक्तांनी कोणत्या आधारावर त्यांना म्हटले की येवुन जा. ज्या दोन लोकांनी दोन म्हणा,तीन म्हणा यांना शिव्या दिल्या.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>आम्ही महानगरपालिकेचे ट्रस्टी आहोत, सभागृह नेता, विरोधीपक्ष नेता सर्व येथे आहेत. तुम्ही मनमानी कारभार करतात, कधीही जाणार, कधीही येणार. कोणाची खाजगी मालमत्ता थोडीच आहे ही?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आज सार्वजनिक बांधकाम विभागाने केले उदया दुसरा विभाग करेल. हे पहा आम्ही एका शरीराचे दोन हात आहोत. दोन डोळे आहोत. एक अधिकारी व एक येथिल ट्रस्टी. सर्व मिळुन काम करायचे आहेत. जर यामध्ये कोणाचाही मतभेद असेल. आज आपण महापौरांकडे, उप—महापौरांकडे, सभागृहनेताकडे, विरोधीपक्षनेताकडे जा सर्वजण तुमच्यासोबत आहेत. मी सर्वांना विचारले आहे, विरोधीपक्ष नेता यांना विचारले की आपणाकडे ही लोक आलेत का? आपण पत्र दया येथे अन्याय होत आहे, सर्वांना शिवीगाळ आम्ही करत आहोत. आम्ही त्यांना बरोबर केले असते, आपण आमचे अधिकारी आहात. असे कसे आपण महापालिका तीन तीन दिवस सोडुन जातात. आपल्या मनाने जा व आपल्या मनाने या. तर आयुक्त महोदयांना याबाबीत निर्णय घ्यावाच लागेल की यांच्यावर कारवाई होत आहे. सफाई कामगार काय वेगळे आहेत का की त्यांनी एक दिवस आंदोलन केले व तीन दिवसाचा पगार कपात केला. कमालाचे आहे, आम्ही आपणांस पाठपुरावा नाही केला, आम्ही आपणांबरोबर एफआयआर दाखल करण्यासाठी नाही गेलो, माझ्याकडे आला असता की हा शिवीगाळ करत आहे, एफआयआर दाखल करु या. मी आपणासोबत आलो असतो. कोणी न सांगता कामावर यायचे.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>आपण सर्व इंजिनिअर्स व स्टाफ आयुक्त महोदयांकडे गेला होतात, आम्ही आयुक्त महोदयांकडे बसलो होतो. आपण याबाबत आयुक्त महोदयांना सांगितले की साहेब, आम्ही सुट्टीवर जात आहोत. त्यावेळी आयुक्त महोदयांनी आपणांस रजेवर जाण्यास परवानगी दिली नाही. त्यावेळी आयुक्त महोदयांनी म्हटले होते की आपण काम चालु ठेवावे माझी मिटींग चालु आहे, मिटींग झाल्यानंतर मी आपणांस बोलावतो. व आपणांशी चर्चा करतो. जर आपण खुपच त्यांना जोर दिला की साहेब असे झाले तसे झाले तर त्यांनी आपणांस सांगितले की जास्तीत जास्त काळया फिती लावुन काम करा. काम बंद झाले नाही पाहिजे, काम चालु ठेवा. तरी देखील आपण सेंट्रल पोलिस स्टेशनला निघुन गेलात. याचा अर्थ असा झाला की आपण आयुक्तांच्या आदेशाचे सुध्दा उल्लंघन केले. आपण त्यांचा आदेश पाळला नाही, ही गैरशिस्त आहे. आपण माहिती अधिकाराबाबत बोलत आहात. सेक्शन ६० ए आपण वाचावे, ज्यात महानगरपालिकेस सर्व कामांची माहिती नेटवर, वर्तमानपत्रात दयायची आहे. आपण अशी आपली एक पध्दत बनवा की सर्व माहिती आपल्या नेटच्या साईटवर उपलब्ध झाली पाहिजे. माहिती येते तर आपण त्यास लिहुन दया इंटरनेटद्वारे. परंतु आपण तशी पध्दत बनविली नाही. यासाठी आपणांस वेळ जात आहे. आपण कामाचे जे प्राकलन बनवत आहात, जो डीपीआर बनवत आहात. आपण जे काम करत आहात, वर्कऑर्डर दिले तर त्यास नेटवर टाकावे. तर आपणाकडे माहिती मागण्यास कोण येईल? जर येत असतील तर त्यास उत्तर दया की नेटवर माहिती आहे म्हणुन. तर तेथुन माहिती घ्या. साहेब, सेक्शन ६० ए वाचा मला मराठी बरोबर येत नाही. यांना सांगावे की ६० ए मध्ये काय काय लिहिले आहे ते. ही सर्व माहिती आपणांस इंटरनेटवर व वर्तमानपत्रात दयायची आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>महानगरपालिका आपले सर्व अभिलेख अशा रितीने व अशा नमुन्याने पालिका त्याची निर्देशसुची तयार करील जेणेकरुन पोटकलम ३ मध्ये विर्निदिष्ट केलेली माहिती महानगरपालिकेच्या वेबसाईटवर प्रकट करता येईल. माहिती प्रकट करण्याच्या रितीमध्ये न्युजपेपर, इंटरनेट अशारितीने महानगरपालिकेच्या मुख्यालयात, तसेच प्रभाग कार्यालयात सुध्दा प्रकट करण्याच्या अशा पध्दतीचा अंतर्भाव असेल. ज्या भाषेत माहिती उपलब्ध असेल त्याच भाषेत महापालिका ती माहिती प्रकट करेल. म्हणजे तुमच्याकडे इंग्रजीत असेल तर इंग्रजीतच माहिती उपलब्ध करावी लागेल. महानगरपालिकेस पुढील माहिती प्रकट करणे आवश्यक असेल, महानगरपालिकेचा तपशिल, महानगरपालिकेचे

कार्य पार पाडणे किंवा सल्ला देणे या प्रयोजनासाठी कोणत्याही नावाने संबोधित अशी किंवा इतर विकाय दर्शविणारे विवरणपत्र.

**श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**ही सामान्य माहिती आहे.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**ही डिटेल आहे, सामान्य नाही आहे. प्रत्येक प्रकारे, प्रत्येक प्लनिंगने जे काही आपण प्रकल्प करत आहात, त्याची माहिती आपणांस तेथे दयायची आहे. आपण जर अशी माहिती देत असाल तर फक्त आपलाच नाही तर संपुर्ण महापालिकेचा माहिती अधिकार संपृष्टात येईल.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—**बैठकीचे काम खुले असो अथवा नसो अशा बैठकीचे काम नागरीकांना पाहण्यासाठी उपलब्ध असो किंवा नसो जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध करावी.

**श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**सर्वसामान्य माहितीबाबत वर्कऑर्डर आहे, काही आहे ते देता येईल पण कामाची माहिती कसे देणार?

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**आपणाकडुन माहिती काय मागणार. सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणता रस्ता बनविला, कोणती गल्ली बनविली, कोणती नाली बनविली, त्याचा वर्कऑर्डर कधी आहे, त्याचा कालावधी किती आहे. त्याचे ॲग्रीमेंट दया. तर ती माहिती नेटवरच टाकुन दया ना.

**श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—**ही सर्व माहिती नाही देवु शकत.

**सदस्य श्री. राजेश वदारिया :—**नाही देवु शकत पण जे एक्स्ट्रा मागणार ते तर देवु शकता. प्रथम आपण आपले होमवर्क करा असे आमचे म्हणणे आहे मग आपले माहिती अधिकारच कमी येईल.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—**माझे असे म्हणणे आहे की आपण सार्वजनिक बांधकाम विभागाचे इंजिनिअर आहात आणि ते आपले सभापती आहेत, तर माहिती देण्याची अडचणच का येते? बसा, काय पाहिजे, हे घ्या, ते घ्या, असे बसुन तेथे चर्चा करु शकता ना, सभापतींच्या दालनात जावुन.

**श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—** मी माहिती त्यांना वारंवार दाखविली. त्यांच्या दालनात वारंवार आमचे अधिकारी गेले आहेत, श्री. शितलानी, जितु वगैरे.

**श्री. महेश शितलानी, उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग:—**माहिती तर त्यांना दाखविली. तरी सुध्दा माहिती मागीतली, त्या माहितीत संतृष्ट नाही व आठवडयापुर्वी अपिलाची माहिती दिली होती. यापुर्वीच आम्ही अपील ठेवले होते व आता सुध्दा आम्ही त्यांना अपीलाची तारीख दिली आहे. त्यांचे आजसुध्दा चार अपील आहेत.

**सदस्य श्री.जमनादास पुरस्वानी :—**महानगरपालिकेचे अधिकारी, ट्रस्टी, महापौर, उप—महापौर, सभापती हे एका शरीराचे दोन हात आहेत. दोन पाय आहेत. हे समांतर चालले पाहिजे. एका पायास जर इजा झाली तर दुसरा सुध्दा गुडगे टेकुन देईल. मी स्वत:चे उदाहरण देतो. आमचे अधिकारी व आमच्यामध्ये प्रेमभाव असला पाहिजे. पुर्वी शहर अभियंता म्हणुन श्री. चिजवानी साहेब होते. आपण त्यांना ओळखता ना. मी १९९८ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचा सभापती होतो, तेव्हा शहर अभियंता श्री. चिजवानी साहेब होते. जेव्हा नविन नविन सभापती होतो ना त्यावेळी तो काही ना काही प्रश्न टाकतो, तेव्हा माहितीचा अधिकार नव्हतो त्यावेळी मी त्यांना तीन—चार पत्र लिहिले. मी आपणांस सांगतो त्यावेळी ते माझ्याकडे आले आणि मला म्हणाले, आपणांस जेव्हा जेवायचे असते तेव्हा काय आपण आपल्या पत्नीस चिठ्ठी लिहिता की आज दालफ्राय बनव, भेंडी बनव. असे लिहितो काय आज रात्री माझ्यासाठी पुलाव बनव. त्यावेळी मी सर्व पत्र फाडुन टाकले त्यानंतर मी एक सुध्दा पत्र लिहिले नाही. श्री. चिजवानी व मी बसुन काम करत होतो. त्यावेळी तीन पत्र दिल्यानंतर दोन वर्ष मी सभापती होतो तर पहा की मी एक सुध्दा पत्र लिहिले आहे का? याप्रकारे जर आपण एक हात देणार तर समोरचा दोन हात देईल. तो माहिती मागतो आपण त्यास दाखवा आपणांस काय त्रास आहे. कोठे चुकीचे आहे, जर ठेकेदार ग्रीट वापरत आहे तर ठेकेदारास मना करा. काम बरोबर होत नसेल तर लक्ष दया. मग पाहिजे काय?

यावेळी सदस्य श्री. भारत राजवानी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**समजा आपण तक्रार केली ठेकेदारांबाबत तर ठेकेदारास शिक्षा झालीच पाहिजे. हे उलटे होत आहे, जो तक्रार करतो त्यासच आपण शिक्षा देतात. त्याबाबतीत ठेकेदारास मना केले पाहिजे, त्यास शिक्षा केली पाहिजे, हे नाही तसे कर. आता जे बीएमएसीचे काम चालु आहे ते बरोबर आहे का? त्याची फार तक्रार येते आपण वॉट्सअप व सोशल मिडीयावर पहा. एकदम निष्कृष्ट दर्जाचे काम चालु आहे, खराब काम चालु आहे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**श्री. केशु या ठेकेदाराचे काम तर अतिशय तिस—या स्तरावरचे आहे. मनुष्य बीएमवरुन जात असतांना त्यांच्या पायास डांबर लागत नाही. आणि आपण साडेपाच मिटर त्यास देत आहोत ते चारशे मिटरचे सुध्दा काम नाही.

**<u>सदस्या श्रीमती कविता पंजाबी:—</u>**सार्वजनिक बांधकाम विभागाचे काम पाहुन आम्हांला लाज वाटत आहे. आम्ही सुध्दा नगरसेवक आहोत आम्ही काय करत आहोत. तुम्ही वर्तमानपत्र पहा बातमी येते, आमच्याजवळ व्हीडीओ येतो. सोशम मिडीयावर बातमी येते, दोन दिवसांपुर्वी रस्ता बनविला आहे, पहा कसा आहे. बिलकुल खालच्या दर्जाचे काम होत आहे.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**माझ्या घराजवळ खड्डयातुन माती बाहेर येते. त्याच्यावर डांबरीकरण करत आहेत. जेव्हा मी मुलगा पाठविला तेव्हा ते काम बरोबर करत आहे, एकदम माझ्या घरासमोरच. नगरसेवकांच्या घरासमोर असे करत आहेत तर इतर ठिकाणी कसे काम करत असतील? फोटो काढले आहेत मी हे पहा.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>**१९९७ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभाग नंबर १ वर होता.

**<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>**सार्वजनिक बांधकाम विभागात त्यावेळी हेच अधिकारी होते आता सुध्दा तेच आहेत.

**<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>**होय, तेच होते. त्यात काही सेवानिवृत्त झालेत, काही आहेत. श्री. शेवकानी सारखे इंजिनिअरवर गर्व होता, ते जे काम सांगत ते त्वरीत होत होते. आपण आता शहर अभियंता आहात, मी म्हणतो त्यावेळी श्री. चिजवानी साहेब होते ते चांगले होते ना, त्यांच्या वेळेत पत्र येणे बंद झाले होते.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**हे पहा मी फोटो काढले आहेत माझ्या घरासमोरच काम चालु आहे डांबरीकरणाचे ते मलमपट्टी लावुन काम चालु आहे.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**मुकादम उभा राहतो त्याचे काम नाही काय पाहणी करायचे?

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**आम्ही जर याबाबत बोललो तर तुम्ही आमच्यावर येतात की तुम्ही लोक आम्हांला त्रास देत आहात. फक्त माल कमविण्यासाठीच बसले आहेत.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**सदस्य सांगत आहेत की चुकीचे काम होत आहे तर बोलायचे की हे त्रास देत आहेत.

**<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>**आम्ही नजर नाही ठेवली तर तुम्ही संपुर्ण उल्हासनगरच विकुन टाकणार.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**एक लहान गोष्ट सांगतो, आताच श्री. राजेश यांनी सांगितले की आपण कसे रजेवर गेलात, जर आयुक्त साहेबांनी आपणांस सांगितले की आपण रजेवर नाही जावु शकत, काळया फिती लावुन काम करावे. आता आपण बोलत आहात की आयुक्त आल्यानंतर आम्ही सर्व गोष्टी पाहतो. आम्ही जर आपणांस सांगितले की हे काम करा, तर आपण म्हणाल की नाही आम्ही आयुक्तांना विचारतो. कोणतेही काम असो, एकसुध्दा काम आपण कोणी सांगितल्यानंतर आयुक्तांना न विचारता स्वत: केले असेल. तर त्यावेळी आयुक्त महोदयांनी सांगितले की सुट्टीवर जावु नका तर मग का गेले तुम्ही? श्री. राजेश आपण होतात नाही आयुक्त महोदयांकडे?

**<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>**यासाठीच तर मी म्हटले की हे गैरशिस्तीचे आहे. आपणांस आयुक्त महोदय म्हणतात की जावु नका, तर संपला विषय.

**<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>**आपण तेथे बसला होतात म्हणुन आम्हांला हे माहित झाले, आपण तेथे नसता तर आम्हांला काय माहित पडले असते की काय काम आहे हे लोक. आम्ही जर आपणांस म्हटले की आम्हांला हे काम करायचे आहे तर आपण म्हणता नाही, आयुक्त महोदयांना विचारतो.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>श्री. सुर्वेजी, मी वारंवार हेच म्हणत आहे की आपण सर्वांनी मिळुन मिसळुन काम करायचे आहे. छोटे छोटे प्रकरण होते तर आपण आमच्याकडे या, महापौर, उप–महापौरांकडे जा. सर्व गोष्टी विसरुन आपणांस शहराच्या विकासासाठी काम करायचे आहे.आपणांस जर कोणी सांगत असेल तर आपणांस कशाप्रकारे काम करायचे आहे ते पहायचे आहे. जर ठेकेदार काम व्यवस्थित करत नसेल तर त्यास तुम्ही टाईट करा. त्याच्या गुणवत्तेत नियंत्रण ठेवा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>महोदया, आपण आता स्थायी समितीचे सभापती आहात, पुर्वी मी होतो, आता स्थायी समितीचा सदस्य आहे. तरी सुध्दा मला किती वेळेपासुन डांबरीकरणाचे काम करण्यासाठी मागे लागावे लागते अदयाप काम होत नाही. वारंवार फोन करावे लागते, सभापती असतांना व आज सुध्दा तेच.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :–</u>आयुक्त महोदयांनी जे दिले आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>काय दिले आहे आयुक्त महोदयांनी, श्री. राजेशजी. ते शेडयुल जे दिले आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>हे पहा, शेडयुलने कामच नाही होणार.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>शेडयुल व्यतिरिक्त, शेडयुल तर सोडाच, ज्याचा शेवटचा नंबर आहे त्याचे सुध्दा प्रथम काम केले आहे. काय बोलणार त्यास आपण?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>जर याच सभागृहात आपण वारंवार बोलत होतोकी खड्डे भरले जातील की नाही तर तेव्हा बोलत होते भरणार.  आज ब–याच जागी थोडेफार काम झाले.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>माझ्या प्रभागात एक कण नाही टाकला, चारही प्रभागामध्ये.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आता आपण याबाबत जरा लक्ष दया.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>ठेकेदाराची तक्रार केली तर तो दम देतो की काम बंद करुन टाकेन.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>होय, ही काय पध्दत आहे?  काय चालले काय आहे आपले?

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>जाणुन बुजुन जनतेच्या नजरेत आम्हांला पाडतात की काम बंद केले हे लोक आम्हांला त्रास देत आहेत.  पण गुणवत्तेचे काम नाही करायचे?

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>साहेब, गुणवत्तेबाबत आम्ही बांधील आहोत. जेथे काम चालु असेल तेथिल नमुना घेवु या आपण आमच्याबरोबर चला, जर गुणवत्ता खराब असेल तर ते काम आम्ही बंद करु. जर ते काम खराब असेल तर आपण तो नमुना तपासु.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>कोणत्या लॅबमध्ये आपण तपासता. जे लॅबवाले आहेत ते सुध्दा यांना बांधलेले आहेत, सभागृहनेताजी.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u> नाही साहेब, आपणांस कोठे ना कोठे विश्वास असला पाहिजे.  आपल्यासमोर आम्ही करु. आज आम्ही फॉलोवर लाईन येथे टेस्टींग किट मागविले आहे. जर काम चालु झाले तर आपल्यासमोर आम्ही टेस्ट करु.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>माझ्याकडे फोटो आहे.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>नाही साहेब, त्या फोटोतुन नाही, आम्ही एक नमुना घेवु ना.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>तुम्ही या माझ्याबरोबर.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>हो येवु ना. आता आपण एक नमुना घेवु या.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आता मी काय सांगतो, श्री. भारत राजवानीजी, आता हे जे आपणांस वचन देत आहेत येथे....

<u>सदस्य श्री. भारत राजवानी:–</u>त्याची क्वालिटी बरोबर नाही.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>आमचे इंजिनिअर्स पाहतील, कोठे चुकीचे काम होत असेल तर आपण आम्हांस सांगावे. खराब असेल तर आम्ही तो माल नाकारु.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>हाच माल सर्वीकडे टाकत आहेत.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>आपण तपासु या ना.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>सुपरविजन करणे आपले काम आहे. आपण बोला ना की ही तक्रार यांची आहे तर हे तक्रार करत असल्यामुळे काम बंद करुन टाकु. याची फारच तक्रार आहे.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>नाही. नाही.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>आता खड्डयामध्ये ऐअरब्रेक टाकण्याचे सांगितले आहे. परंतु अदयापपर्यंत त्या ठेकेदाराने आणले नाही. माती निघणार कशी?

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>आपणांस काम करायचे नाही. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या चुका करत आहेत की अचानक सुट्टीवर जाणे वगैरे त्याबाबत आम्ही काय करणार? समितीतर्फे त्यांच्यावर काय कारवाई करणार की नाही. कोणीही सुट्टीवर निघुन जाणार. माझे असे म्हणणे आहे की अशी सवय पडली नाही पाहिजे.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>तसे नाही, जर आमच्या सहनशीलतेच्यावर होईल तर आम्ही नक्कीच सुट्टीवर जावु. हे जास्त झाले तेव्हा आम्ही गेलो. तसे साहेबांना सांगितले होते.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>माहिती मागितली तर आपण माहिती देत नाहीत.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>काय करता आपण येथे महासभा आहे त्याची सुध्दा आपणांस मान्यता घ्यावी लागेल. आपण मान्यता नाही घेतली तर हे बेकायदेशीर आहे.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>सभापती माहिती मागतात तर आपण दोन, तीन वेळा माहिती देत नाहीत.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :–</u>साहेब, माहिती दिली आहे आपण कार्यालयात येवुन पहा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>आता हा विषय नाही, आपणांस या सभेचे काम सुध्दा पुर्ण करायचे आहे.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :–</u>शहराचे नाव खराब होत आहे ना, वर्तमानपत्रात बातमी येते ना.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–</u>आम्ही किती वर्षापासुन महापालिकेत आहे, आम्ही सत्तेत होतो, आता विरोधात आहोत, पण पुर्वी असे नव्हते.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>आता मी सरळ सांगतो की, अधिका–यांचे असे आहे, आता सर्व फक्त सार्वजनिक बांधकामच नाही, तर सर्व विभागच, असे आहे की, पाहायचे की नगरसेवक कोणी आहे, तसे माणुस पाहुन काम करायचे. साहेब. एवढे चुकीचे होत आहे, एक साधे कामास सुध्दा वेळ जात आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–</u>आता हे विषय संपवु या. शहर अभियंता आयुक्तांच्या स्थानी बसले आहेत. किती वर्षापासुन सार्वजनिक बांधकाम विभाग आहे, आजपर्यंत तेथे कोणत्याही अधिका–याने असे केलेले नाही. फक्त त्यामध्ये एक शहर अभियंता वेगळा आला आहे. तर कृपा करुन शहर अभियंता आपण कोणाच्या सांगण्यावर येवु नका. डोक जरा शांत ठेवा, आपली महापालिका फारच चांगली आहे. सर्व नगरसेवक चांगले आहे, शहराच्या हितासाठी जर कोणी

काही मागितले, जर आपण १०० टक्के किंवा काही प्रमाणात लक्ष देणार ना तर असे पत्र नाही येणार. पत्रास कशाप्रकारे बंद करायचे यास जरा आपण समजदारीने घ्यावे. शहरात काम चालु आहे पण त्याच्या पातळीवर जरा लक्ष दयावे. आम्ही हेच म्हणतो की काम चांगले झाले पाहिजे. काम पुर्ण होईल का, तर आपण सांगितले थोडे उरेल. तर सर्वच खड्डे भरले पाहिजे. जे शेडयुल आपण बनविले त्या शेडयुलने काम चालु करावे. आपण चार दिवस जे नुकसान केले आहे त्याची भरपाई आम्हांस करुन दया. आपण जास्त काम करा. आम्ही सुध्दा संतृष्ट होवु की ठिक आहे, ते काम करत आहेत, बाकी गोष्टी जावु दया. आपणासर्वांनी मिळुन मिसळुन काम करावे. या शहराच्या हितासाठी काम करा. न आरोप लावायचे ना काही. त्यास आपण चांगल्याप्रकारे स्वत: भेट दया. आपण शहरात ८—९ वाजेपर्यंत पहा की शहराची काय काय, कोठे कोठे कशी स्थिती आहे. जास्त वेळ देवुन काम करा, सर्व मिळुन मिसळुन कामे करावे. व विचार करुच नका की हे चार दिवस कोठे गेले, १७ कुठे गेला, १८ कोठे गेला. हा विषय आता काढु नका. व लवकरात लवकर शहरातील खड्डे भरुन दया.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>मी फक्त रविवारपर्यंत वाट पाहिल. जर माझे काम नाही झाले तर मी ते पाहील आणि मी सार्वजनिक बांधकाम विभागाचे सर्वच सर्व कारनामे काढुन सर्वांच्याच मी मागे लागेल, असे मी समोरासमोर बोलत आहे. मी सर्व विसरुन जाईल.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>१० वेळा ठेकेदारास सांगितल्यानंतर ठेकेदार काम नाही करत तर नगरसेवक भडकणार नाही तर काय करेल?

यावेळी सदस्य श्री. सुनिल सुर्वे सभागृहातुन बाहेर गेले. 

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>श्री. सुर्वेजी तुम्ही बसुन घ्या, जावु नका. हे पहा आजपर्यंत मी पाहिले आहे की आमच्या स्थायी समिती सदस्याने जर कोणते काम सांगितले असेल तर अधिकारी दोन—तीन दिवसात काम करुन देवु असे सांगतात. आपण थोडया थोडया गोष्टीत नाराज होवु नका, त्यांना आश्वासन दया. माझे काम उशिरा करा, प्रथम श्री. सुर्वे यांचे काम झाले पाहिजे, संपवा विषय.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>श्री. सुर्वे यांचे काम शनिवार, रविवार या सुट्टीच्या दिवसात संपवुन टाका.

<u>सदस्य श्री. भारत राजवानी :—</u>ठेकेदार जे काम करत आहे, तेथुन माती काढतो व तेथेच रस्त्यावर सोडुन देतो, ते उचलत नाहीत. तर त्यांना सांगावे की सोबत जे जेसीबी दिले आहे तर त्याद्वारे त्याच वेळी तेथुन उचलुन घ्यावे.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>हो आजच पाहतो.

<u>महापालिका सचिव :—</u>मी विषय सुरुवातीलाच वाचुन दाखविला आहे.

<u>सदस्य श्री. राजंश वदारिया:—</u>ठिक आहे, पास, इतिवृत्ताची वाट न पाहता पास.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. १** :—डेंगू व मलेरीया आदी रोगांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी आवश्यक अळीनाशके/ डासनाशके खरेदीसाठी न्युनतम दर सादर करणारे मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली व मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन व मे. अजय बायोटिच (इंडिया) लि. यांच्याशी संविदा करण्याकरीता मान्यता मिळणे.

<u>दुरुस्ती प्रत</u>

<u>प्रस्तावना</u>

***वैद्यकीय आरोग्य विभागास दरवर्षी उल्हासनगर शहराच्या नागरीकांच्या आरोग्याच्या दृष्टीने औषधे खरेदी करणे आवश्यक असते. डासांमुळे डेंगू व मलेरीया आदि आजार होतात. त्यामुळे वेळीच प्रतिबंधात्मक कार्यवाही***

*करण्यासाठी वेळीच फवारणी व मलेरीया ऑईल स्प्रेडींग करणे आवश्यक असते. त्यानुसार आवश्यक डासनाशक औषधे खरेदीसाठी मा. आयुक्त सो यांच्या दि. 09/08/2017 रोजीच्या मान्यतेने सदर औषधे खरेदीची निविदा ई-टेंडरींगद्वारे प्रसिध्द करुन जाहिर निविदा वृत्तपत्रात प्रसिध्दीसह उल्हासनगर महानगरपालीकेच्या वेब साइटवर ई-निविदा सुचना प्रसिध्द करुन* E-Tendering *निविदा मागविण्यात आल्या होत्या.यामध्ये प्राप्त पाच निविदा दिनांक 18/09/2017 रोजी निविदा समितीचे सदस्य तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधि यांचे समोर ई-निविदा संगणक प्रणालीद्वारे उघडण्यात आल्या. निविदा समितीने सर्व कागदपत्रांची पहाणी केली. प्राप्त पाच ही निविदाकार यांनी अटी व शर्तीनुसार कागदपत्रे सादर केल्याने पात्र ठरले. परंतु मे. बायोटिक इंटरनॅश्नल लि. व मे. स्पाईक पेस्टोकेम प्रा. लि., यांनी निविदेतील अटी व शर्तीनुसार किटकनाशक औषधांचे नमुने वैद्यकिय आरोग्य विभागात सादर केलेले नाही. त्यामुळे त्यांनी निविदेतील अटी व शर्तीची पुर्तता केलेली नाही. व 3 निविदाकार मे. रविराज केमिक्लस व मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पेरेशन व मे. अजय बायोटिच (इंडिया) लि. यांनी अटी व शर्तीनुसार पुर्तता केली असल्याने निविदा समितीने पात्र 3 निविदाकार यांचा वित्तीय लिफाफा उघडण्याबाबत मान्यता दिली. त्यानुसार दिनांक 05/10/2017 रोजी दुपारी 12.15 वाजता निविदा समितीच्या मान्यतेन वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र 3 निविदाकारांनी सादर केलेल दर खालीलप्रमाणे आहेत.*

*<u>तुलनात्मक तक्ता</u>*

| Sr. No | Description of The Item/product | Quantity/Nos | M/S Ajay Biotech India Ltd. | M/S Raviraj Chemicals | M/S Dolphin sales Corporation |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Malaria Larvicide Oil IS No.588/1978 | 7000 | 0 | <u>249</u> | 260 |
| 2 | Pyrethrum 0.5%+<br>Maylethion1% | 200 | 0 | 3300 | <u>2790</u> |
| 3 | Temephose 50%EC IS No. 8498/1972 CBI Register WHO Approved | 600 | 0 | <u>2725</u> | 2890 |
| 4 | Deltametherin 1.25% ULV IS No. 15227/2002 CBI Register, WHO Approved | 600 | 0 | <u>2870</u> | 3000 |
| 5 | Labda cyhalothrin 10% WP IS No.14510/1997 CBI Register, WHO Approved | 100 | 0 | 4890 | <u>4147</u> |
| 6 | Cyfinothril 5% EC CBI Register, IS No. 8498/1972 CBI Register, WHO Approved | 200 | 0 | 0 | 0 |
| 7 | B.T.I.5% WP | 200 | <u>1300</u> | 2800 | 2390 |
| 8 | Karnim EC | 200 | 0 | 2450 | <u>1759</u> |

*उपरोक्त तुनात्मक तक्त्यानुसार अ. क्र. 1,3 व 4 साठी मे. रविराज केमिकल, डोंबिवली, अ.क्र. 2,5 व 8 साठी मे. डॉल्फीन कॉर्पोरेशन, अ. क्र. 7 साठी मे. अजय बायोटिच (इंडिया) लि. पूणे, यांनी सर्वात कमी दर सादर केले आहेत. तसेच अ.क्र. 6 यासाठी कोणीही दर सादर केलेले नाहीत. तरी निविदा समिती यांच्या निर्देशानुसार वरील प्रमाणे न्युनतम दराच्या निविदाधारकांशी त्यांनी सादर केलेल्या दरांबाबत वाटाघाटीसाठी करण्यासाठी दिनांक 06/10/2017 रोजी दुपारी 04.00 वाजता बोलावून न्युनतम दराच्या निविदाकारांशी निविदा समितीने वाटाघाटी केल्या. सदर वाटाघाटीअंती सर्व निविदाकाराने सदरचे दर जी.एस.टी. सहीत असून, सादर केलेले दर योग्य असल्याचे नमूद केले व त्याप्रमाणे लेखी पत्र दिले आहे. वाटाघाटी अंती प्राप्त दरांचा तक्ता खालीप्रमाणे आहेत.*

| अ. क्र. | औषधांचे नांव व त्यांचा तपशील | परिमाण | न्युनतम निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर प्रति नग/किलो/लिटर | मागील दर | वाटाघाटी अंती प्राप्त | अपेक्षीत खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|

| | | | मे. रविराज केमिकल्स | डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | मे. अजय बायोटिच (इंडिया) लि. | (सन 2016 – 17 | दर | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Malaria Larvicide Oil IS No.588/1978 | 7000 | 249 | | | 168 | 224 | 1568000 |
| 2 | Pyrethrum 0.5%+<br>Maylethion1% | 200 | | 2790 | | 2460 | 2750 | 550000 |
| 3 | Temephose 50%EC IS No. 8498/1972 CBI Register WHO Approved | 600 | 2725 | | | 1889 | 2500 | 1500000 |
| 4 | Deltametherin 1.25% ULV IS No. 15227/2002 CBI Register, WHO Approved | 600 | 2870 | | | 1999 | 2611 | 1566600 |
| 5 | Labda cyhalothrin 10% WP IS No.14510/1997 CBI Register, WHO Approved | 100 | | 4147 | | 3610 | 4100 | 410000 |
| 6 | Cyfinothril 5% EC CBI Register, IS No. 8498/1972 CBI Register, WHO Approved | 200 | -- | -- | -- | -- | -- | -- |
| 7 | B.T.I.5% WP | 200 | | | 1300 | -- | 1280 | 256000 |
| 8 | Karnim EC | 200 | | 1759 | | 1521 | 1725 | 345000 |

वाटाघाटी अंती प्राप्त दरानुसार उक्त नमुद केलेली अळीनाशक/डासनाशके त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा नुसार खरेदीकरीता रू 61,95,600/- खर्च अपेक्षित आहे. परंतु सदरचा खर्च हा सन 2017-18 च्या अर्थिक अंदाजपत्रकामध्ये दिलेल्या रुपये 5000,000/- तरतूद पेक्षा जास्त असल्याने मागवण्यात येणाऱ्या औषधांचे परिमाण कमी करण्याचे प्रस्तावित करण्यात येते.

तरी उक्त मागणी करण्यात येणाऱ्या औषधांचे परिमान व त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहेत

| अ. क्र. | औषधांचे नांव व त्यांचा तपशील | परिमाण | न्युनतम निविदाधारकाचे नाव व त्यांचे प्राप्त दर प्रति नग/किलो/लिटर | | | वाटाघाटी अंती प्राप्त दर | अपेक्षीत खर्च रुपये |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | मे. रविराज केमिकल स | डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन | मे. अजय बायोटिच (इंडिया) लि. | | |
| 1 | Malaria Larvicide Oil IS No.588/1978 | 5000 | 249 | | | 224 | 1120000 |
| 2 | Pyrethrum 0.5%+<br>Maylethion1% | 200 | | 2790 | | 2750 | 550000 |
| 3 | Temephose 50%EC IS No. 8498/1972 CBI Register WHO Approved | 500 | 2725 | | | 2500 | 1250000 |
| 4 | Deltametherin 1.25% ULV IS No. 15227/2002 CBI Register, WHO Approved | 400 | 2870 | | | 2611 | 1044400 |
| 5 | Labda cyhalothrin 10% WP IS No.14510/1997 CBI Register, WHO Approved | 100 | | 4147 | | 4100 | 410000 |
| 6 | Cyfinothril 5% EC CBI Register, IS No. 8498/1972 CBI Register, WHO Approved | 200 | -- | -- | -- | -- | -- |
| 7 | B.T.I.5% WP | 200 | | | 1300 | 1280 | 256000 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | Karnim EC | 200 | | 1759 | | 1725 | 345000 |

*वाटाघाटी अंती प्राप्त दरानुसार उक्त नमुद केलेली अळीनाशक/डासनाशके त्यांच्या समोर दर्शविलेल्या परीमाणा नुसार खरेदीकरीता रू. 49,75,400/- (रूपये ऐक्योनपंन्नास लाख पंच्चात्तर हजार चारशे मात्र) खर्च अपेक्षित आहे. प्राप्त दर वाजवी आहेत. सदरचा खर्च सन 2017-18 च्या आर्थिक अंदाजपत्रकामध्ये हिवताप व डेंग्यु प्रतिबंधक खर्च यात रुपये 5000,000/- तरतूद करण्यात आली आहे. पैकी पुर्ण तरतूद शिल्लक आहे त्यातून करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. तरी सदरच्या खर्चास व तसेच उक्त औषधांसाठी बाब निहाय न्युनतम दर सादर करणा-या निविदाकार मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली व मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन व मे. अजय बायोटिच (इंडिया) लि. यांच्याशी संविदा करण्याकरीता मा. स्थायी समितीची मान्यता आवश्यक आहे. करिता सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 73 (क) अन्वये मान्यतेसाठी सविनय सादर.*

स्थायी समिती ठराव क्र. ५९ दिनांकः- २४/११/२०१७

सुचकाचे नाव :- श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :- श्री. राजेंद्र चौधरी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार डेंगू व मलेरीया आदी रोगांवर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यासाठी आवश्यक अळीनाशके/डासनाशके खरेदीसाठी बाबनिहाय न्युनतम दर सादर करणारे मे. रविराज केमिकल्स, डोंबिवली व मे. डॉल्फीन सेल्स कॉर्पोरेशन व मे. अजय बायोटिच (इंडिया) लि. यांच्याशी संविदा करण्यास मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यात येईल.

सुचकाची सही/-

अनुमोदकाची सही/-

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :- विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

⇨ विषय क्र. २ :- उल्हासनगर-३ येथिल सपना उदयान येथे सिंधुभवन व आजुबाजूचा परिसर विकसित करणेकरीता निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

---

सदस्य श्री. राजेश वदारिया :-हा विषय सुध्दा इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता पास आहे.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :-निविदा प्रक्रिया करणेस तसेच वित्तीय मान्यता देत आहोत.

सदस्य श्री. राजेश वदारिया :-होय, प्रशासकिय व वित्तीय मान्यता देत आहोत. इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता.

सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड :-निविदा प्रक्रिया लवकरात लवकर करा.

सदस्य श्री. राजेश वदारिया :-लवकरात लवकर निविदा मागवा की जेणेकरुन लवकरात लवकर होईल.

श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :-आपण कमी कालावधी म्हणता तर आपण तो कालावधी दया.

सदस्य श्री. राजेश वदारिया :-लवकरात लवकर निविदा काढावी.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—</u>यात असे करु या. यास प्रशासकिय व वित्तीय मान्यता देवुन लवकरात लवकर निविदा काढण्यात यावी.

<u>महापालिका सचिव :—</u>ठिक आहे. ठरावात तसे टाकते. मी ठराव वाचुन दाखविते. ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—३ येथिल सपना उदयान येथिल सिंधुभवन येथे दोन मजले बनविणेस व आजुबाजूचा परिसर विकसित करणेकरीता प्रशासकिय व वित्तीय तसेच त्वरीत निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

<u>श्री. राम जैसवार, शहर अभियंता तथा आयुक्तांच्या स्थानी प्राधिकृत अधिकारी :—</u>त्वरीत निविदा काढण्यास मान्यता देत आहे असे लिहा.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>होय, यात त्वरीत निविदा काढण्यास मान्यता देत आहे. इतिवृत्ताची वाट न पाहता ठराव पास करा.

<u>काही सदस्य :—</u>पास—पास......

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २** :— उल्हासनगर—३ येथिल सपना उदयान येथे सिंधुभवन व आजुबाजूचा परिसर विकसित करणेकरीता निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देणे.

<u>प्रस्तावना</u>

उल्हासनगर-३ येथील सपना उद्यान येथे तळमजला + पहिला मजला असे सिंधूभवन बनविणेकरीता सन्माननिय सदस्यांनी विनंती केल्यानुसार सदर कामाचे (तळमजला बांधकामाचे ) रु.१,००,२०,०००/- एवढया रक्कमेचे प्राकलन तयार करुन ई निविदा प्रक्रिया करण्यात आली. यामध्ये सल्लागारांचे शुल्क, कामाच्या बांधकामाची गुणवत्ता तपासणी, इत्यादी बाबी समाविष्ट करुन एकूण १,२५,००,०००/- एवढी रक्कम होत होती. सदर कामाच्या ई निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे. सतिश कंन्स्ट्रक्शन यांना कामाचे कार्यारंभ आदेश निर्गमित करण्यात आले. सन्माननिय सदस्यांनी जरी तळमजला + पहिला मजला बांधणेकरीता मागणी केली असली तरी महापालिकेची आर्थिक परिस्थिती विचारात घेता सदर सिंधुभवनच्या फक्त तळमजल्याचे काम हाती घेण्यात आले होते. सद्यस्थितीत प्लींथचे काम पूर्ण करण्यात आले असून तळमजल्याचे आर.सी.सी चे काम पूर्ण झाले आहे.

दिनांक २७/०९/२०१७ रोजी मा.आमदार, मा.आयुक्त, माजी नगरसेवक श्री.नरेंद्र ठाकुर, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता व उप-अभियंता यांनी सिंधुभवनची पाहणी केली असता सिंधुभवनच्या दुस-या मजल्यावर मीनी थिएटर बनविणेच्या सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे महापालिकेच्या पॅलनवरील स्थापत्य सल्लागार मे.नोबल जिओ स्ट्रक्ट यांचेमार्फत सदर सिंधूभवन विकसित करणेच्या कामाचे प्राकलन तयार करण्यात आले आहे. सदर प्राकलनात पहिल्या मजल्याचे आरसीसी बांधकाम, टाईल्स, कंपाउंड वॉल बनविणे व दुसऱ्या मजल्यावर मिनी थिएटर, सिंधू भवनच्या आजूबाजूचा परिसर विकसित करणे, विद्युतीकरण करणे इत्यादी कामाचा समावेश आहे. सदर कामाची प्राकलनिय किंमत रुपये ३,९१,००,०००/- एवढी होत आहे. सदर कामाकरीता महापालिकेच्या वर्ष २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रु.४.०० कोटी एवढी तरतूद करण्यात आली आहे. मा.आमदार श्रीमज्योती सुरेश (पप्पु) कालानी यांनी त्यांचे दिनांक १२/१०/२०१७ रोजीच्या पत्रान्वये रुपये ५०.०० लक्ष मिळणेस मा.जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडे विनंती केली आहे.

मा.आमदार महोदया, स्थानिक नगरसेविका यांनी त्यांचे संदर्भिय पत्रान्वये विनंती केल्यानुसार तसेच सदर कामाकरीता मा.महासभा ठराव क्र.२७ दिनांक १९/०७/२०१७ अन्वये मान्यता मिळाली आहे.

तरी सिंधुभवन येथे दोन मजले बनविणे व आजुबाजूचा परिसर विकसित करणेच्या कामाच्या प्राकलनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळावी तसेच सिंधुभवनचे (तळमजल्याचे) बांधकाम करणेकरीता यापूर्वी निविदा प्रक्रिया करण्यात आली आहे. सदर निविदा प्रक्रियेत निम्न दराचे मे.सतिश कंन्स्ट्रक्शन यांचेतर्फे सद्यस्थितीत काम सुरु आहे. तथापी, पहिल्या मजल्याचे कामाचे तयार केलेल्या प्राकलनानुसार पुन्हा निविदा प्रक्रिया केल्यास स्पर्धात्मक प्रतिसाद, प्राकलनिय किंमतीपेक्षा जास्त दराची निविदा प्राप्त होणे अशा विविध कारणांमुळे निविदेस मुदतवाढ देणे यामुळे वेळेचा अपव्यय होईल.

त्यामुळे सदर कामाकरीता प्रथम केलेल्या निविदा प्रक्रियेत निम्न दराचे निविदाकार मे.सतिश कंन्स्ट्रक्शन यांचेकडून सिंधुभवन येथे दोन मजले बनविणे व आजूबाजूचा परिसर विकसित करणे रुपये ३,९१,००,०००/- एवढया प्राकलनिय किंमतीचे काम पूर्वीच्या अटी व शर्तीवर करुन घेणेस प्रस्तावित करण्यात आले होते.

तथापी, मा.आयुक्त सो. यांनी उर्वरीत कामाकरीता स्वतंत्र निविदा प्रक्रिया करणेबाबत सदर संचिकेवर शेरा लिहिला आहे.

तरी सिंधुभवन येथे दोन मजले बनविणे व आजूबाजूचा परिसर विकसित करणेच्या कामाची निविदा प्रक्रिया करणेस मान्यता मिळणेस मा.स्थायी समितीच्या पटलावर प्रस्तावित.

<u>स्थायी समिती ठराव क्र.</u> ६० <u>दिनांकः— २४/११/२०१७</u>

सुचकाचे नाव :— श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :— श्री. राजेश वदारिया

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर—३ येथिल सपना उदयान येथिल सिंधुभवन येथे दोन मजले बनविणेस व आजुबाजूचा परिसर विकसित करणेकरीता प्रशासकिय व वित्तीय तसेच त्वरीत निविदा प्रक्रिया करणेस मान्यता देत आहे.

या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची <u>सही/—</u>

अनुमोदकाची <u>सही/—</u>

<u>सर्वानुमते</u>

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—</u>सभा संपली, आभारी आहे.

दुपारी १२.५० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका

# उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर

दिनांकः—८/१२/२०१७

दि. ८/१२/२०१७ रोजी घेण्यांत आलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.

(१४)

उल्हासनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ८/१२/२०१७ रोजी सायंकाळी ४.०० वाजता महापालिका प्रशासकीय भवनाच्या पहिल्या मजल्यावरील स्थायी समिती सभागृहात घेण्यांत आली. सदर सभेत खाली दर्शविलेले सदस्य / सदस्या उपस्थित होते /होत्या.

| अ.क्र. | नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती कांचन अमर लुंड | सभापती |
| २ | श्री. जमनादास खुबचंद पुरस्वानी | सदस्य |
| ३ | श्री. राजेश नानिकराम वदारिया | सदस्य |
| ४ | श्रीमती लक्ष्मी सुरेंद्र सिंग | सदस्या |
| ५ | श्रीमती चंद्रावती आयोध्याप्रसाद सिंग | सदस्या |
| ६ | श्री. कलवंतसिंग गुरुदेव सोहटा | सदस्या |
| ७ | श्रीमती पुष्पा नाना बागुल | सदस्या |
| ८ | श्री. राजेंद्र शांतराम चौधरी | सदस्य |
| ९ | श्री. सुनिल मुकुंद सुर्वे | सदस्य |
| १० | श्री. धनंजय बोडारे | सदस्य |
| ११ | श्री. दिपक लक्ष्मणदास सिरवानी | सदस्य |
| १२ | श्रीमती कविता लाल पंजाबी | सदस्या |

तर,

खालील दर्शविलेले सदस्य / सदस्या अनुपस्थित होते/होत्या.

१.श्रीमती जया प्रकाश माखिजा, २.श्रीमती डिंपल नरेंद्रकुमार ठाकुर, ३.श्रीमती पंचम उमेश कालानी, ४.श्री. भारत रामचंद्र राजवानी

खालील अधिकारी सभेस हजर होते.

१६. श्री. राजेंद्र निंबाळकर, आयुक्त
१७. श्रीमती विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त
१८. श्रीमती प्राजक्ता कुलकर्णी, प्र. महापालिका सचिव
१९. श्री. संतोष देहेरकर, उप—आयुक्त, मुख्यालय
२०. श्री. राम जैसवार, शहर अभियंता

२१.श्री. विनायक फासे, सहा. उप लेखा परिक्षक
२२.श्री. संतोष जाधव, सहा. लेखा परिक्षक
२३.श्री. अशोक जाधव, लेखा परिक्षक
२४.श्री. महेश सितलानी, उप अभियंता, साबांवि
२५.श्री. महेंद्र दिंडे, उप अभियंता, विद्युत
२६.डॉ. राजा रिजवानी, प्र. वैद्यकीय आरोग्य अधिकारी
२७.श्री. अश्विनी अहुजा, कनिष्ठ अभियंता
२८.श्री. जितु चोईथानी, कनिष्ठ अभियंता
२९.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
३०.श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक
३१.श्री. विशाखा सावंत, प्र. मालमत्ता व्यवस्थापक
३२.श्री. अजित गोवारी, प्र. सहा. आयुक्त
३३.श्री. गणेश शिंपी, प्र. सहा. आयुक्त
३४.श्री. मनिष हिवरे, प्र. सहा. आयुक्त
३५.श्रीमती श्रध्दा सपकाळे, प्रोग्रामर

तसेच खालील कर्मचारी सभेस उपस्थित होते.
१. श्रीमती मनिषा महाजन
२. श्रीमती नर्गिस खान
३. श्री. बाळु भांगरे

सांयकाळी ४.२० वाजता सभेचे कामकाज सुरू करण्यांत आले.

<u>महापालिका सचिव :–</u> विषय क्रमांक. १ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. १** :–स्वच्छ महाराष्ट्र अभियान व घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण करणेकरिता लोखंडी स्टॅन्डसह १०० लिटरचे दोन डब्बे पुरविणे व शहरात विविध ठिकाणी बसविणे बाबत न्युनतम दर सादर करणारे मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर यांना कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे सदरचा प्रस्ताव माहितीस्तव सादर.

---

<u>**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**</u>काय आहे? निविदा झाली आहे काय? त्याची माहिती दयावी.

<u>**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**</u>हा विषय माहितीसाठी आला आहे.

<u>**श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक:–**</u>मा. सभापती, स्वच्छ महाराष्ट्र अभियान व स्वच्छ सर्वेक्षण २०१८ अंतर्गत शासनाच्या काही गाईडलाईन्स आहे. त्या अंतर्गत आपणांस शहरात विविध ठिकाणी दोन डस्टबीन, सुका व ओला कचरा ठेवण्यासाठी कर्मशिअल एरिया व सार्वजनिक ठिकाणी बसवायची आहेत. त्यासाठी महापालिकेने एक सर्व्हे करुन ३०० जागा निश्चित केल्या त्या अनुषंगाने निविदा मागविण्यात आल्या होत्या निविदेअंती न्युनत्तम दर सादर करणारे एसएसव्ही संस्था यांचे दर वाटाघाटी अंती ७ हजार ५०० मान्य करण्यात आलेले आहे आणि त्या अनुषंगाने त्यांना कार्यादेश देवुन कारवाई सुरु आहे.

<u>**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**</u>ही निविदा कधीची आहे?

<u>**श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक:–**</u>ही निविदा ऑक्टोंबर २०१७ ची आहे.

<u>**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**</u>किती निविदा आहेत?

<u>**श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक:–**</u>३ निविदा आहेत. मानव विकास सामाजिक सेवा संस्था, एस.एस.व्ही. संस्था आणि आदर्श आदवासी विकास.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**आदर्शचे कोठे लिहिले आहे यामध्ये? दोनच आहे ना मानव विकास व एसएसव्ही, आदर्शचे कोठे लिहिले आहे?

**श्री. विनोद केणे, प्र. स्वच्छता निरिक्षक:–**गोषवा–यात आहे ना.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**आपण निविदा मागविल्यात ज्यास मान्यता दिली, त्या आपण माहितीसाठी स्थायी समितीत घेवुन आले आहात. जेव्हा ३ निविदा काढल्या तेव्हा आपण स्थायी समितीत घेवुन आला नाहीत.आपण कोणताही विषय स्थायी समितीत आपल्या मर्जीने आणता. आणि कोणताही विषय २४ लाखाचा आपल्या अधिकारात माहितीसाठी स्थायी समितीत सादर करता. मला हे सांगा की उल्हासनगरचा ओला व सुका कचरा उचलुन टाकण्याची काही सोय आहे का? हे ठिक आहे चांगला विषय आहे की ओला कचरा व सुका कचरा उलण्याचे मिशन आपण चालु करत आहात. लोक आपल्या घरी ओला वेगळा व सुका वेगळा कचरा गोळा करतील, पण उचलतील कशात वेगवेगळी व्यवस्था आहे काय? उचलण्यासाठी आपण वेगवेगळी व्यवस्था करणार पण तो कचरा काय एकाच जागी टाकणार? लोकांना आपण काय शिकवत आहात की आपण वेगवेगळे गोळा करा व आम्ही एकाच जागी टाकणार? एकतर आपण ओला व सुका कचरा वेगवेगळा ठेवण्यासाठी काही व्यवस्था ठेवलेली नाही. लोकांना आपण समजाविले पाहिजे त्यांना ओला व सुका कचरा वेगवेगळा ठेवण्यासाठी सांगितले पाहिजे व आपण सुध्दा कचरा वेगवेगळा टाकला पाहिजे. सुका कचरा व ओल्या कच–याची विल्हेवाट कशाप्रकारे झाली पाहिजे हे पाहिले पाहिजे. परंतु तशी सोय आपणाकडे नाही. सुका व ओला कचरा उचलण्यासाठी सोय असली पाहिजे, त्याची विल्हेवाट लागली पाहिजे. आपण निविदा मागविली व मान्यताही दिली, एवढी घाई आहे. मशिन लावली त्यात सुका कचरा व ओला कचरा टाकायचा आहे. त्याने लगेच शहरातील कचरा संपृष्टात येईल. अशा अशी परिस्थिती आहे याबाबत मी कालच आपल्या एचओडी ग्रुपवर टाकले होते. आपल्या आदरणीच महापौर महोदया, व आपण सांगत आहात आपल्या देशाचे पंतप्रधान हे भारतीय जनता पक्षाचे आहेत, मुख्यमंत्री हे भाजपाचे आहेत, आपल्या उल्हासनगर शहराच्या महापौर भाजपाच्या आहेत. आपल्या महापौरांच्या प्रभागात एवढा कचरा होता की एसआयला फोन केला तर फोन उचलत नाहीत करायचे काय? आपणाकडे एसआय नाहीत काय त्यांना कच–याचा ढीग दिसत नाही काय, एवढा शहरात कचरा जमा होत असतो. मुकादम नाहीत काय, त्यांना कचरा दिसत नाही काय? आज तेथे तीन ट्रक कचरा जमा झालेला आहे. माझ्याकडे लोक आलेत आणि म्हणालेत की महापौरांच्या प्रभागासारखी येथे परिस्थिती निर्माण झाली आहे. जर उल्हासनगरचा एखादा नर्क सारखा एरिया असेल तर, नरक कसा असतो हे आम्ही पाहु नाही शकत.

यावेळी सदस्या श्रीमती कविता पंजाबी यांनी सभागृहात प्रवेश केला.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**शेम, शेम, ही गोष्ट आम्ही विरोधी पक्षांनी सांगितले पाहिजे, आपण सांगत आहात.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**असे काही नाही सत्ताधारी व विरोधी. आम्ही शहराच्या हितासाठी बसलो आहोत जेथे आम्हांला चुकीचे दिसेल त्याचा आम्ही विरोध करणार, आम्ही त्याचा विरोध नाही केला तर परत कचरा वाढत जाईल. आम्ही एकीकडे झाडु हातात उचलत आहेत, श्री. नरेंद्र मोदी म्हणालेत की झाडु मारा. पंधरा दिवस झालेत आपण कचरा उचलत नाही. मी एक घर दाखवितो मी त्याचा फोटो घेतला आहे. एक घर आहे, तेथिल व्यक्ती हरीद्वार फिरायला गेला आहे दहा दिवसापासुन. त्या घराला कुलुप आहे. त्याच्या घरासमोरच कचरा जमा केला या लोकांनी, तो व्यक्ती आज येणार आहे. कोणी त्यास सांगितले की तुझ्या घरासमोर कच–याचा ढिग लागला आहे, तर मी तो फोटो पाठविला तेव्हा कचरा उचलला गेला नाहीतर त्यास घरात यायला जागाच नव्हती. संपुर्ण गार्डन, प्रभाग कच–याने भरले होते. आज जेसीबी मशिन आले आहे. परंतु खत्त्याविना? ही लाजीरवानी बाब आहे की जेथे कच–याचा खत्ता असेल तेथे जेसीबी आली पाहिजे ना? मला एवढा राग आला ना, तेथे संपुर्ण गार्डन, प्रभाग कच–याचा ढिगाने ग्रासला होता. नाली भरलेली, कचरा जमलेला, संपुर्ण ठिकाणी घाण होती, आज ओरडल्यानंतर तेथे जेसीबी व डंम्पर आले, कचरा उचलण्यासाठी.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**कचरा उचलणारा ठेकेदार आहे, त्यास आपण काहीच बोलत नाही.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**कचरा उचलत नाही, आपण सांगा काय परिस्थिती होती तेथे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:–**ही गोष्ट खरी आहे काय?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः—</u>तेथे डेब्रिज होते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>डेब्रिज नाही, तेथे कच—याचा ढिग होता.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>त्याठिकाणी डेब्रिज पडलेला होता. तेथिल एसआयला नोटिस दिली होती. तो डेब्रिज त्या व्यक्तीच्या गेटसमोर होता. तेथिल मुकादमाला व एसआयला नोटिस बजावली होती.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>माझ्याकडे फोटो आहे, तेथे डेब्रिज नव्हते, कच—याचा ढिग होता. मी एचओडी ग्रुपवर फोटो पाठविला आहे, आपण झुम करुन पहा की तेथे डेब्रिज आहे का? तेथे गार्डनमध्ये सुध्दा कचरा होता, गेटसमोर कचरा होता, सर्व जागी कचरा होता.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u>कचरा काय एक दिवसात तर नाही जमा झाला ना?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>साहेब तेथे डेब्रिज पडला असेल आणि त्यावर....

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u> डेब्रिज विषय वेगळा. कचरा तेथे का जमा झाला एवढे दिवस?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>डेब्रिजवरच कचरा टाकत असतात साहेब.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आयुक्त महोदय, एका गोष्टीची नोंद करा, आज तेथे कचरा साफ केला आहे ना, तर उदया पहा, आपण आपल्या एसआय व मुकादमास मना करा व सांगा की दहा दिवस झाडु लावु नका. आम्ही चॅलेंज करतो की जर एवढा कचरा जर जमा झाला ना दहा दिवसात तर मी स्थायी समिती सदस्याचे पद सोडुन टाकेल. आपण त्यांना मना करा,दहा दिवस झाडु लावु नका तेवढया विभागात आणि पहा तेवढा कचरा होतो का जेवढा होता. तेथे ना झाडु लावणार आला आणि ना कचरा उचलणारा आला, ना कोणी सफाई करणारा आला, जर आला सुध्दा असेल तर फक्त वर वर झाडु लावुन एका बाजुला कचरा लावला. ही लाजीरवानी बाब आहे. आपण आज साफसफाई केली ना?

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>होय आज सफाई केली.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानीः—</u>मग आपण असे का म्हणता एक दिवसाचा कचरा नव्हता, दहा दिवसाचा कचरा होता. आपण त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>त्याने जे स्पष्टीकरण दिले ते मी सांगत आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>तर मग आपण त्यांना बोलवा, त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—</u>तुमची सुध्दा जबाबदारी आहे ना पाहण्याची.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>साहेब, त्याने मला सांगितले की डेब्रिज असल्यामुळे त्याने उचलले नव्हते.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आपण फक्त तेथे १० दिवस झाडु लावु नका, व ही बाब गुपित ठेवा, आणि पहा की दहा दिवसात तेथे किती कचरा जमा होतो. फोटोग्राफमध्ये जेवढा कचरा आहे तर तेथे तेवढा कचरा जर जमा झाला तेव्हा आपण काय कराल?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबळकरः—</u>हे मी मान्य करतो. तो कोण एसआय आहे त्याला आता येथे बोलवा.

<u>श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—</u>होय बोलवितो साहेब.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>काल मी साहेब, तेथिल नगरसेवकास बोलाविले. श्री. सोनु छाप्रु, श्री. कुमार आयलानी यांना बोलाविले त्यांच्या पत्नी महापौर या तेथिल नगरसेविका आहेत. यांना सांगितले तर ते म्हणतात माझा तुकडा नाही, आणि दुस—यास सांगितले तर ते म्हणतात माझा तुकडा नाही. मी म्हटले आपण हे पंधरा दिवसापासुन पाहत आहात, आपण नगरसेवक असतांना आयुक्त महोदयांना एचओडीमध्ये का नाही टाकले?श्री. केणे यास का नाही

सांगितले? लोक आमच्याकडे सभागृहनेता कार्यालयात आले तेव्हा जावुन कचरा उचलण्यात आला. मी म्हटले किती दिवस सफाई नाही केली तर सांगतात की २० दिवस झाले कोणी सफाईसाठी येतच नाहीत. आणि तेथे पाप्युलेशन किती आहे, सराउंडिंग मोठा एरिया आहे, तेथे नामामल गार्डनचे आहे श्री. भुल्लर महाराज यांनी नाव दिले, गोल मैदान येथिल मुख्य मंदिराचा एरिया आहे आणि तेथे एवढा कचरा आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—त्यांना आपण आमनेसामनेच विचारु या. त्यांना बरोबर करु या.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—गोल मैदान येथिल मंदिराचा एरिया आहे का? काय आहे नगरसेवकांनी तक्रारी दिल्या तरी काम होत नाही. अंडरग्राउंड ड्रेनेजचे सुध्दा तसेच आहे. कामच होत नाही. तसेच प्रायव्हेट ठेकेदार दिले आहेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—श्री. केणे,आपण लक्ष दिले पाहिजे ना, आपली जबाबदारी आहे ना?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक:—होय साहेब.

सदस्यश्री. धनंजय बोडारे :—एवढी सिस्टम आहे, प्रभाग अधिकारी आहेत, आरोग्य विभाग आहे. तरी लक्ष देत नाहीत.

सदस्या श्रीमती कविता पंजाबी :—होय साहेब, आणि सांगुन सुध्दा लवकर कचरा उचलला जात नाही. साफसफाई होत नाही, कोणी लक्ष देत नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—श्री. केणे हे काय आहे? तुमचे लक्ष नसते काय?तुम्ही व्हिजीट करीत नाहीत काय? व्हॉट हीज दिस?

श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षक :—साहेब, माझी व्हिजीट असते. तेथिल मुकादमास नोटिस दिली आहे, त्या मुकादमाची बदली केली आहे.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—प्रभाग अधिकारी काय करत असतात? साफसफाई का होत नाही? कोण करणार? आम्ही नाही करणार? जनता येवुन नाही करणार.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—आपण जे प्रस्ताव आणत असतात ते २५ लाखापेक्षा कमी आणता कामा नये.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—साफसफाईसाठी तुम्ही हा जो प्रस्ताव आणला आहे तो माहितीसाठी आहे. जर आपल्या स्तरावर होत असेल तर करावे ना स्थायी समितीपुढे आणण्याची काय आवश्यकता आहे?

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:—सर्वात कमीअसेल तर आपणांस अधिकार आहे आपण करुन घ्या, आणि येथे फक्त माहितीसाठी सादर करा ना.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—हा माहितीसाठीच आणला आहे ना.

सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—कधी कधी तुम्ही १० लाखाचे, कधी १५ लाखाचे सुध्दा पाठवित असतात ना. जास्त असेल तर आपण येथे आणा.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—नाही, नाही असे नाही होवु शकत.

सदस्य श्री. कलवंतसिंह सहोता:—किती लाखाचे आहे?

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—२२ लाखाचे आहे. तुम्ही यादी दया काही अडचण नाही. आता काम सुरु केले आहे का त्या ठेकेदाराने? यादी दया थोडे थांबायला सांगा, जर काही विषय असेल तर सांगा. सर्व पदाधिका—यांना यादी दया.

सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :—या कामासाठी एवढा खर्च येवु शकतो हे आपण कशावरुन ठरविले ते सुध्दा आपण सांगा. यात २२ लाखच खर्च करु शकतो हे आपण कसे सांगु शकतात ते सांगा.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—आम्ही त्याचे निगोशिएशन करुन निविदा काढली आहे ना. निविदेत जी व्हल्यु आली निगोशिएशनच्या हिशोबाने त्यानुसार केले.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**आमच्या येथे बसवायची गरज होती तर मग तेथे का नाही बसविले?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः–**अजुन काम सुरु केलेले नाही. तुम्ही यादी पहा, एक आठ दिवसात तुमची काही सूचना असेल या ठिकाणी नाही याठिकाणी तर सांगा. तुम्ही चारही प्रभागातील धरले आहे ना. म्हणजे बाजारपेठ असे काही.

**श्री. विनोद केणे,प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः–**होय साहेब.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः–**आम्ही बाजारपेठ समोर ठेवुन केले आहे.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**ते ठिक आहे. माझी एकच गोष्ट होती की २५ लाखापर्यंत आपला अधिकार सुध्दा आहे. आपण तसे सादर करा. सर्व विषयांबाबत करा. आमची काही हरकत नाही. दुसरे म्हणजे आपण अशा वस्तु मागवितो की त्याचा वापर बिल्कुल होत नाही. मागील वेळी आपण शिलाई मशिन मागविण्यात आल्या होत्या तसेच कुंडया मागविल्या होत्या, ओला कचरा व सुका कचरा वेगळा करण्यासाठी आपण कुंडया मागविल्या होत्या. ते ५००० अशा काही मागविल्या होत्या, त्या दलित वस्ती निधीतुन होता की कशातुन होता?

**श्री. विनोद केणे, प्र. मुख्य स्वच्छता निरिक्षकः–**महिला बालकल्याण समितीतुन.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**होय महिला बालकल्याण समितीतुन दलित वस्तीत देण्यासाठी होता. त्याचा अहवाल सुध्दा आला नाही आजपर्यंत कोणास वाटले ते. त्यास ८ महिने झाले मान्यता देवुन. त्या कुंडया कोठे ठेवल्या आहेत, कोठे गेल्या आहेत, अजुन कोणास वापरण्यास दिल्या नाहीत. तसेच शिलाई मशिन व एम्ब्रॉडरी मशिन त्या मशिन आणुन दिड वर्ष झाला आहे. तसेच एक आश्चर्यकारक बाब मी सांगतो की स्थायी समितीमध्ये आम्ही मान्यता दिली होती की, जे मुले जन्माला येतील, ज्या गरीब महिला आहेत, ते गरीब मुले जन्माला येतात, त्यांना आम्ही एक किट देणार, खायला सामान देणार, बरेचश्या वस्तु देणार असे ब–याच गोष्टी झाल्या होत्या. परंतु सरकारी हॉस्पीटलमध्ये एक वर्षापासुन असे काही दिल्याच्या नोंदी दिसुन येत नाही. आले कोठुन व गेले कोठे, काय ते ड्रायफ्रुटचे पॉकिट ठेवुन ठेवुन सडले.? आपला भांडार मध्ये तर पहा, असे तर नाही वर्षभर ठेवलेला आपण त्यांना माल देणार? मला यादी पाहिजे की एक वर्षात किती मुलांनी जन्म दिला. त्यांचा पत्ता काय आहे, त्यांना किती किट पोहोचविले? त्यांना ड्रायफ्रुटचे पॉकिट किती पोहोचविले? काय आपले लाखो रुपये भांडार विभागातच सडले? हे आपण एक वर्षापुर्वी केले आहे? तसेच ती वस्तु आणली आहे की नाही आणली आहे? आम्ही येथे ट्रस्टी बनुन आम्ही पास करत असतो. आता आम्ही हे पास करतो, जसे हे ३०० जागा आहेत तर जर याची यादी असेल तर आम्ही पास करतो. सरकारी दवाखान्यात आपण किती औषधी दिल्या ते आता जरा सांगा.

**डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्तः–** मा. सभापती महोदय, मा. आयुक्त महोदय, सर्व सन्माननिय सदस्य, आता जे तीन प्रश्न उपस्थित केले त्यात शिलाई मशिनबाबत आपणांस सांगण्यात येते की, ५१० शिलाई मशिनची यादी सदस्यांस वाटप करण्यात आले. तुमच्याकडुन मान्यता मिळाल्यानंतर आम्ही नंतर पुढील कार्यवाही करु. २८/११/२०१७ रोजी आपणांस माझ्या सहीने यादी दिलेली आहे. दुसरा प्रश्न कचरा कुंडयाबाबत सांगते, आम्ही तत्कालीन श्री. लेंगरेकर साहेब असतांना १६–२७ च्या आर्थिक वर्षात ५००० कचरा कुंडया मागविल्या होत्या. त्या दोन म्हणजेच हिरव्या व निळया अशा एकुण १० हजार कचरा कुंडया मागविल्या होत्या.त्यात २००लिटरच्या होत्या ५ हजार होत्या आणि बाकी होत्या त्या १०० लिटरच्या अशा एकुण १० हजार कचरा कुंडया मागविण्यात आल्या. तसेच या आर्थिक वर्षात सुध्दा कचरा कुंडया मागविण्याचे म्हटले तर रिपीटेशन होवु नये म्हणुन मा. आयुक्तांशी चर्चा करुन आरोग्य विभागास हे काम दिले. त्यांनी ज्या कचरा कुंडया आणल्या त्या डबल अशा कोठेच वाटप झालेल्या नाहीत. आरोग्य विभागाकडुन जे देण्यात येणार आहे त्यात कोठेच रिपीटेशन होणार नाही. जेवढया मालमत्ता आहेत आपणाकडे तेवढे गुणीले असे करुन आपण आरोग्य विभागाकडुन मागविल्या आहेत. तसेच तिसरा जो प्रश्न, मुद्दा आहे ते सुध्दा तत्कालीन आयुक्तांच्यावेळी झालेले आहे. जरी महिला बालकल्याण माझ्याकडे नव्हते तरी देखील त्यावेळी मागविलेले आहे. ते अदयाप आलेले नाही, आणि जी त्याची अंमलबजावणी व्हायची होती ती वैदयकीय आरोग्य अधिका–यांनी करावी. महिला बालकल्याण समितीच्या सभेतच ठरले होते ते मान्य करत नव्हते परंतु त्यावेळी ठरविले कारण कुठल्याही योजनेअंतर्गत लाभार्थी निवडणूक येथे सर्व अडचणीचा मुद्दा येतो. आणि फक्त २५६ च किट मागविले होते साहेब.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>ड्रायफुटचे काय झाले ?

<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>नाही ड्रायफुटचे नाही हे फक्त ब्लॅकेट, सॅडल वगैरे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>निष्कर्ष हा निघतो की आम्ही जेवढे काही मागविले ते काहीच वाटले नाही. शिलाई मशिनला दोन वर्ष झाले २०१५—१६, २०१६—१७ तर आम्ही एक सुध्दा वाटली नाही.

<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>आतापर्यंत मान्यता मिळाली नाही तर कसे करावे? यादी आपणांस दिली आहे.

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी:—</u>यापुर्वी आमच्याकडे यादी दयायचे त्यामुळे माहित पडत असायचे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>पुर्वी काय व्हायचे की एक एक नगरसेवक ५ ची यादी दयायचा, आपण तपासून पाच पाचला देत होते. आज आपण यादी मागवा ते करा याने एक वर्ष गमावला. आता ही जी शिलाई मशिन आहे ना, ते देण्यासाठी आपणांस आता निविदा मागवावी लागेल.

<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>जे आपण दिले होते ते जाहिरातीने आल्या आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>कचरा कुंड आपण १० हजार मागविले. ते गरीब वस्ती, दलित वस्ती जे गरीब लोक आहेत ते कचरा कुंडी विकत घेवु शकत नाहीत त्यांच्यासाठी आहे. आम्ही म्हटले ६ कोटीचे कुंडी आपण मागवु ज्यावेळी ते पारीत केले, तर ते वाटायचे आहे.  आपण १०० लोक आहात तर निदान १० तर वाटा. ९० चे स्वप्न नव्हते की ९० घेणार.

<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>स्वप्नाचा प्रश्न नाही, मी १० चे पुर्ण करुन घेतले.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मला हे सांगा की १०० कुंडी घेण्याचे स्वप्न होते का आपले?

<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>आपण असे लहान भाषेत बोलु नका. प्रशासकिय बाब समजुन घ्या आपण पुर्णपणे. जेव्हा बाब आली, वर्क ऑर्डर दिल्या गेल्या, पुरवठा झाला..

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>चार महिन्यापेक्षा जास्त झाले आहे.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>पहिली गोष्ट तुम्ही लक्षात घ्या जो तिसरा विषय आहे तो बाळंतस्त्रीयांचा आहे. हा जुना नाही, तो वाटप नाही झाला.खारीक वगैरे असे काही तरी आहे.

<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>असे काही नाही. श्री. लेंगरेकर साहेबांच्या वेळेची ती १५—१६ ची गोष्ट होती.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>दोन वर्षात मुलांना देण्याचे किट आणि ड्रायफुटचे किती बिल निघाले आहेत, दोन वर्षात वाटले किती? पैश्याची परवानगी आहे का की पैश्यांचा व्यय झाला?

<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>१५—१६ ची माहिती घेवुन मी आता सभागृहाला सांगते. आपण जो विषय सांगता तो १४—१५ चा आहे साहेब.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>बाकीच्या गोष्टी आपण ठेवु शकता परंतु खाण्यापिण्याचे वस्तु अशाच ठेवल्या तर खराब होतील ना.

<u>डॉ. विजया कंठे, अतिरिक्त आयुक्त:—</u>ते डिस्पॉजल केले साहेब.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>तपासणीकेल्याविना ती गोष्ट प्रस्ताव खरेदी करण्याचा प्रस्ताव करतात.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>साहेब, असे नव्हते, शासकीय दवाखान्यात जसे जसे मुले जन्माला येतील तसेच तो ठेकेदार तितकेच आणुन देणार.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>व्हीटीसी ग्राउंड येथे जे अपंग लोक आहेत त्यांचे सुध्दा खुर्च्या अशाच पडुन आहेत. आम्हांला हे सुध्दा माहित नाही की किती लोक आहेत, किती अपंग आहेत त्याची यादी नाही मागविली. आणि फक्त खरेदी केली. शिलाई मशिनचे सुध्दा असेच आहे.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आमची हरकत नाही की वस्तु मागवु नका परंतु ज्या वस्तु मागवितात त्याचा योग्य प्रकारे वापर झाला पाहिजे. आणखी कोणता आरोप नाही.

<u>सदस्य श्री. राजेश वदारिया :—</u>अपंग व्यक्तींसाठी फॉर्म भरण्यांत आले होते, परंतु आजपर्यंत त्यांना एकसुध्दा वस्तु मिळाल्या नाही आहेत.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मागील वेळेस म्हटले होते की यादी पाहिजे आम्हांला की भांडार विभागात काय काय आहे ते.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>प्रशासनाकडे जी यादी आहे, आमच्याकडे जी लोक आहे त्या यादीत ती लोक नाहीत. प्रत्यक्षात जेव्हा वाटप करायला घेतले तेव्हा त्यांचे यादीत नावच नाही. प्रभागात लाभार्थी आहेत परंतु त्याचा सर्व्हेच बरोबर झाला नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>एक मिनिट, आपण एक निर्णय घेवु.

<u>सदस्य श्री. धनंजय बोडारे :—</u>तसेच काय झाले तर विधवा आहेत, यात ५ मध्ये काही वार्ड होणार नाही. ५ चौक २० म्हणजे ज्या विधवा आहेत किंवा लाभार्थी आहेत जास्त असतात त्यामुळे नगरसेवक आपल्या याच्यातुन देतात. आता काय झाले आहे जे मागील वर्षी लोकांना दिले होते त्याच लोकांची यादी या वर्षीच्या यादीत आहेत. नगरसेवक जे आहेत ते ५—५ किंवा १०—१० जसे आहे तसे देतात त्यामुळे लोक प्रशासनास नाही तर नगरसेवकांना विचारतात.आता काय झाले आहे डबल नावे असल्यामुळे ज्यांना मिळायला पाहिजे त्यांना मिळत नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>म्हणुन ही प्रोसेस निविदा मागविण्याच्या आधीच आपणाकडे असली पाहिजे. लाभार्थी कसे निवडायचे त्याचे निकर्ष काय असले पाहिजे. भलेही नगरसेवकांकडुन गेले तरी काही हरकत नाही परंतु ती प्रोसेस आधीच ठरली पाहिजे. प्रत्येक नगरसेवकांकडुन पाच पाच नावे घ्या, त्यांना दया, भले ते पाच पाच मशिन सुध्दा त्यांच्या ताब्यात दया. त्यांच्याकडुन कंम्पालाईज रिपोर्ट घ्या.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>असेच होत असायचे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>परंतु माझा जो अनुभव आहे, मटेरियल कॉल करतात मग नंतर विचार करतात की याचे काय करायचे आहे. दिस इज नॉट करेक्ट. आता आपण काय करु जे काही शिल्लक मटेरियल आहे, श्री. देहेरकर व श्रीमती कंठे महोदया तुम्ही आढावा घ्या. अपंगाच्या सायकली ज्या आहेत त्या सडुन जातील, त्याचा आठ दिवसात लवकर निपटारा करा आणि त्यामध्ये एक प्रस्ताव आणा. मान्यता घ्या व विषय संपवुन टाका.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>आम्हांला यादी पाहिजे ना, किती सामान पडुन आहे.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरी:—</u>शिलाई मशिनची यादी आहे का?

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>नाही शिलाई मशिन नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—</u>तुमच्याकडे अप्रुव्हल आहे ना ते देवुन टाका. विषयच संपेल.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>मला फक्त एक सांगावे, जो सामान आहे त्याची यादी दया ना आम्हांस.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>साहेब, त्याच्यामध्ये चुक काय झाली आहे, तत्कालीन आयुकतांनी त्यावेळी स्थायी समितीसमोर न आणता, दया वर्तमानपत्रात जाहिरात दया, मग मागवा, त्यामुळे ते अडकुन पडले.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**खरी तर तशीच प्रोसेस करायला पाहिजे. आपण जाहिरात देवुन त्यामध्ये कोण लाभार्थी आहेत ते ठरवावे, त्याची उत्पन्न मर्यादा ठरवीली पाहिजे. त्यास उत्पन्नाचा कोणता मार्ग नको, घरात कोणी कमविते नसले पाहिजे.अशी क्रायटेरीया ठरवा ना. हे काम प्रस्ताव आणण्यासोबत असायला पाहिजे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**साहेब, प्रस्ताव प्रशासनाकडुन आला होता तो तुम्ही पहा. त्यात असा कुठलाही उल्लेख नाही.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**ठिक आहे, आता यादी दया. आता आमच्याकडे फक्त शिलाई मशिन पडुन आहेत.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**साहेब, आता सर्व स्थायी समिती सदस्यांस सर्व यादी दया. भांडार विभागात काय काय सामान पडुन आहे, किती शिलाई मशिन पडुन आहेत.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**स्थायी समिती सदस्यांना किती दिवसात मिळेल ते सांगा. यादी किती दिवसात दयाल ते सांगा. जे शिलाई मशिन झाले, कुंडया झाल्यात.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–**हा विषय माहितीसाठी सादर आहे. परंतु आम्हांला ३०० ठिकाणचा पत्ता पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**तो देवुन टाकु.

**सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी:–**त्याचबरोबर भांडार विभागात जो माल पडुन आहे त्याची यादी पुढील सभेत दिली पाहिजे.

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :–**होय.

**महापालिका सचिव:–**माहितीसाठीचा आहे. पास?

**काही सदस्य :–**पास–पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:–** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. १** :–स्वच्छ महाराष्ट्र अभियान व घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण करणेकरिता लोखंडी स्टॅन्डसह १०० लिटरचे दोन डब्बे पुरविणे व शहरात विविध ठिकाणी बसविणे बाबत न्युनतम दर सादर करणारे मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर यांना कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे सदरचा प्रस्ताव माहितीस्तव सादर.

**प्रस्तावना**

मा. आयुक्त सो. यांनी दिनांक १२/९/२०१७ रोजी अन्वये स्वच्छ महाराष्ट्र अभियान व घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण करणेकरिता लोखंडी स्टॅन्डसह १०० लिटरचे दोन डब्बे पुरविणे व शहरात विविध ठिकाणी बसविणे बाबतच्या खर्चास व ई–निविदा प्रसिध्द करण्याच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महापालिका वेबसाईटवर व दैनिक वृत्तपत्रात ई–निवदा सुचना प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आलेल्या होत्या. त्याअनुषंगाने ३ निविदाकारांनी विहित मुदतीत निविदा सादर केल्या होत्या. प्राप्त निविदा दि. १०/१०/२०१७ रोजी ई–निविदा कक्षात निविदा समिती सदस्य व निविदाकारांच्या उपस्थितीत संगणकाच्या माध्यमाने पहिला लिफाफा उघडण्यात आला. निविदा समितीने सर्व कागदपत्रांची पहाणी केली. प्राप्त तीन ही निविदाकारांनी निविदेतील नमुद अटी व शर्तीनुसार आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्याने निविदा समितीने वित्तीय लिफाफा उघडण्याबाबत सुचना केल्या त्यानुसार दिनांक १७/१०/२०१७ रोजी दुपारी ०४.०० वाजता निविदा समितीच्या मान्यतेन वित्तीय लिफाफा उघडण्यात आला. पात्र ३ निविदाकारांनी सादर केलेल दर खालीलप्रमाणे आहेत.

**तुलनात्मक तक्ता**

| Sr. No | Description | Quantity/Nos | M/S Manav vikas samajik seva sansta Rate per Unit (R.S.) | M/S SSV sanstha<br><br>Rate per Unit (R.S.) | M/S Adarsh Adivashi Vikas va shekshnik sanstha<br><br>Rate per Unit (R.S.) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | २ बिन्स स्टॅंडसह (Pole mounted litter containers/Twin bin with MS pole) पॉलिस्टर पावडर कोटेड फिनीश शहरात विविध ठिकाणी बसवण्यासहित(स्पेसिफीकेशन प्रमाणे १०० लिटरचे) | 300 Nos | 8350 | **8244** | 8265 |

पात्र निविदाकारांमध्ये तुलनात्मक तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे मे. एस. एस. संस्था यांनी सादर केलेले दर न्युनतम आहे. प्राप्त दरानूसार लोखंडी स्टॅन्डसह १०० लिटरचे दोन डब्बे पुरविणे व शहरात विविध ठिकाणी बसविणे बाबत खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| Sr. No | Description | Quantity/Nos | M/S SSV sanstha<br><br>Rate per Unit (R.S.) | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|
| 1 | २ स्टॅंडसह (Pole mounted litter containers/Twin bin with MS pole) पॉलिस्टर पावडर कोटेड फिनीश शहरात विविध ठिकाणी बसवण्यासहित(स्पेसिफीकेशन प्रमाणे १०० लिटरचे) | 300 Nos | 8244 | 24,73,200 |
| एकुण | | | | **24,73,200** |

प्राप्त दर रूपये २४,७३,२००/— (रूपये २४ लाख ७३ हजार दोनशे मात्र)अंदाजीत दरापेक्षा जास्त आहेत. त्यामुळे प्राप्त दर अंदाजीत बाजार भावाच्या दरापेक्षा जास्तीचे असल्याने निविदा समितीने दिलेल्या निर्देशानुसार न्युनतम दर सादर करणारे निविदाकार मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर यांना जा.क्र.उमपा/उप. आ/आवि/१८५/२०१७, दिनांक १७/१०/२०१७ अन्वये दिनांक २३/१०/२०१७ रोजी वाटाघाटीसाठी उप—आयुक्त (मुख्यालय/आरोग्य) यांच्या दालनात निविदा समितीच्या उपस्थितीत बोलावण्यात आले. मे. सिध्दान्त समाज विकास संस्था, उल्हासनगर यांनी वाटाघाटीअंती देखभाल/दुरूस्तीसह सादर केलेले प्रथम वाटाघाटीअंतीचे दर वाजवी वाटत नसल्याने पुनश्च दुसऱ्यांदा मा. आयुक्त सो., यांच्याकडे दिनांक ०१/११/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता संबंधीत निविदाकारास बोलविण्यात आले. सदर वाटाघाटीसाठी निविदा समिती सदस्य व न्युनतम दराचे निविदाकार उपस्थित होते. प्रथम वाटाघाटीअंती व दुसऱ्यांदा वाटाघाटीअंती प्राप्त दरांचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र | तपशिल | नग | निविदेत प्राप्त दर रूपये | प्रथम वाटाघाटीअंती प्राप्त दर रूपये | दुसऱ्यांदा वाटाघाटीअंती प्राप्त दर रूपये | अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ बिन्स स्टॅंडसह (Pole mounted litter containers/Twin bin with MS pole) पॉलिस्टर पावडर कोटेड फिनीश शहरात विविध ठिकाणी बसवण्यासहित(स्पेसिफीकेशन प्रमाणे १०० लिटरचे) | 300 नग | 8244 | 7830 | 7500 | 22,50,000 |
| **एकुण** | | | | | | 22,50,000 |

तरी वाटाघाटीअंती प्राप्त दरानुसार वार्षिक देखभालीसह एकूण ३०० ठिकाणी २ व्हील बिन्स, स्टॅंडसह शहरात विविध ठिकाणी बसविण्यासाठी येणाऱ्या रूपये २२,५०,०००/— (बावीस लाख पन्नास हजार मात्र) खर्चास व मे. एस.एस.व्ही. संस्था उल्हासनगर यांच्याशी संविदा करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे. एस. एस. व्ही. संस्था उल्हासनगर यांना जा.क्र.उमपा/उप—आ/आवि/२५३/१७, दिनांक १७/११/२०१७ अन्वये कामाचा कार्यादेश देण्यात आला आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा. स्थायी समितीच्या माहितीस्तवसविनय सादर.

स्थायी समिती ठराव क्र. ६१ — दिनांक:—८/१२/२०१७

सुचकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :—श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसारस्वच्छ महाराष्ट्र अभियान व घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ अंतर्गत घनकचरा विलगीकरण करणेकरिता लोखंडी स्टॅन्डसह १०० लिटरचे दोन डब्बे पुरविणे व शहरात विविध ठिकाणी बसविणे बाबत न्युनतम दर सादर करणारे मे. एस.एस.व्ही. संस्था, उल्हासनगर यांना कामाचा कार्यादेश देण्यात आल्याबाबतची माहिती नोंद करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी
स्थायी समिती सभा
उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. २ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. २** :–उल्हासनगर महानगरपालिका सन २००९–१०, २०१०–११, २०११–१२, २०१२–१३ या ०४ वर्षाचे अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल सादर करणे.

---

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**कायदयाने काय आहे, कायदयाने लेखा परिक्षण अहवाल त्यास काही कायदा असेल ना की दोन महिन्याने दया, सहा महिन्याने दया, दरवर्षी दया, वर्षाचा अहवाल दया. हा २००९ पासुन आता काही नविन सदस्य निवडून आले, आता २०१३ पर्यंतचा अहवाल आहे. तर मग नंतर १४–१५, १५–१६ चा अहवाल कधी मिळणार आहे. आता जे आक्षेप आलेले आहेत त्यावर आम्हांला वेळ सुध्दा पाहिजे ना, वाचायला.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :'–**मागील बॉडीचा अहवालास या बॉडीने मंजुरी दिली.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**कायदा १०५ प्रमाणे फार वेगळा म्हणतो. कायदा आम्ही पाळायचा की नाही? प्रशासनास जसे पाहिजे तसे वागते. असा आरोप वारंवार करावा लागतो यास कारण हे आहे.या कायदा १०५ मध्ये मुख्य लेखा परिक्षकाने लेख्याची छाननी करणे व स्थायी समितीने लेख्याची छाननी करणे. मी स्थायी समितीमध्ये एवढया वर्षापासुन होतो मी पाहिजे साप्ताहिक हा प्रकारच नाही. दुसरे मुख्य लेखा परिक्षकाने अहवाल सादर करणे यामध्ये त्यांनी क्लीअरकट म्हटले आहे की दरवर्षाला त्यांना अहवाल दयायचे आहे. १०६ नंबरच्या तिस–या भागात प्रत्येक सरकारी वर्ष सुरु झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक, महानगरपालिका मागील सरकारी वर्षाच्या संपुर्ण लेखा परिक्षण अहवाल स्थायी समितीसमोर सादर केला पाहिजे. आयुक्तांनी उक्त अहवाल छापुन त्याची प्रत कलम १९४ मध्ये लेखा परिक्षण अहवालाच्या व लेखा विविरणपत्राच्या छापिलप्रतीसह प्रत्येक पालिका सदस्यास पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे. हे पुस्तक आता प्रत्येक वर्षाबाबत सांगत आहे. हे पुस्तक खोटे म्हणत आहे असे मला वाटते, त्याप्रमाणे काही चालतच नाही ना. हा प्रकारच नाही आहे. २००९ चा तुम्ही आज देत आहात. यावर पुस्तक म्हणत आहे, कायदा म्हणत आहे. हे मला समजतच नाही. पाहिजे तसा कायदा वळविता येतो. असे असेल तर आम्हांला ते सुध्दा सांगा.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :–**साहेब, आपण आता हा जो लेखा परिक्षण अहवाल पाहिला ना २००९–१०, २०१०–११, २०११–१२, २०१२–१३, हा चार वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल जरी आज आलेला असेल दिसतांना जरी दिरंगाई दिसत असेल तर तो त्या काळात अहवालाचे लेखा परिक्षण किंवा अंतर्गत लेखा परिक्षण झालेले नव्हते. माझ्यापुर्वी श्री. बलमे साहेब होते अगोदरच्या काळात त्यांच्या काळातील हा अहवाल आहे. त्या काळात श्री. बलमे साहेबांनी अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल तयार केला. आणि तो अहवाल आज तयार झाल्यानंतर आम्ही आपल्यापुढे आज सादर करीत आहोत. नियमात असे म्हटले आहे की दरवर्षी अंतर्गत लेखा परिक्षण झाले पाहिजे. त्यानुसार १३–१४ पासुन ते १६–१७ चे आपण नियोजन केलेले आहे. प्रत्येक विभागाचे अंतर्गत लेखा परिक्षण सुरु केलेले आहे.

**सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–**ते ठिक आहे, आता निदर्शनास आले आहे. परंतु ज्याने चुक केली आहे. त्याचा मागचा उद्देश काय आहे. आता आक्षेप आलेले आहेत २००९ पासुन यांनीच काढलेले आहे आक्षेप, आक्षेप आल्यानंतर त्या विभागाकडुन अदयाप खुलासा मागविलेला नाही. आम्ही मान्य करुन देणार त्यानंतर ते बघणार मग आम्ही खूलासा कधी बघणार. नेमके मला समजले नाही लेखा परिक्षण.

**सादस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**स्थायी समितीच्या सभेमध्ये तुमचा कुठलाही लेखापरिक्षण अहवाल आल्यानंतर काय त्रुटी आहेत त्याचा कधी तुम्ही अहवाल दाखविला नाही. त्याचे पुढे काय होते कसे होते ते तुम्हांलाच माहित. अगोदर तुम्हांला त्यांच्याकडुन जबाब विचारला पाहिजे त्यानंतर आमच्याकडे आले पाहिजे. आधी आमच्याकडे येते मग तुम्ही चौकशी करता. जर काही चुका असतील त्यावर तुम्ही काय कारवाई करणार आहात ते सांगा प्रथम.

**श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :–**कुठलेही अंतर्गत लेखा परिक्षण झाले तर त्यावर सक्षम प्राधिकरण असते ते अंतर्गत लेखा परिक्षण करतात, त्यांच्याकडुन अंतिमीकरण, म्हणजे त्यांच्याकडुन फायनल होते. तेव्हा या मुद्दयास खरा ऑडीट रिपोर्ट बोलला जातो. हा प्रारुप रिपोर्ट आहे, म्हणजे कच्चा रिपोर्ट आहे.

**सदस्य श्री. राजेंद्र चौधरी :–**आजपर्यंत स्थायी समितीमध्ये जो लेखा परिक्षण अहवाल आला त्यास मंजुरी दिल्यानंतर पुढे काय होत नाही. त्यास मंजुरी असते की तात्परती मंजुरी असते कि तो मंजुर होत नाही. याबाबत कुठल्याही अधिका–याने कल्पना दिलेली नाही, आज तुम्ही बोलत आहात. हे तुम्हांला माहित आहे. म्हणजे जे दोषी दाखविले आहेत, त्यामध्ये काय चुका दाखविल्या आहेत की काय सूचना असतील तर त्यावर काय करणार आहात तुम्ही, आम्ही मंजुरी दिल्यावर तुम्ही काय कराल? जर आम्ही आज मंजुरी दिली की यामध्ये कोण दोषी आहेत त्यांच्यावर कारवाई करा, तर तुम्ही कारवाई कराल काय?

श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—साहेब, ते कारवाई करायचे अधिकार माझ्याकडे नाहीत. मी त्यांच्याकडुन उत्तर आणि खुलासा मागवु शकतो. ज्यावेळेस आपण लेखा परिक्षण करत असतो तर काही मुद्दे तेथेच उपस्थित होत असतात. ब—याचदा मुद्दे उपस्थित झाले की तेथल्या तेथे काही उत्तर मिळत असतात. जर उत्तर मिळाले नाही तर मग हया अहवाला येते.

सदस्य श्री. धनंजय बोडारे :—२००९ सालामध्ये या दोषी आढळले आहेत. २००९ चा २०१७ मध्ये अहवाल येतो, जे दोषी आहेत त्यात काही सेवानिवृत्त झाले आहेत, तर त्यांच्याबाबत तुम्ही काय करणार आहात.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—लेखा परिक्षण म्हणुन कोणाची सही आहे.

श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—श्री. बलमे यांनी केली आहे.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—आपण यापुर्वीच तयार केले होते व आपल्या विभागातच पडुन होते की आता तुम्ही तयार केले आहे.

श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—श्री. बलमे साहेबांच्यावेळी तयार झाले आहे. व आता त्यास अंतिम केले आहे. त्यांच्या सहया आणल्या व त्यानंतर येथे आणले आहे आम्ही.

सदस्य श्री. राजेश वदारिया :—२००९—१० चा अहवाल आला पाहिजे २०१०—११ मध्ये. २०१०—११ चा अहवाल आला पाहिजे २०११—१२ मध्ये. एवढया वर्षापासुन अहवाल आला नाही तर यास कोण जबाबदार आहे? २००९—१० पासुन जे कोणी मुख्य लेखा परिक्षक होते ते जबाबदार आहेत. त्यांच्यावर काय कारवाई करु शकतात, त्याबाबत काही सेक्शन किंवा ॲक्ट आहे काय?

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—आपण जो अहवाल पाठविला आहे त्यात कोण दोषी होते त्याबाबत तुम्ही विभागास पाठविले आहे नाही पाठविले आहे, ज्या त्रुटी आहेत, दोषी काढलेला आहे तर त्यावर काय कारवाई केली ते पाहिजे ना आमच्यासमोर? २००९ पासुन आतापर्यंत राज्य शासनाने ऑडीट यावर केलेलेच नाही आहे, असे काही आहे का याची माहिती दया व त्यामध्ये काही मुद्दे काढले होते की नाही काढले होते ते सांगा.

श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—अंतर्गत लेखा परिक्षण जो विभाग आहे तेथे अंतर्गत लेखा परिक्षणाचे विंग आहे. त्यांच्यामार्फत केले आहे. आणि लेखा परिक्षासाठी स्थानिक लेखा परिक्षण विभाग आहे त्यांनी आपले ऑडीट १०—११ पासुन केलेले आहे. १०—११ आणि ११—१२ असे दोन वर्षाचे ऑडीट आतापर्यंत झालेले आहे. यापुर्वी एजी ऑडीट करत होते.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:— एजी ऑडीटचा अहवाल यासोबत लावला पाहिजे होता.

श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—साहेब, आम्ही १०५, १०६ नुसार अंतर्गत लेखा परिक्षणाचा मुख्य लेखा परिक्षकाने सादर केलेला आहे.

सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—त्यामध्ये लिहिले आहे ना यामध्ये संचालक स्थानिक लेखा परिक्षण राज्य शासनाचा अधिकार आहे. स्थानिक निधी लेखा परिक्षण लेख्याचा महानगरपालिका वार्षिक लेखा परिक्षण व्यवस्था करेल, संचालक स्थानिक अहवाल मिळाल्यानंतर राज्य शासन आयुक्तांस पाठवेल आयुक्त असा अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासुन तीन महिन्याच्या आत महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची व्यवस्था करेल. त्यानंतर आयुक्त स्थानिक लेखा परिक्षण अधिकारी यांच्याकडुन अहवाल आल्यानंतर पुढील कार्यवाही करेल.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—तुमचे आता १६—१७ चे परिक्षण कधी होणार आहे?

श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—साहेब, आम्ही एक एक विभाग करायला लागलो आहे, साधारणत: आता चार विभाग झाले आहेत.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर :—१६—१७ चे किमान फेब्रुवारीच्या आत तुम्ही आणा. हया गोष्टी ज्या आहेत ते आता १० वर्षापुर्वीच्या आहेत. त्यात त्रुटी आहेत ते बरोबर आहे, किमान यामध्ये ज्या त्रुटी आढळल्या आहेत त्या महत्वाच्या

आहेत त्यामध्ये तुम्ही लिस्टींग करा, आणि भविष्यात असे होवु नये याचे एक परिपत्रक काढा. जे झाले आहे ते खुप गंभीर आहे तर त्यावेळस जरी कोणी काम करत असेल....

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>साहेब,यामध्ये फक्त लेख्याची चुकी नाही आहे. यामध्ये क्लीअरकट म्हटले आहे की हा जो अहवाल राज्य शासनाकडुन मिळाला आहे, तो आयुक्तांकडे गेल्यानंतर आयुक्त तीन महिन्याच्या आत महानगरपालिका सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची व्यवस्था करील. आयुक्त स्थानिक निधी लेखा परिक्षण निधी तरतुदीचा अहवालाची आवश्यक ती पुढील कारवाई करेल. याचा अर्थ त्यांनी आयुक्त म्हणुन तुम्हांलाही बसविले आहे. स्थानिक निधी लेखा परिक्षणाकडुन जो अहवाल आलेला आहे तो तुमच्याकडे दयायचा आहे आणि तुम्ही तो महासभेपुढे दयायचा आहे. २०१०–१२ च्या म्हणण्यानुसार झाले आहे ना राज्य शासनाकडुन, १२–१३ पर्यंत झाले आहे मग तो ठेवला का नाही, आयुक्तांपुढे तीन महिन्यात ठेवला का नाही. तो प्रथम ठेवा, त्यामध्ये काय काय त्रुटया आल्या आहेत, त्यामध्ये काय काय येईल, २०१२–१३ मध्ये. साहेब म्हणता २०१६–१७ चे ते पॅरोलर काढुन ठेवा तुमचे काम. परंतु कायदा म्हणतो १०७ अ प्रमाणे तुम्ही देवुन त्याचा अहवाल महासभेपुढे पाठवा. त्यामध्ये क्लीअरकट म्हटलेले आहे, राज्य शासन स्थानिक निधी लेखा परिक्षण परिवहन उपक्रम असल्यास, त्यांच्या लेख्यासह तो आपणाकडे नाही. महानगरपालिका वार्षिक लेखा करण्याची व्यवस्था करील, संचालक स्थानिक निधी लेखा परिक्षण यांच्याकडुन अहवाल मिळाल्यानंतर राज्य शासन आयुक्तांकडे पाठविल. आयुक्तांकडे आला नाही काय? आयुक्त अहवाल मिळाल्याच्या दिनांकापासुन तीन महिन्याच्या आत असा लेखा परिक्षण अहवाल महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याची व्यवस्था करील. त्यानंतर आयुक्त महाराष्ट राज्य स्थानिक निधी लेखा परिक्षण तरतुदीनुसार अहवालानुसार पुढील कारवाई करेल. म्हणजे राज्य शासनाने तो आयुक्तांपुढे पाठविला काय?

<u>श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :–</u>आलेला आहे अहवाल.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:–</u>आलेला आहे मग आयुक्तांकडे का नाही आला? मागील बॉडीमध्ये सुध्दा आम्ही होतो. आता हा विषय आपण बाजुला ठेवु या.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :–</u>एका गोष्टीचा मला खुलासा करायचा आहे. जो अहवाला आम्हांस आपण दिला आहे तो उशिरा आला आहे. ८–९ वर्षानंतर आला आहे. ठिक आहे, २०१२–१३ चे मी वाचत आहे, आतापर्यंत वाचला नाही आहे आता वाचणार आहोत. या अहवाला ज्या त्रुटया आहेत त्यासाठी आपण काय केले आहे? आता मी एक अहवाल वाचुन दाखवत आहे त्यात काय लिहिले आहे की प्रथम वेळी चार निविदाधारकांच्या निविदा झाल्या होत्या, चारपैकी फक्त जयहिंद रोड बिल्डर्स वगळता, इतर तिघांची निविदा तांत्रिक कागदामध्ये अपुर्ण असल्यामुळे अपात्र झाल्यामुळे निविदा परत काढली व दोन लोकांना दिली. दोन मधुन पास करत नाही, तीन मध्ये करत आहेत. व ते ७ टक्के जास्ती मध्ये दिले. चार–पाच पानाचे लिहीले आहे आणि निविदा बनवल्या आहेत, त्याच चुकीच्या आहेत. जर एवढे पैसे आपण जास्त देत आहेत तर निविदा बनवल्याच चुकीच्या आहेत, ही त्यांची चुकी आहे. त्यांचा तीन वर्षाचा जो लायब्रिटी प्रेड होता, त्याच्या पहीलेच शहर अभियंता बोलत आहेत की, खड्डे परत पडले आहेत. तरी सुध्दा बिल देण्यात आलेले आहे. पान नंबर ३९ वर प्रश्न आहे, सन २०१२–१३ मध्ये जर या सगळया गोष्टी होत असतात, तेव्हा शहर अभियंता यांची चुकी असेल किंवा अभियंता यांची चुकी असेल, तर त्यांच्यावर कोणती कारवाई झाली पाहीजे. ज्या ठेकेदाराला त्याचा फायदा झाला, त्याच्या दुस–या बिलामध्ये आपण कपात केली आहे का? काय केले आहे? ते पण यायला पाहीजे ना? की फक्त आपण अहवाल देणार आणि सभागृह अहवाल वाचणार आणि ठेवून देणार की आम्ही अहवालाला मान्यता दिली आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:–</u> असेच ठेऊन देणार आम्ही तेच काम केली आहेत. त्यासाठी यांच्यावर विश्वास नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> <u>आज आपण प्रश्नांच्या नंतर</u> पुढे येणा–या काळामध्ये अशा प्रकारच्या चुका व्हायला नाही पाहीजेत. संबंधित विभागाला सुचना दिल्या आहेत का? आज सन २०१२–१३ मध्ये ज्या चुका झाल्या आहेत, त्या शहर अभियंताकडून सन २०१३–१४ मध्ये होणार नाहीत का, अशा प्रकारचे काय केले आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:–</u> टेंडर चुकीचा निघाला आहे तर टेंडर कमिटी काय करीत आहे?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:–</u> बघा यामध्ये सगळया चुकाच काढल्या आहेत ना?

<u>सदस्य, श्री. धनंजय बोडारेः—</u> अहवाल आलेला आहे, चौधरी यांनी सांगितले की सन २००९ मध्ये तोच अहवाल आहे, सन २०१० मध्ये शेम तसाच आहे. माझ्या पुढे वाहन विभागाचा आहे, एका बाजूला १०५ वाचून दाखवले आहे, लेखा परिक्षकांनी महानगरपालिकेची साप्ताहीक तपासणी केली पाहीजे आणि तो अहवाल स्थायी समितीकडे पाठविला पाहीजे. स्थायी समितीने देखील वेळोवेळी आपल्याला वाटेल असे एक आठवडयांनी ऑडिट झाले पाहीजे आणि दर आठवडयाला केलेले ऑडिट स्थायी समिती, सभापती यांच्याकडे यायला पाहीजे. त्याच्या नंतर कारवाई पुढची आली, आता याच्यामध्ये तुम्ही आमच्याकडे सन २००९—१०, २०११—१२ चे आणि सन २०१२—२०१३ चे फक्त ऑडिटचे रिपोर्ट आणलेले आहेत. तुम्ही काय म्हटले आहे, तरी फक्त लेखी खुलासा करण्यात यावा, त्याच्या नुसार पुढील कारवाई प्रत्यक्षात अनुपालन करण्यात येईल. याच्या नंतर पुढे काय झाले? हे तुम्ही सादर केले नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u> महत्वाचे म्हणजे तुम्ही बघितले का फक्त ५ किलो मिटर गाडी आवरेजनी चालली आहे, मला वाटते की, परदेशातील गाडी असली पाहीजे. ४ किलो मिटर, ५ किलो मिटर...

<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारेः—</u> सन २००९ मध्ये म्हणजे वाहन वापरना—या अधिकारी/कर्मचा—यांचे लॉक बुकच नाहीत, सन २०१०—११ मध्ये तोच रिमार्क आहे. वाहन वापरणा—या अधिकारी/कर्मचारी यांचे नाव लॉक बुकमध्ये दिसून येत नाही डिझेल भरता वेळी त्यास लागणारे प्रत्येक वेळी लागणारे इंधन याची नोंद दिसून येत नाही. इकडे सुध्दा तसेच शेमच आहे, म्हणजे ऑडिट करून काही उपयोगच नाही. इकडे आणलेच कशाला, फक्त फॉर्मालिटी पुर्ण केली आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u> यामध्ये चुकीचा अहवाल आहे, वार्षीक अहवाल चुकीचा असेल तर आपण पण त्याला मंजूरी देत आहोत ना? म्हणजे आपली पण चुकीच आहे. स्थायी समितीने अशा अहवालाला मंजूरीच दिली नाही पाहीजे.

<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारेः—</u> त्याच्यावर पुढे काय झालेले आहे, सन २००९ मध्ये जे ऑडिट झालेले आहे, सन २०१० मध्ये ऑडिट झालेले आहे, त्याच्यावर प्रशासनाने कारवाई काय केली? त्याच्यात सगळे आले पाहीजे. म्हणजे इतिवृत्त आणि फक्त मिटींग करतो कुठली पण इतिवृत्त बनवले त्याच्यावर पुढे काय झाले कारवाई केली की, नाही प्रशासनाने? हे प्रशासनाचे काम आहे. एखादा अधिकारी, कर्मचारी चुकून चुकत असेल किंवा जाणूनबूजून चुकत असेल, तर त्याच्यावर दंड काय केले? हे महत्वाचे आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u> सगळयाच डिपार्टमेंटचा अहवाल चुकीचा आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u> इथे कसे आहे,की, प्रत्येक वाहनासाठी ठेवलेल्या नोंद वहया, लॉक बुकची तपासणी करण्यात आली, सदरच्या विविहीत नमुन्याच्या नोंद वहीमध्ये प्रत्येकी वाहन लावलेल्या किलो मिटरची संख्याच नोंदविण्या आलेली नाही. प्रवास कुठून आणि कुठ पर्यंत झाला या बाबतच्या नोंदी नोंदवहीमध्ये नाहीत. एकुण वाहनासाठी वापरलेले इंधन तसेच खर्चाचे दिनांक त्यांचे क्रमांक, प्रमाणक यांची नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत. प्रवासाचे प्रयोजन नोंदवलेले नाहीत. वरील नियम १५३ नुसार कारवाई झाल्याचे निदर्शनास आले नाही. ४८ लाख ३० हजार ६९६ रूपये खर्च झाला आहे.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u> शासनाचे ऑडिटर पण येतात ना ऑडिट करायला,

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u> ते सरळ म्हणतात याचा योग्य वापर इंधनासाठी खर्च झाला असे म्हणता येणार नाही, इधंनावरती झालेला खर्च योग्य न होता, इंधन चोरी झाल्याची शक्यता नाकारता येणार नाही, क्लीअरकट म्हणटले आहे.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u> त्यांनी त्यांचा रिपोर्ट दिला आहे, जेवढया चुका झाल्या आहेत, सर्व माहीती दया.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u> यासाठी स्थायी समितीची विशेष सभा लावण्यात यावी. या विषयावर चर्चा करू.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u> दुस—या वेळी जेव्हा आपण चर्चा करू, तेव्हा हे सांगायला पाहीजे की, या अहवालामध्ये ज्या त्रुटी आहेत, त्याच्या नंतर काय?

<u>श्री. विनायक फास प्र. मुख्य लेखा परिक्षक`ः—</u> साहेब, मी परत सांगतो, आपल्याकडून हा अहवाला फायनल होईल, मान्य होईल. तेव्हा आम्ही क्युरी डिपार्टमेंटला

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> अहवालात चोरी दिसून येते, असे सांगितल्या नंतरही आम्ही त्याला मंजूरी दयायची का?

<u>श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—</u> नाही नाही सर, हे आक्षेपाचे मुद्दे आहेत. जेव्हा इथे मान्यता मिळेल, त्या नंतर त्या त्या डिपार्टमेंटला पाठविण्यात येतील आणि या त्रुटींचा त्यांच्या कडून खुलासा येतो, ऑडिटमध्ये असेच...

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> शासनाचे जरी असे असेल...

<u>श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक:—</u> परंतु आपल्याकडून रिपोर्ट तरी अगोदर फायनल झाला पाहीजे, शासनाचा जरी रिपोर्ट आपल्याकडे आला, तरी पण लगेच आपल्याकडून आपण त्यांना खुलासा दिला तरी ते मान्य करीत नाहीत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> पुर्वीचे जे स्थायी समितीने पास केले आहे,

<u>श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—</u> नाही, तो पास केला नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> आता तुम्ही दिलेला आहे ना सन २००९ पासूनचा, म्हणजे याचा अर्थ याच्या अगोदरचा क्लिअर आहे. २००९ च्या अगोदरचे लोकांचे तत्कालीन स्थायी समिती सभापती आणि बॉडी असायची त्यांनी जर पास करून तुम्हांला दिले आहे आणि नंतर पुढे त्याचे काय झाले?

<u>श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—</u> मी तेच परत सांगत आहे की, जोपर्यंत फायनल होत नाही,

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> नाही नाही, त्याच्या अगोदर.

<u>श्री. विनायक फासे, प्र. मुख्य लेखा परिक्षक :—</u> त्याच्या अगोदरचे रेकॉर्ड आपल्याकडे उपलब्ध नाहीत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> उपलब्ध नाही असे कसे म्हणता येईल.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> हे सगळे जुने विषय आहेत, आपण त्याच्यावर दखल घेऊ जे जास्त गंभीर आहेत, म्हणून माझा पॉईंट हा होता की, आता जे नजदिकचे आहे ते आपल्याला करता येईल. त्याच्यामध्ये सगळे लोक बदल्या झाले नाहीत ते तिथेच आहेत, निदान त्यांचे सहकार्य आपल्याला मिळेल आणि १० वर्षा पुर्वीची गोष्ट आपण १० वर्षा पुर्वी सेवानिवृत्त झालेल्या माणसाला त्याच्या घरी पाठवणे किंवा काय करणे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> समजलो आम्ही विषय असा आहे, दर वर्षानी यायला पाहीजे होता. या बाबत, इथून पुढे...

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> म्हणून मी त्यांना तेच सांगत आहे की, सन २०१६—१७ चा फेब्रुवारी पुर्वी सादर करा. म्हणजे आपल्या पुढे रिदम तरी पुढे मेंटेन करता येईल.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> रिदम मेंटेनन्स, मला एवढेच म्हणायचे आहे की, याच्या पुर्वीचा जो झालेला आहे, त्या बाबत यांनी खुलासा मागितला आहे आणि त्यांनी खुलासा पाठवला आहे, हे पण त्याच्यात आले पाहीजे आणि तो पण रिपोर्ट आम्हांला मिळाला पाहीजे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> हे याच्यामध्ये असे अजून अभिप्रेत आहे, का एक ड्राफ्ट रिपोर्ट आहे, तो तुम्ही जसेच्या तसे मान्य करत आहेत का, किंवा त्याच्यामध्ये तुम्ही ज्या काही त्रुटी काढल्या आहेत, त्याच्यामध्ये काही त्रुटी चुकीच्या आहेत, असे पण तुम्ही निरीक्षण करू शकतात. हे निरीक्षण बरोबर नाही, या निरीक्षाणाच्या ऐवजी हे असायला पाहीजे. मग तुम्ही फायनल केल्यावर ते संबंधित माणसाची जबाबदारी फिक्स करता येईल किंवा त्याच्या कडून खुलासा आपल्याला मागविण्याची परिस्थिती निर्माण होईल. हा रिपोर्ट जसा आहे, तसाच स्विकारायचा आहे का? त्याच्यामध्ये तुम्हांला काही.....

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> हा अहवाल सन २००९—१० चा आहे, या मध्ये दोन रिपोर्ट आहेत ते वैद्यकिय आरोग्य विभागाचे आहेत. एक मालमत्ता विभागाचा आहे, एक आहे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि एक भांडार विभागाचा आहे. एवढे आहेत बाकीचे सर्व वाहन विभागाचे आहेत. हे माझ्या नजरेमध्ये एक आवास आहे, फक्त नॉर्मल दाखवण्यासाठी त्रुटी काढल्या जातात.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> त्याच्यावर कारवाई काय?

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> वाहन विभागामध्ये, समजा यामध्ये ५० त्रुटी आहेत, ५० मधून ४३ वाहन विभागाच्या काढल्या आहेत, बाकी वैद्यकिय विभागाचे दोन, आरोग्य विभागाचे दोन, सार्वजनिक बांधकामाची एक मालमत्ता विभागाची एक हे पण लक्षात घेण्यासारखे आहे.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> त्याचे कारण काय आहे? माहीत आहे का? टेंडर एकच आहे, त्याच्या नंतर टेंडर निघालाच नाही. त्याच्या नंतर टेंडर निघाले नाही, प्रोसेस झाली नाही. तेच टेंडर दहा—बारा वर्षा पासून चालले आहे. सन १९९५—१९९६ पासून तेच टेंडर चालले आहे. त्याचे कारणच तेच आहे. साहेब, जरा गंभीर गोष्ट आहे, गंभीर आरोप आहेत. दहा—बारा वर्षापासून त्या विभागातून टेंडर झालेच नाहीत. वाहन विभाग त्याच व्यक्तिीला दर वर्षी मुदतवाढ देत चालले आहे. ही माहीती आपण संबंधितांना बोलवा आणि माहीती घ्या.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:—</u> त्यांचे म्हणणे काय आहे, चौधरी साहेब, हा अहवाल त्यांनी दिला आहे, कुठे कुठे चुका झाल्या आहेत, आपण मान्यता दिल्या नंतरच ते ॲक्शन घेऊ शकतात. त्यांनी ज्या चुका काढल्या आहेत, त्यांना मान्यता देणे आपल्याला काहीच त्रास नाही.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—</u> सार्वजनिक बांधकाम विभागाचा एकच विषय आहे. जर त्यामध्ये दहा विषय असतील आणि त्यामध्ये चुका झाल्या असतील तर त्याला काय करू शकतो.

<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:—</u> आपल्याला यामध्ये, याच्या पहीले सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये काय झाले अजून कुठे काय झाले आहे, काय नाही आपण बघू शकत नाही. फक्त ऑडीटमध्ये जो रिपोर्ट दिला आहे, त्याच्यावर आपल्याला निर्णय घ्यायचा आहे. आपण प्रत्येक डिपार्टमेंटमध्ये जाऊन नाही. तर सन २००९—१० मध्ये ज्या चुका झाल्या आहेत, त्यांनी आपल्या समोर ठेवल्या आहेत. लेट झाले आहे, त्याच्या नंतर प्रत्येक आठवडयाला ऑडीट रिपोर्ट यायला पाहीजे. म्हणजे जसे आयुक्तांनी सांगितले की, या वर्षाचा पुढच्या वर्षा पर्यंत आपल्याला मिळाला पाहीजे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> १०५ मध्ये दोन गोष्टी आहेत, मी जे समजलो आहे, तेच मी आपल्याला सांगत आहे. प्रथम आपला जो विकली खर्चाचा हिशोब आहे, तो स्थायी समिती पुढे यायला पाहीजे. दुसरा वार्षिक अहवाल जो २०१७ ला ३१ मार्चला वर्ष संपत असते, तो त्वरीत यायला पाहीजे. ठिक आहे तो आला नाही. परंतु आमचे म्हणणे आहे की, तो लवकरात लवकर घेऊन या.

<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:—</u> राजेशजी मला हे म्हणायचे आहे की, आता आपल्याला मंजुरी कशाला दयायची आहे. मंजूरी दिल्या नंतर आपण कोणावर तरी कारवाई करणार का? पहीले कारवाई केल्या नंतर स्थायी समिती समोर आणणार का? आपल्याला मंजूरी दयायची आहे का? आणि त्याच्या नंतर तुम्ही कारवाई करणार का?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> हे जे आक्षेप आहेत, त्या पैकी सर्वच्या सर्व मान्य करायचे आहेत की, त्याच्यामध्ये तुम्हांला हे योग्य आहेत, की काय ते ठरवायचे आहेत.

<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:—</u> ऑडिट आम्ही कसे ठरवणार? ऑडिट ते ऑडिट आहे. आमच्याकडे काही निकष असतील, काही आकडेवारी असतील तरच आपण करू शकतो.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> आपल्या समोर रिपोर्ट आहेत, ते रिपोर्ट आपण वाचायला पाहीजेत, त्याच्या पैकी कोणते आक्षेप तुम्हांला जुनियन वाटतात. त्यांचे आक्षेप कधी कधी ५० टक्के ऑडीट पण त्यांचे एकमेकांशी सुसंवाद नसल्यामुळे झाले असतात. त्यामुळे त्या बदल आपल्याला निर्ण घ्यावे लागतील की हे ऑडिट खरोखर आक्षेपसारखे आहेत का? हे आपल्याला ठरवावे लागेल. इट इज नॉट बाईडली ऑडीट पण शेवटी वरून आलेले ब्रम्हदेव नाही. त्यांचे एकमेकांशी सुसंवाद नसल्यामुळे ऑडिट पॉईट निघतात. त्यामुळे हे ऑडिटवाल्यांना सगळे कळते वाहन विभागाचे पण कळते, मालमत्ता कर पण कळते सगळे असे नसते. टू हॅव टू अंडरस्टॅड फिल्टर इट प्रॉपर्ली.

<u>श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक:—</u> मा. आयुक्त साहेब, मा. सभापती महोदया, मा. आयुक्त साहेबांनी सांगितले की, प्रत्येकी विकली करायचा परंतु तो मंथली अंकॉट झाल्या शिवाय खर्चाचे लेखा हिशोब आम्हांला करता येत नाही. त्यामुळे महीन्या नंतर सांगा.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> बलमे साहेब, होते त्या वेळी त्यांनीही हेच कारण सांगितले होते. लेखा विभागाकडून आम्हांला डिटेल मिळतील तेव्हाच आम्ही ऑडिट करू. आता आयुक्त साहेबांच्या अंडरमध्ये अकाऊंट विभागपण आहे आणि ऑडिट पण आहे. हा तुमचा प्रॉब्लेम आहे, नाहीतर आयुक्त साहेबांची जबाबदारी आहे की, दोघांनाही बसवून सात दिवस झाल्या नंतर जो खर्च आहे, तो आपण ऑडिटला दया. ऑडिट आणि अकाऊंट एकाच जागेवर आहे. असे नाही की, अकाऊंट डिपार्टमेंट मुंबईला आहे आणि ऑडिट डिपार्टमेंट कलकत्याला आहे. तसे नाही आपण एकाच ठिकाणी बसलेले आहेत. अकाऊंट कडून पुर्ण होऊन आपल्याकडे यायला जास्त वेळ लागणार नाही.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> यामध्ये नियमाचा अर्थ असा निघायला नाही पाहीजे की, सात दिवसाच्या आत तपासणी करून स्थायी समितीकडे यायला पाहीजे. सात दिवसामध्ये त्यांनीच हेरीफाय करायला पाहीजे, स्थायी समितीपुढे त्यांना जसे वाटेल तसे त्यांनी आणायला पाहीजे. असा अर्थ त्याचा निघत नाही. याचा अर्थ असा नाही दर आठवडयाला स्थायी समितीला दयावे. तपासणी तुम्ही दर आठवडयाला करा.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> हे बघा, तुम्ही काहीही करा, यामध्ये बदल होणार नाही, यामध्ये जे लिहीले आहे, ते लिहिले आहे, यामध्ये कारण काही पण काढा, आपण अर्थ काढा? किंवा अनर्थ काढा यामध्ये लिहीले आहे की, यामध्ये लिहीले आहे की, आपल्याला दयायचे आहे. प्रत्येक आठवडयाला पुर्ण झाल्या नंतर दयाययचे आहे की, एक वर्ष झाल्या नंतर दयायचे आहे.

<u>सदस्य, श्री.धनंजय बोडारे:—</u> आठ वर्षा नंतर देण्या पेक्षा तीन महीन्यामध्ये दया. आता पर्यंत मिळत नव्हते तेव्हा ठिक होते.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> एक गोष्ट लक्षात घ्या, हे समजून घेण्यासाठी मी वेरीफाय करतो की, हे खरे आहे की, त्यांनी प्रत्येक आठवडयाला तपासणी करायला पाहीजे, आणि तपासणी केल्या नंतर त्यांनी स्थायी समितीच्या पुढे प्रत्येक आठवडयाला ठेवायचे आहे. असा त्याचा अर्थ निघत नाही. नगरपालिका मुख्य लेखा परिक्षकाने महानगरपालिकेच्या लेखांची साप्ताहीक तपासणी व लेखापरिक्षण केले पाहीजे आणि त्यावरील आपला अहवाल स्थायी समितिकडे पाठविला पाहीजे. स्थायी समितीकडे पाठवण्यासाठी जसे त्यांची तपासणी होईल, एक महीन्याची, दोन महीन्याची, तीन महीन्याची तसे त्यांनी प्रत्येक तीन महीन्या नंतर ठेवू शकतात, प्रत्येक आठवडयाला तपासणी करून पाठविला तर आपण पण त्रस्त होऊन जावू. शिवाजी महाराजांच्या पेटा—या सारखी तपासणी होणार नाही.

<u>श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक:—</u> उशिरा आले तरी त्याच्यात सर्व हिशोब पुर्ण असतो.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारिया:—</u> ज्या वेळी नियम बनवले गेले सेशन ठाकण्याचे कारण हे आहे की, त्या वेळी स्थायी समितीला हे समजायला पाहीजे की, पैसा कुठून आला आणि कुठे गेला, जर आपण तीन महीन्याचा हिशोब सरसकट आणत असाल तर काहीच समजणार नाही.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> कायदा बनवण्या मागे त्या लोकांचे काही तरी कारण असेल ना? एक आठवडयात दिला पाहीजे किंवा एक आठवडयात केले पाहीजे, असे क्लियर कट म्हणटले आहे.

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> दिले नाही पाहीजे, स्थायी समितीला दर आठवडयाला दयायची गरज नाही, आपण दर आठवडयाला तपासणी करून...

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—</u> तीन महीन्यानी जर आले, तर आम्हांला वाचायला वेळ मिळाला पाहीजे की, नाही?

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—</u> आपण एक काम करू, दर तीन महीन्यानी, तुम्ही दर आठवडयाला तपासणी करा. एकमेकांमध्ये सुसंवाद निट ठेवा आणि दर आठवडयाला त्याचे रिपोर्ट तुम्ही घेत जा. अगोदर तुमचा आधीचा हा सगळा कचरा आहे, तो लवकरात लवकर निपटून काम करा आणि गेल्या वर्षीचा जो रिपोर्ट आहे, तो या फेब्रुवरीच्या आत आणण्याचा प्रयत्न करा.

<u>श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षक:—</u> आपल्याकडे २१ पदे मंजूर आहेत, त्यामध्ये फक्त ८ पदेच कार्यरत आहेत. त्यामुळे आम्हांला मॅन पावर नसल्यामुळे शक्य होत नाही, तरी आम्ही...

<u>आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकरः—</u> तुम्ही एक काम करा, तुम्ही आता सन २०१२—१३ चा आणि पुढचे जे काम चालू केले आहे ते थोडे बाजूला ठेवा आणि होत राहील, आता तुम्ही सन २०१६—१७ चाच संपवा, असे नाही की, तुम्ही आधीचे जे केले आहे, त्याच प्रमाणे यायला पाहीजे. म्हणजे हे तरी म्हणता येईल की, गेल्या वर्षीचा पुर्ण आहे, आधीचे जे काम चालू आहे, ते चालुच राहील. तुम्ही प्राथमिकता या वर्षीला दया, सन २०१६—१७ ला. तम्ही आता जे जास्त काम आहे, तेच घ्या. सन २०१३ —१४ चा करीत बसणार, परत ती माणसे शोधणार , परत त्याच्यात एवढे गांर्भीय रहात नाही. चार वर्षा पुर्वी तुम्ही काही गोष्टी डिझेल किती भरला आणि मायनस किती दिले आहे. आता तुम्ही सन २०१६—१७ चा बघा.

<u>श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षकः—</u>याच्यात तीन रिपोर्ट वेगवेगळे आहेत, लेखांचा जो साप्ताहीक हिशोब आहे,तो वेगळा आहे आणि आमचा ऑडिट जो इंटरनल ऑडिटचा जो आता हिशोब दिला आहे तो आणि जे बाहेरचे ऑडिट करतात, लोकल फंडचा तो वेगळा आहे. आता लोकल फंडच्या ऑडीटचा पण ज्या वेळेस त्यांचा रिपोर्ट येईल, तो सभेपुढे ठेवल्या शिवाय, त्याची मान्यता मिळाल्या शिवाय, आयुक्तांच्या सही झाल्या शिवाय ते रिपोर्टच घेत नाहीत, त्याला आम्ही अहवालात उत्तरच देवू शकत नाही. त्या प्रमाणे हा अहवाल असा आहे की, जो पर्यंत त्याला स्थायी समितीची मान्यता मिळत नाही, तो पर्यंत डिपार्टमेंटला काही कळवू शकत नाही. आम्ही जे ऑडिट काढले आहे, त्याला स्थायी समितीने मान्यता दयायला पाहीजे, हाच विषय आहे.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u> आपण जर कर्मचा—यांचे बोलाल तर ज्या वेळी कर्मचा—यांची पद भरली होती किंवा त्यांचा ढाचा बनवला होता, त्यावेळी संगणक नव्हते किंवा कोणतेही सॉफटवेअर नव्हते. आज आपल्या जवळ १०१ सॉफटवेअर आहेत, संगणक आहेत, जसे त्यावेळी मॅन्युअली इंटरी होत होती, मोबाईल हॉटस ॲपचा यामध्ये उपयोग होणार नाही. परंतु आता जो सॉफटवेअर आहे, तो आज चार लोकांचे काम एक संगणक करीत आहे, मला वाटते की, हे एकदम सोपे आहे.

<u>श्री. अशोक जाधव, सहा. लेखा परिक्षकः—</u> परंतु सर ऑडिट आहे तर, इन डयुजली करायला लागते, रिपोर्ट टाईप करण्यासाठी वेळ लागतो.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u> पुढच्या मिटींगसाठी पुर्ण दिवसासाठी ठेवा, त्याच्यामध्ये साहेब, एक करा सन २०१२ चा जो अहवाल राज्य शासनाचा आलेला आहे. तो तुम्ही महासभमध्ये ठेवण्यापुर्वी इथे जर ठेवला तर आम्हांला त्याच्यातून बरेच काही कळेल की, सन २०१२ मध्ये आक्षेप काय आले आहेत?

<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u> मंजूर केले तरच काम होईल.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u> त्याच्यासाठी आपण दुसरी मिटींग लावू, आपल्याला त्यावर जे आक्षेप घ्यायचे आहेत.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u> यामध्ये आक्षेप त्यांनी घेतले आहेत, आपल्याला ते मंजूर करायचे आहेत किंवा रीजेक्ट करायचे आहेत.

<u>सदस्य, श्री. सुनिल सुर्वेः—</u> आपले आक्षेप पण त्याच्या बरोबर असतील ना? आपले आक्षेप पण त्याच्या बरोबर दयायचे आहेत.

<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u> त्याच्यासाठी स्वतंत्र मिटींग घ्या.

<u>सदस्य, श्री. राजेंद्र चौधरीः—</u> या विषयाचे काय करायचे?

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u> खरे म्हणटले तर माझ्या माहीतीनुसार पास केले पाहीजे. हे बघा ऑडिटरनी ज्या चुका काढल्या आहेत...

<u>सदस्य, श्री. राजेश वदारियाः—</u> याच्या पेक्षा जास्त चुका आपण काढू शकत नाही.

<u>सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानीः—</u> पास करावेच लागेल. या विषयाला पास करू आणि यामध्ये असे टाकू की, प्रत्येक वर्षीचा अहवाल देणे बंधनकारक असेल.

**सदस्य, श्री. धनंजय बोडारे:—** याच्या पुढचे पण लवकरात लवकर संपवून टाका, आता सन २०१३ पर्यंत दिले आहे. सन २०१३ ते २०१६ दया आणि मग नंतर दर वर्षीचा देत चला.

**महापालिका सचिव:—** या मध्ये असे लिहू की, दर वर्षी अहवाल देणे बंधनकारक असेल आणि अहवालास मान्यता देत आहे.

**सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:—** नाही म्हणजे आम्हांला कधी मिळेल, आम्हांला पुढचा कधी मिळेल. म्हणजे विषय एवढा बोलून त्याला काही अर्थच राहीला नाही. मला म्हणायचे काय आहे, सन २०१२ चा राज्य शासनाकडून आयुक्तांना जो अहवाल दिला आहे, तो तरी सांगा की, महासभेला कधी देणार आहेत.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—** पुढच्या महासभेला देणार आहेत का? मग ठिक आहे.

**काही सदस्य :—**पास—पास......

**सभापती, श्रीमती कांचन अमर लुंड:—** सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

---

☑ **विषय क्र. २ :—**उल्हासनगर महानगरपालिका सन २००९—१०, २०१०—११, २०११—१२, २०१२—१३ या ०४ वर्षाचे अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल सादर करणे.

**प्रस्तावना**

उल्हासनगर महानगरपालिका लेखापरिक्षण विभागाकडून तत्कालीन मुख्य लेखा परिक्षक यांच्या पर्यवेक्षणाखाली महापालिकेच्या विविध विभागांचे सन २००९—१०, २०१०—११, २०११—१२ व २०१२—१३ या चार वर्षाचे अंतर्गत लेखा परिक्षण करण्यात आलेले होते. सदर वर्षाचे अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल तयार करण्यात आलेले होते. सदर वर्षाचे अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल तयार असून महानगरपालिका अधिनियमानुसार सदर अहवाल मा. स्थायी समितीस सादर करणे आवश्यक असल्याने वरिल ०४ वर्षाचे अंतर्गत लेखा परिक्षण अहवाल सोबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

**स्थायी समिती ठराव क्र. ६२** **दिनांक:—८/१२/२०१७**

सुचकाचे नाव :—श्री. दिपक सिरवानी

अनुमोदकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर महानगरपालिका सन २००९—१०, २०१०—११, २०११—१२, २०१२—१३ या ०४ वर्षाचे अंतर्गत लेखा परिक्षण अहवालास मान्यता देत आहे.

**तसेच**

दरवर्षी अहवाल देणे बंधनकारक असेल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. ३ वाचून दाखवितात.

---

⇨ **विषय क्र. ३** :—उल्हासनगर शहराच्या सुधारीत विकास योजनेच्या ३०० चे संच (एस.एम. च्या १२०० प्रती व ई.पी.च्या १२०० प्रती) उपलब्ध करुन देणेबाबत करावयाची कार्यवाही व याकामी येणाऱ्या खर्चास देणे.

---

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— याच्यामध्ये स्थानिक खासदार, आमदार यांना दिलेले नाही,

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— त्यांना पण दयायला पाहीजे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— परंतु याच्यात उल्लेख नाही.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— सगळयांना दिलेले आहे.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— फक्त याच्यात उल्लेख आलेला नाही.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास... याच्यामध्ये माझी एक सुचना आहे, आपले जे पाच पदाधिकारी आहेत, महापौर, उप महापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, आणि विरोधी पक्ष नेता यांच्या कार्यालयात एक एक लावले तर उचित वाटेल.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— यामध्ये मनसेचे जे पदाधिकारी आहेत....

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— हा त्यांना पण दया, जसे आपल्याला उचित वाटेल तसे.

सदस्य, श्री. सुनिल सुर्वे:— सगळया पार्टीच्या अध्यक्षांना दया.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:— पास...पास..

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास..

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:— सगळया पार्टीचे अध्यक्ष आणि आपले सगळे पदाधिकारी आणि सर्व गट नेता.

सदस्य, श्री. जमनादास पुरस्वानी:— इतिवृत्ताची वाट न पहाता, पास...पास..

काही सदस्य :—पास—पास......

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—</u> सदरचा विषयाबाबत सर्वानुमते पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे 

---

☑ **विषय क्र. ३** :—उल्हासनगर शहराच्या सुधारीत विकास योजनेच्या ३०० चे संच (एस.एम. च्या १२०० प्रती व ई.पी.च्या १२०० प्रती) उपलब्ध करुन देणेबाबत करावयाची कार्यवाही व याकामी येणाऱ्या खर्चास देणे.

<u>प्रस्तावना</u>

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३१(१) अन्वये शासनाने संदर्भीय पत्रान्वये अधिसूचना प्रसिध्द केलेली आहे व सर्व कार्यवाही पूर्ण करुन सदरची विकास योजना नकाशे या कार्यालयाचे दि. १३. १०.१७ रोजीच्या पत्रान्वये मा. सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे यांचेमार्फत शासनास सादर करण्यात आलेली आहे व त्यास दि. १३.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मंजूरी देऊ न भागशः विकास योजना प्रसिध्द करण्यास मान्यता दिलेली आहे. विकास योजनेचे भागशः नकाशे ४ सेक्टरमध्ये आहे. एका सेक्टरमध्ये एस.एम. चे ४ व ई.पी.चे ४ असे एकूण ८ प्रतीचा १ संच या प्रमाणे आहे.

प्रसिध्द केलेल्या भागशः विकास योजनेची १ प्रत या कार्यालयास दि. १३.११.२०१७ रोजी प्राप्त झालेली आहे. या एका प्रतीचे स्कॅनिंग करुन त्याचे ३०० चा संच (एस. एम. च्या १२०० प्रती व ई.पी.च्या १२०० प्रती )तयार करावयाचे आहे. नकाशे ज्या साईजमध्ये आहे त्याचे स्कॅनिंग मशीन उपलब्ध नसल्याने हे काम सीईपिटी, अहमदाबाद यांचेमार्फत करुन घ्यावयाचे आहे. तसेच जनतेच्या अवलोकनार्थ नकाशे प्रसिध्द करण्यापूर्वी सदर नकाशे सुरक्षेस्तव लॅमिनेशन करुन प्रसिध्द करावयाचे आहे.

उल्हासनगर महानगरपालिकेचे एकूण २० प्रभाग असुन त्यामध्ये ७८ नगरसेवक व ०५ मनोनीत असे एकूण ८३ नगरसेवक असून जनतेच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करावयाचे नकाशे (१) ४—प्रभाग समिती, (२) तहसील कार्यालय, (३) उपविभागीय कार्यालय, (४) उमपा मुख्य कार्यालय, (५) महाराष्ट्र राज्य विद्युत विभाग, (६) महाराष्ट्र राज्य सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रत्येकी एक, असे एकूण १० नकाशे व विभागप्रमुख व नगरसेवक व शासकीय कार्यालय मिळून एकूण १०० नकाशांचा संच व जनतेसाठी विक्रीकरीता २०० नकाशाचा संच. सर्व मिळून एकूण ३०० नकाशा संचाच्या प्रती उपलब्ध करणेसाठी प्लॉटर उपलब्ध नसल्याने याकरीता सी.ई.पि.टी., अहमदाबाद यांचेकडून या नकाशाच्या प्रती स्कॅनिंग करुन उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे.

१. या कामाचे सीईपिटी संस्थेने यापूर्वी मे. सिध्दी डीजी प्रिंटर्स (श्रीसिध्दी कॉपीयर्स) यांचेमार्फत दि. ०१.०५.२०१३ व दि. ०८.१२.२०१३ रोजीच्या पत्रान्वये काम केलेले आहे. त्यांच्या कामाचा दर्जा व कॉपीची प्रत स्पष्ट व उत्तम असल्याने सीईपिटी संस्थेने पुनःश्च सदरचे काम करुन घेणेसंबंधी त्यांचेकडील दि. १७.११.२०१७ रोजीचे पत्र दि. २७.११.२०१७ रोजी प्राप्त नुसार प्रती चौ.फुट रु. ६०/— प्रमाणे दर दिलेले आहे. ३०० चा संच तयार करणेसाठी एकूण रु. १७,२८,०००/— खर्च दर्शविण्यात आलेला आहे. त्यामध्ये सुट देऊन प्रती चौ.फुट रु. ५०/— प्रमाणे दर दिलेले आहे. ३०० चा संच तयार करणेसाठी एकूण खर्च रु. १३,६८,०००/— व अतिरिक्त १२ टक्के जीएसटी रु. १,६४,१६०/— समाविष्ट केल्यास छपाई खर्चावर एकूण रक्कम रु. १५,३२,१६०/— अपेक्षित आहे.
२. मा. सदस्य यांना एकूण संख्या ८३ असून त्यांना या नकाशाच्या १ प्रतीप्रमाणे विनामूल्य उपलब्ध करुन दयावयाचे आहे.
३. जनतेच्या विक्रीसाठी १ सेक्टरच्या नकाशाचे दर रु. १०००/— निश्चित केलेले आहे.

सदर विकास योजना या कार्यालयास दि. १३.११.२०१७ रोजी प्राप्त झालेली आहे व तात्काळ प्रसिध्द करुन ३० दिवसांत जनतेच्या हरकती व सूचना मागविण्याची कालमर्यादित महानरगपालिकेकडून विलंब होत आहे. यास्तव ई—निविदा मागविण्यास एक आठवडा अथवा त्यापेक्षा जास्त कालावधी लागत असल्याने परस्पर सदरचे काम सी.ई.पि.टी., अहमदाबाद यांचेमार्फत त्यांचेकडील मे. सिध्दी डीजी प्रिंटर्स (श्रीसिध्दी कॉपीयर्स), अहमदाबाद यांना तात्काळ सुपूर्द करुन ३०० संच उपलब्ध करुन घेणे सोयिस्कर होईल.

वरीलप्रमाणे अपेक्षित एकूण रु. १५,३२,१६०/— खर्चास मान्यतेकरीता व मे. सिध्दी डीजी प्रिंटर्स (श्रीसिध्दी कॉपीयर्स)(एस.एम. च्या १२०० प्रती व ई.पी.च्या १२०० प्रती यांचेकडून त्वरीत काम करुन घेणेबाबत यास्तव सदरचा विषय येत्या स्थायी समितीच्या विषयपटलावर विचारविनिमय व चर्चेकरीता विषयसूचीमध्ये समाविष्ट करणेसाठी प्रस्तावित आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६३ दिनांकः—८/१२/२०१७

सुचकाचे नाव :—श्री. जमनादास पुरस्वानी

अनुमोदकाचे नाव :—श्री.दीपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार उल्हासनगर शहराच्या सुधारीत विकास योजनेच्या ३०० चे संच (एस. एम. च्या १२०० प्रती व ई.पी.च्या १२०० प्रती) मे. सिध्दी डीजी प्रिंटर्स (श्रीसिध्दी कॉपीयर्स)यांचेकडून त्वरीत उपलब्ध करुन घेणेस व येणारा खर्च रु. १५,३२,१६०/—यास मान्यता देत आहे.
या ठरावांतर्गत घेतलेला निर्णय अंतिम असून तो इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता थेट अंमलात आणण्यांत येईल.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

सर्वानुमते

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

---

महापालिका सचिव :— विषय क्रमांक. ४ वाचून दाखवितात.

---

**विषय क्र. ४** :—फौजदारी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कल्याण येथेस्टॅम्प नं. २७४६/१७,सेशन केस न. ३११/१७, दि. ७/११/२०१७ व दावा क्र. २८७/१७ अन्वये दाखलदावा व मुंबई उच्च न्यायालयात क्र : ११६५/२०१७ अन्वये दाखल याचिके बाबत.

---

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— हा विषय कोणाचा आहे, संबंधित अधिकारी कोण? या विषयामध्ये कोण समजून सांगेल?

**उप आयुक्त (मुख्यालय), श्री. संतोष देहेरकर**:— यामध्ये ४८१ ग या संदर्भात आपण जर आपले कर्तव्य पार पाडत असतांना जर कधी अधिका—यांवर किंवा कर्मचा—यांवर न्यायालयात वैगेरे जायाची वेळ येते तर त्यासाठी आपल्याला तिथे वकिल नेमायला लागतो, त्यासाठी आपल्याला ४८१ ग मध्ये खर्च करता येतो.

**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी**:— सुप्रिम कोर्टाचा निर्णय आहे, त्या निर्णयामध्ये कलम ९ हा आपण बघितला आहे का? तो वाचला आहे का? निर्णय सुप्रिम कोर्टाचा?

**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर**:— पाहीलेला आहे,मी सांगतो याच्यामध्ये, ज्याला खोलात जायचे असेल तर बरीचशी चर्चा करायला लागेल, मला याच्यामध्ये एकच सांगायचे आहे की, हे प्रकरण आणि हा विषय माझ्याशी स्वत:शी संबंधित असल्यामुळे आणि हे पुर्ण अधिकार माझे आहेत, तरी सुध्दा माझ्याशी संबंधित असल्यामुळे मी स्थायी समिती समोर आणला आहे की माझाच निर्णय मी घेऊ नये आणि म्हणून मी तो विषय आणलेला आहे. खरे तर तो माझ्या अधिकारामध्ये मी जरी मंजूर केला असता तरी त्याला कुठेही कायदयाची किंवा नियमाची बाधा नव्हती. हे प्रकरण माझ्या ऑफिसमध्ये मी चेंबरची आरजमेंट किंवा डयुटीवर कर्तव्य बजावत असतांना झालेले प्रकरण आहे आणि त्याच्यामध्ये मी जास्त मिरीटमध्ये जात नाही, हे सगळे खोट प्रकरण कोर्टाची पण दिशाभूल करून मिळवलेली ऑर्डर

आहे, आणि याच्यामध्ये शासनाने सन २०१६ मध्ये अमेयमेंट करून पब्लिक सर्वंटच्या विरूध्द जर कुठलीही कारवाई करायची जर असेल, तर कोर्टाच्या दाखल्याचे उत्तर बाजूला राहीले, कायदा आहे. जो पर्यंत सुप्रीमकोर्ट तो कायदा अवैद्य ठरवत नाही किंवा हायकोर्ट अवैद्य ठरवत नाही, तो पर्यंत तो अस्थित्वात आहे. असा कायदा अस्थित्वात असतांना उलट कोर्टाला या कायदयाची कुठलीही जाणीव न करून देता, उलट याच्यामध्ये पोलिसांनी ऑल रेडी तपास केला असतांना तरी देखील ही बाब लपवून अशा प्रकारे ऑर्डर मिळवलेली आहे आणि त्याच्या आधारावर ही एफ. आय.आर. दाखल झालेले आहे आणि ज्याच्या विरूध्द कायकोर्टाने त्याच मुद्दयावर स्थगिती दिलेली आहे की, पब्लिक सर्वंट असतांना परवानगी न घेतल्याने याच्यामध्ये पुढील सुनावणी होई पर्यंत याच्या मध्ये कुठलीही कारवाई करण्यासाठी मज्जाव केलेला आहे. त्यामुळे याच्यामध्ये ही केस मिरीटवर चालवलेली आहे, मी कुठेही माझ्या घरा समोर किंवा मी बागेत फिरतांना किंवा कोणशी भांडण झालेले नाही. मी माझ्या चेंमरमध्ये माझे कर्तव्य बजावत असतांना आणि विनाकारण हे प्रकरण पाच महीने थांबवून ठेऊन, त्या नंतर पाच महीन्यानी एफ.आय.आर. दाखल करण्याचा याच्यामध्ये सगळे उघडकीस ते सगळे कोर्टापुढे येईल. परंतु याच्यामध्ये मला केसचा बच्चाव करण्यासाठी म्हणून जो काही अधिकार आहे, तो मी बजावू शकलो असतो, तो मी स्थायी समितीपुढे याच्यासाठी आला आहे की, की, ते माझे स्वत:चे प्रकरण आहे म्हणून.

<u>**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**</u> न्यायालयामध्ये हे प्रलंबित असतांना, न्यायालयाने आदेश दिले असतांनाही आपण त्यामध्ये खोटे आहे किंवा दिशाभूल केली आहे असे म्हणू शकत नाही. कारण ते न्यायप्रविष्ठ आहे, न्यायालयाचा अवमान त्याच्यामध्ये होऊ शकतो, परंतु आम्ही सुप्रिमकोर्टाने जे निर्णय दिलेले आहेत, त्याचे कलम ९ आपण बघा त्याच्यामध्ये सरळ सुप्रिमकोर्टाने म्हणटलेले आहे,

<u>**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**</u> सुप्रिम कोर्टाच्या पुढे जो पर्यंत तो कायदा अवैद्य ठरत नाही, तो पर्यंत कायदा त्याच्या पेक्षा सुप्रिम असतो. आज जे काही कायदे आपण चालवतो, नाही तर सुप्रिमकोर्टाच्या आदेशा प्रमाणे सर्व प्रशासन चालवावे लागेल. कायदा हा सार्वभौम असतो. जो पर्यंत तो कायदा अवैद्य ठरत नाही.

<u>**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**</u> तुम्हा जर सुप्रिमा कोर्टाचे मानणार नसाल आणि तुम्ही जर तुमच्या मनाप्रमाणे काम करणार असाल तर..

<u>**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**</u> मी माहीती दिलेली आहे, तुम्ही याच्यावर काय निर्णय घ्यायचा तो आपण घेऊ शकतात.

<u>**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**</u> स्थायी समिती निर्णय ठरवेल परंतु तुम्ही जर सुप्रिमकोर्टाचा निर्णय...

<u>**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**</u> ते कार्टात ठरवतील, आपण इथे चर्चा करण्याची आवश्यकता नाही.

<u>**सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:—**</u> तुम्ही पण विषय इथे आणायची गरज नव्हती, तुमच्या मंजूरीने तुम्ही करून टाकायचा होता. स्थायी समितीचा सदस्य म्हणून मी इथे बोलत आहे. स्थायी समितीचा सदस्य म्हणून मला बोलण्याचा अधिकार आहे. ज्या चुका प्रशासनाकडून झाल्या आहेत,सुप्रिमकोर्टाचे आदेश काय आहेत ते मी आपल्याला दाखवत आहे.

<u>**आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:—**</u> सुप्रिम कोर्टाचे आदेश तेव्हा झाले आहेत की, जेव्हा आपल्या गव्हर्नमेटने अमेंडमेंट सन २०१६ ला केले आहे, तेव्हाचे पहीले जजमेंट आहेत, त्या जेजमेंटला पण अमेंडमेंट सन २०१६ ला केले आहे आणि हे जजमेंट त्याच्या आधीचे आहे आणि दुसरी गोष्ट त्या जेजमेंटचा कुठलाही दुरा अर्थाने या प्रकरणाशी संबंधित नाही. याचा अर्थ असा झाला की एका ऑफिसरने स्वत:च्या कार्यालयातील शासकिय पैशाची अफरातफर केली त्या संदर्भात मी पोलिसांकडे तक्रार केली आणि पोलिसांनी त्याची दखल घेतली नाही. म्हणून ते प्रकरण कोर्टाकडे गेले. १५६ आणि त्यांनी त्याच्यामध्ये असा निर्णय दिला की, गर्व्हमेंट सर्व्हंट जर त्याचे कायदेशिर कर्तव्य बजावत असतांना जर त्याच्याकडून चुक झाली किंवा काही, तर त्याच्यावर परवानगी घेण्याची आवश्यकता आहे. तथापी तो जर स्वत:च्या पदाचा गैरवापर करून शासकिय मालमत्तेचा अपहार करतो, करप्शन करतो किंवा टेंडरमध्ये काही घोटाळे करतो, त्याचा बचाव त्याला ती ढाल मिळू शकणार नाही. हा निर्णय आहे. हा निर्णय तो पर्यंत लागू होईल, जो पर्यंत ती अमेंडमेंट झाली नव्हती. आज अमयमेंट झाली असेल तरी इव्हन मिस एप्रोप्रिएशन जरी केले असेल तरी पब्लिक सर्व्हंट असल्यामुळे परवानगी घ्यावी लागेल आणि या केसमध्ये मी काही सरकारी मालमत्तेचा गैरवापर केल्याची केस नाही हे

आपल्या शासकिय मालमत्तेचाच संरक्षण करण्याचा काम करीत होतो. ज्यामध्ये विनाकारण बाचाबाची करून विषय ताणून आणि मला आताच कार्यालय ओपन करून पाहीजे आणि सिल ओपन करून पाहीजे हा अट्हास धरला त्यामुळे याच्यामध्ये चुकीची खोटया बेबनाव करून ज्या गोष्टी रचलेल्या आहेत. त्याच्या बदलचे हे प्रकरण आहे. त्याच्या बदल ही तक्रार जर खरी असती तर त्याच्यामध्ये ब–याच गोष्टी निगडीत आहेत. या सगळया गोष्टी कोर्टापुढे येतील.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:– याच्यामध्ये काय म्हणटले आहे...

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– त्या केसची हिस्ट्रीच ती आहे की, त्या माणसाने शासकीय रक्कमेचा अपहार केला आहे.

सदस्य, श्री. धनंजय बोडारे:– असेसमेंट कधी झाले आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– असेसमेंट ऑगस्ट, २०१६ ला झाले आहे. पब्लिक सर्व्हंट जर असेल आणि मा. मुख्यमंत्री साहेबांचे स्टेटमेंट आहे, माझ्याकडे त्याचे सर्व डिटेल आहेत, की शासकीय अधिकारी/कर्मचा–यांना विनाकारण खोटया तक्रारी करून त्यांना छळवणूक करणे आणि स्वत:च्या स्वार्थासाठी या कलमाचा गैरवापर करणे त्याला मज्जाव येण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ३ ऑगस्ट, २०१६ अमेयमेंट केली की, इथून पुढे कुठल्याही पब्लिक सर्वंट बदल त्याच्या विरूध्द जर कुठली कारवाई करायाची जर असेल तर शासनाची त्याची अपॉईटींग ऑथारिटी म्हणजे महानगरपालिकेचा जरी कर्मचारी असेल तर आयुक्त म्हणून त्यांनी आयुक्तांची परवानगी घेतली पाहीजे. त्या शिवाय ती केस कुठलीही वैध ठरू शकत नाही.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:– महापालिकेच्या किंवा शासनाच्या वरती सुप्रिमकोर्ट आहे आणि त्या सुप्रिमकोर्टाच्या आदेशाचे पालन गेले पाहीजे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– याच्यावर जास्त काही मी बोलू शकत नाही.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:– दुसरी गोष्ट अशी आहे की, या मधला जो फिर्यादी आहे, त्या फिर्यादीला, फिर्याद केली म्हणून त्यांना शासनाने मदत केलेली आहे आणि शासनाने त्यांना मदत केली जिल्हाधिका–यांचे पत्र हे आहे आणि त्यांना शासनाने मदत केलेली आहे. फिर्यादीला शासन मदत करते आणि आरोपीला महापालिका मदत करणार का? हा पण विषय इथे महत्वाचा आहे. जर शासन फिर्यादीला मदत करीत असेल तर शासनाने फिर्यादीला मदत केली आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– ॲट्रासिटी ॲक्टचाच तो कलम आहे, कुठल्याही ॲट्रसिटी ॲक्ट खाली गुन्हा नोंदविला तर त्या फिर्यादीला ती रक्कम मिळते आणि या राज्यामध्ये किंवा देशामध्ये त्या तरतुदीचा मी स्वत: भडा–यामध्ये अशा तरतुदीचा ते केवळ पैस मिळतात म्हणून त्या केसमध्ये खोटया तक्रारी दाखल होतात. मी स्वत: या केसमध्ये अध्यक्ष होतो. तेव्ही ही प्रकरणे सगळी हातळलेली आहेत आणि या केसमध्ये पैशासाठी केले आहे असे मी म्हणत नाही परंतु केवळ त्या तरतुदीमध्ये १०० टक्के ती मदत फिर्यादीला दयावी लागते. ती प्रोव्हजन आहे, म्हणून ती डोळे झाकून दयावी लागते, ती मदत दिली नाही तर उलट ॲट्रासिटी केस होऊ शकते, म्हणून ते देण्या बदल जिल्हाधिका–यांना दुसरा काही पर्याय नव्हता,.

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:– एका बाजूला शासन त्या फिर्यादीला मदत करते आणि दुस–या बाजूला आपण आरोपींना वकिल लावण्यासाठी पैसे दया, असे होणार असल तर ते चुकीचे होणार आहे. दुसरा विषय असा आहे की, या महापालिकेचा मी पण सदस्य आहे आणि मी तसे पत्र आपलला दिलेले आहे. त्यामध्ये मी बोललो आहे की, मी महानगरपालिकेच्या कामकाजा बाबत बोलण्यासाठी मी आयुक्त साहेबांकडे गेलो होतो. तेव्हा आयुक्त साहेबांनी मला १० (१) ब ची नोटीस दिली. त्या नोटीसचे मी उत्तर दिले आहे आणि उत्तर दिल्या नंतर हा विषय कोर्टामध्ये पाठविले आहे आणि मी पण महापालिकेचा सदस्य आहे आणि मला पण महापालिकेचा सदस्य या नात्याने स्थायी समितीने मला सुध्दा कोर्टाचा खर्च दिला पाहीजे असे मी पत्र मा. सभापतींना पण दिले आहे, सगळयांना दिले आहे.

आयुक्त, श्री. राजेंद्र निंबाळकर:– हा विषय जेव्हा स्थायी समितीमध्ये....

सदस्य, श्री. राजेंद्र चौधरी:– मी स्थायी समितीच्या सभापती यांच्या बरोबर बोलत आहे, मी स्थायी समितीचा सदस्य आहे, आयुक्तांना विचारल्यावर आयुक्तांनी उत्तर दयावे.

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी, श्री. राजेंद्र चौधरी सभागृहातुन बाहेर गेले.

<u>सभापती, श्रीम. कांचन अमर लुंडः—</u> आपला विषय, एजेंडावर नाही आणि मी विधी विभागाला विचाराचे आहे की, हा जो विषय आला आहे, तो आपण करू शकतो का? या दोन्ही विषया बाबत विधी विभागाने सांगावे.

यावेळी सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी व श्री. राजेंद्र चौधरी यांनी सभागृहात पुन्हा प्रवेश केला.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>होय विधी विभागास पत्र फॉरवर्ड करा.

<u>सदस्य श्री. सुनिल सुर्वे:—</u>आयुक्तांनी जसा विषय दिला आहे तो मान्य आहे, आणि यांनी जे पत्र दिले आहे ते आजच्या विषयावर नाही.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—</u>माझे तेच म्हणणे आहे की, सबंधीत विभागास आपण ते पत्र देवु शकतो काय?

<u>सदस्य श्री. दिपक सिरवानी :—</u>जर आपण महासभेत जसे वैदयकीय परतावाचे देतो त्याप्रमाणे देवुन टाका.

<u>सदस्य श्री. जमनादास पुरस्वानी :—</u>दोन पत्र आलेले आहेत. ते आपण विधी विभागाचा अभिप्रायासाठी पाठवु या. हा विषय पारीत करु या.

<u>सदस्य श्री. राजेंद्र चौधरीः—</u>आमचा या विषयास विरोध आहे.

<u>महापालिका सचिव :—</u>मग मतदान घ्यावे लागेल.

<u>काही सदस्य :—</u>घ्या मतदान.

<u>महापालिका सचिव :—</u>जसा विषय आहे त्याच्या बाजुने जे सदस्य आहेत त्यांनी कृपया हात वर करावे.

<u>प्रस्तावाच्या बाजुने ०७ मते</u>

१. श्रीमती कांचन लुंड
२. श्री. जमनादास पुरस्वानी
३. श्री. राजेश वदारिया
४. श्री. दिपक सिरवानी
५. श्रीमती लक्ष्मी सिंग
६. श्रीमती कविता पंजाबी
७. श्रीमती चंद्रावती सिंग

<u>महापालिका सचिव :—</u>विषयाच्या विरोधात जे सदस्य आहेत त्यांनी कृपया आपले हात वर करावे.

<u>प्रस्तावाच्या विरोधात ०५ मते</u>

१. श्री. राजेंद्र चौधरी
२. श्री. सुनिल सुर्वे
३. श्री. धनंजय बोडारे
४. श्री. कलवंतसिहं सहोता
५. श्रीमती पुष्पा बागुल

<u>महापालिका सचिवः—</u>प्रस्ताव बहुमताने पारीत झाला.

<u>सभापती, श्रीमती कांचन अमर लुंडः—</u> सदरचा विषयाबाबत बहुमताने पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात येत आहे

☑ **विषय क्र. ४** :—फौजदारी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कल्याण येथेस्टॅम्प नं. २७४६/१७,सेशन केस न. ३११/१७, दि. ७/११/२०१७ व दावा क्र. २८७/१७ अन्वये दाखलदावा व मुंबई उच्च न्यायालयातक्र : ११६५/२०१७ अन्वये दाखल याचिके बाबत.

प्रस्तावना

महाराष्ट् महानगरपालिका अधिनियमातील कलम ३६ अन्वयेश्री. राजेंद्र निंबाळकर यांची आयुक्त म्हणून दि. २२/९/२०१६ पासून नियुक्ती करण्यात आलेली आहे. अधिनियमातील कार्ये व कर्तव्ये पार पाडीत असतांना दि. ६/७/२०१७ रोजी श्री. भगवान भालेराव, नगरसेवक, गटनेता, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया यांच्याशी पदाधिका—यांना दालन वाटप करणेबाबतचे चर्चेत वाद निर्माण झाल्यामूळे श्री. भगवान भालेराव यांनी अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९ अंतर्गत फौजदारी न्यायालय, कल्याण येथे दावा दाखल केलेला आहे. सदर दाव्या विरुध्द मा. आयुक्त यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे फौजदारी अर्ज क्र. ११६५/१७ अन्वये याचिका दाखल केलेली असून त्याची सुनावणी ८ जानेवारी २०१८ पासून सुरु होणार आहे.

तसेच श्री. शमीम अहमद, संपादक, क्लीन टाईम्स हे श्री. राजेंद्र निबांळकर आयुक्त, हे महापालिकेत रूजु झाल्या पासून त्यांचे विरूध्द काही अपमानास्पद बातम्या छापत असल्याने मा. आयुक्त यांनी त्यांचे विरूध्द कल्याण न्यायालय, वरिष्टकर येथे मानहानीचा दावा क्र. २८७/१७ अन्वये दाखल केलेला आहे.

दिवाणी व फौजदारी कार्यवाही दाखल करणे इत्यादी सबंधी तरतूद आणि कायदे विषयक बाबी हाताळणेची तरतूद अधिनियमाचे कलम ४८१ अन्वये विहित करण्यात आलेले आहे. सदर कलमातील तरतूदी नुसार सदर केसचा बचाव करणेस व महापालिका निधीतून करण्यात येणा—या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेसाठी मा. आयुक्त प्राधिकृत करणे करिता सदर प्रस्ताव स्थायी समिती पूढे ठेवण्यास प्रस्तावीत करण्यात येत आहे.

स्थायी समिती ठराव क्र. ६४ दिनांकः—८/१२/२०१७

सुचकाचे नाव :—श्री. राजेश वदारिया

अनुमोदकाचे नाव :—श्री. दिपक सिरवानी

ही स्थायी समिती वरील प्रस्तावनेनुसार फौजदारी न्यायालय, वरिष्ठ स्तर, कल्याण येथे स्टॅम्प नं. २७४६/१७, सेशन केस न. ३११/१७, दि. ७/११/२०१७ व दावा क्र. २८७/१७ अन्वये दाखल दावा व मुंबई उच्च न्यायालयात क्र : ११६५/२०१७ अन्वये महानगरपालिका अधिनियमाचे कलम ४८१ अन्वये दाखल याचिके बाबत केसचा बचाव करणेस व महापालिका निधीतून करण्यात येणा—या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेसाठी मा. आयुक्तांना प्राधिकृत करीत आहे.

सुचकाची सही/—

अनुमोदकाची सही/—

बहुमताने

सभापती/पीठासीन अधिकारी

स्थायी समिती सभा

उल्हासनगर महानगरपालिका

सायंकाळी ५.५० वाजंता सभेचे कामकाज संपल्याचे सभापती श्रीमती कांचन अमर लुंड यांनी जाहिर केले.

(प्राजक्ता मि. कुलकर्णी)
महापालिका सचिव
उल्हासनगर महानगरपालिका